
# माणूस

एक समग्र साप्ताहिक

१५ ऑगस्ट १९६

चाळीस पै

## तुझ्या मुक्तिचे एकच होते वेड परी अनिवार



सर्व प्रकारच्या जनरल इन्श्युरन्सचे धंद्याकरता भेटा

**कॉमनवेल्थ अॅश्युरन्स कंपनी लिमिटेड**

कॉमनवेल्थ बिल्डींग
८२, नगीनदास मास्टर रोड,
मुंबई १

**रिजनल ऑफिस**
कॉमनवेल्थ बिल्डींग
लक्ष्मी रोड, पुणे २

अखिल भारतात **७४** शाखा
आपल्या सेवेस हजर आहेत




एक समग्र साप्ताहिक

वर्ष – सहावे
अंक : पाचवा-सहावा
किंमत : चाळीस पैसे
वार्षिक वर्गणी : वीस रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

संपादक मंडळ
अ. मा. साधू
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

व्यवस्थापन विभाग
आ. वा. गंधे
अ. वि. गणपत्ये

पत्ता – ४१९ नारायण, पुणे २.

दूरध्वनी – ५७३५१

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# आत्मज्ञान आणि विज्ञान

आत्मज्ञान आणि विज्ञान, 'माणूस'-ची विषयमर्यादा एवढी व्यापक आहे. कोणताही विषय 'माणूस'ला वर्ज्य नाही.

'समग्र' याचा झाला हा एक ढोबळ अर्थ.

'समग्र' शब्दामागे आणखीही एक धारणा आहे. चारही पुरुषार्थांनी युक्त, अभ्युदय–निःश्रेयसाचा समन्वय साधू शकणारे, यासाठी विज्ञानाची व आत्मज्ञानाची सारख्याच निष्ठेने उपासना करणारे एक सुसंवादी व 'समग्र' जीवन हा आपल्या सर्वांचा आदर्श असावा, आपण एक 'समग्र माणूस' म्हणून जगावे, समग्र मानव-धर्माचा विकास या भूमीत व्हावा, आपला, आपल्या देशाचा-संस्कृतीचा हा मूलस्रोत आहे, असे 'माणूस'ला वाटते. यासाठी प्रयत्नशील राहण्यात 'माणूस'ला मनापासून आनंद आहे.

दैनिकांतून येणारे महत्त्वाचे विषय निवडून ते सचित्र व शैलीदार पद्धतीने पुन्हा वाचकांसमोर मांडणे, उपयुक्त, नवीन ज्ञान रंजकतेने सादर करणे, थोडक्यात, मौज आणि माहितीचा सुरेख संगम साधून एक 'समग्र साप्ताहिक' म्हणून मराठी वाचकांसमोर येणे असा हा 'माणूस'चा प्रयत्न आहे.

**सर्वांचा कृपालोभ असावा. – संपादक**

# पत्रमैत्री

**स. न.** १३-७-६६

आजच ' माणूस 'चा अंक घेतला. अंक नेहमीप्रमाणेच सर्वांगसुंदर आहे. मुखपृष्ठावरील खारीचे चित्र मार्मिक आणि लोभसवाणे आहे. रंगसंगती सुंदर आहे. ' माणूस प्रतिष्ठान 'ची कल्पना फार चांगली आहे. पण पार पाडणे जरा कठीण आहे. ' माणूस ' साप्ताहिक करण्याची कल्पना रोमांचकारक आहे. कारण दर आठवड्यास इतके चांगले साहित्य वाचावयास मिळणार ही कल्पनाच आनंद निर्माण करणारी आहे. दर आठवड्यास ' माणूस ' घेण्याचे मी आश्वासन देतो. शक्य होईल तेव्हा वर्गणीदारच होणार आहे. माझी एक सूचना आहे की ' माणूस 'ची किंमत ५० पैसे करावी. म्हणजे दर अंकामागे १ पैशाऐवजी १० पैसे सहज ' माणूस फाउंडेशन 'साठी मिळतील.

कृपया ' माणूस 'च्या आकारात बदल करू नये. आता आहे तो आकार छान व सुटसुटीत आहे.

**वसंत भोळे, मुंबई.**

**स. न.** १५-७-६६

मी आपल्या ' माणूस ' मासिकाचा स्थानिक वर्गणीदार आहे. खरोखरच ' माणूस 'बद्दल, स्तुतिप्रिय जितके लिहावे, बोलावे, सांगावे तितके थोडेच आहे. इतका हा आपला ' माणूस ' दिगंत कीर्तीचा ! मग त्याच्या श्रेष्ठतेबद्दल, दर्जेदार वाङ्मयीन मूल्यांबाबत बोलणे -ते काय ! आपल्या या पांच वर्षे वयाच्या छोटया ' माणसा'ने खूपच विचारांची मजल मारली आहे.

आपला १ व १५ जुलै १९६६ चा अंक वाचला. ' माणूस 'चे प्रस्थान व ' माणूस प्रतिष्ठान ' वाचले. मासिकाचे साप्ताहिकात रूपांतर होत असल्याचे वाचून खरोखर आनंद झाला.

' माणूस 'चा खप आपणांस अधिक वाढवायचा आहे, त्या कार्यांत आपण पण सहभागी व्हावे, असे वाटते. तेव्हा सुरुवात म्हणून १५ ऑगस्टपासून ' माणूस 'चे १० अंक खपवण्याची जबाबदारी आम्ही घेऊ इच्छितो.

तेव्हा पत्र मिळताच सविस्तर माहिती कळवावी.

**विजय वर्धे,** कऱ्हाड.

**स. न.** २०-७-६६

जुलैच्या जोड अंकातील 'प्रस्थान'-मधील कल्पना चांगली वाटली. प्रस्थानमध्ये व्यक्त केलेल्या विचारांवरून मराठी वाचकांबद्दल आपण भलतीच अपेक्षा बाळगून असल्याचे दिसते. ती फलद्रूप होवो हीच सदिच्छा !

'माणूस प्रतिष्ठान' साठी काही स्वतंत्र देणग्याही मिळतील, त्या अवश्य स्वीकाराव्या; पण त्यांची नि 'माणूस' विक्रीतील एक पैसा या निधीची गल्लत करू नये असे मला वाटते. त्यामुळे आपली मूळ कल्पना कितपत यशस्वी झाली ते ठरवता येईल.

'माणूस' चा अंक किरकोळीने विकत घेणारा मी एक वाचक आहे, वर्गणीदार नाही. आपण प्रथम २५ पैशाला 'माणूस' देऊन त्याची किंमत हळूच ३० पैसे केलीत नि नंतर ४० पैशांवर आलात हे लक्षात आले नाही, असे नाही. पण त्या त्या वेळी आपण काही कारणे दाखविलीत नि माझ्यासारख्या वाचकांनी म्हटले 'जाऊ द्या झालं!' पण आता आपण दर आठवड्याला आमच्याकडून ४० पैसे घेणार आहात, हे आम्हांला कितपत परवडेल हा प्रश्नच आहे! तथापि आपल्या साप्ताहिकाचा दर्जा पाहूनच तो निर्णय घेता येईल.

आपणांस नाउमेद करण्यासाठी हे पत्र नाही. पण 'प्रतिष्ठान' चा आपण मांडून दाखविलेला हिशेब कितीही गोंडस दिसत असला तरी तो व्यवहारात कितपत यशस्वी होईल याची धास्ती वाटते. नाहीतर शेवटी 'आरंभशूर' या मालिकेत बसण्याची पाळी यायची.

आपल्या साहसात सुयश चिंतितो.

**कृ. वि. पेठे, ठाणे.**

**स. न.** २८-७-६६

ठरल्याप्रमाणे तुम्ही साप्ताहिकाची घोषणा केलीत आणि १५ ऑगस्टपासून साप्ताहिक सुरू करण्याचे जाहीर केलेत हे पाहून आनंद वाटला. साप्ताहिक चालू करताना तुम्ही जो सामाजिक उद्देश ('माणूस प्रतिष्ठान'चा आणि काही लाख रुपयांचा विनियोगाचा) तो स्तुत्य आहे. या चांगल्या कार्यात माझे सहकार्य नेहमीच राहील. त्याचा एक लहानसा भाग म्हणून मी साप्ताहिक सुरू झाल्याबरोबर त्याचा प्रत्येक अंक विकत घेऊन वाचण्याचा निश्चय केला आहे. तेव्हा यापुढे माझ्याकडे 'विनामूल्य' किंवा 'सप्रेम भेट' म्हणून येणारा अंक नाही पाठवला तरी चालेल.

**द. मा. मिरासदार, औरंगाबाद.**

**स. न.** १-८-६६

१५ ऑगस्टपासून 'माणूस' पाक्षिकाचे साप्ताहिक प्रकाशनमध्ये रूपांतर होत आहे, आनंद झाला.

प्रगतिपथावर वाटचाल करीत असलेल्या 'माणूस' साप्ताहिकास सुयश चिंतून, मदतीदाखल 'ठेव' योजनेत आम्ही सहभागी होऊ इच्छितो. सदर योजना जाहीर करून 'माणूस'चा विकास अधिक वृद्धिंगत करावा. किमान १०० रुपये रक्कम 'ठेव' म्हणून घेऊन ५ वर्षे मुदतीत अंक विनामूल्य देऊन रकमेचा सदुपयोग साधावा.

**ज. बा. बडदे, पुणे.**

म नो ह र आ प टे • मो ह न रा न डे

मो ह न रा न डे • म नो ह र आ प टे

# मो ह न • म नो ह र • मो ह न


लेखक : सुधीर फडके : संगीत दिग्दर्शक

## तुझ्या मुक्तिचे एकच होते

ज्याने स्वतःच्या आणि आपल्या कुटंबाच्या सुखाचा विचार न करता संपूर्ण भारताच्या मुक्ततेचा ध्यास घेतला, आपले अपुरे राहिलेले शिक्षण, भारतीय स्वातंत्र्य संग्रामाच्या महान विद्यापीठात पुरे करण्याचा निश्चय केला आणि अखंड भारताचा सुखी, समाधानी व स्वाभिमानी संसार या विश्वाच्या प्रांगणात डौलाने उभा करण्यासाठी स्वतःच्या वैयक्तिक संसाराचा विचार ह्रा अविचार मानला अशा एका महान, त्यागी, निर्लेप देशभक्ताची ही गाथा आहे.

मृतवत् झालेल्या समाजाला आणि राष्ट्राला जाग आणण्यासाठी परमेश्वरोने ज्यांची योजना केलेली असते त्यांपैकीच एका पुण्यपुरुषाची ही कथा आहे.

कुमार मनोहर आपटे सांगलीचा एक तरुण. त्याची आई अत्यंत देशाभिमानी. मनोहरपेक्षा मोठा आणखी एक मुलगा तिला आहे. आपली दोन्ही मुले शिकली तर पाहिजेतच, पण त्याबरोबरच त्यांची शरीरप्रकृती निकोप व्यायामाने कसलेली असावी, असा तिचा कटाक्ष असे. मनोहर अशा वातावरणात वाढत होता. देशभक्तीचें बाळकडू मिळालेले मित्र त्याच्या आवतीभवती होते. देशाच्या पारतंत्र्याचे त्याला अतिशय दुःख होई. इंग्रजांविषयीचा द्वेष उफाळून वर येई. रामायण महा-



# वेडपरी अनिवार'

भारत त्याने अनेक वेळा वाचले. १८५७ चे स्वातंत्र्ययुद्ध, माझी जन्मठेप, जोसेफ मॅझिनी, काळातील निवडक निबंध अशा पुस्तकांची पारायणे त्याने केली. मॅझिनीची प्रदीर्घ प्रस्तावना त्याला मुखोद्गत होती. देशाला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी, आपल्या असहाय्य समाजाच्या उन्नतीसाठी काहीतरी केले पाहिजे ही तळमळ त्याला स्वस्थ बसू देईना.

१९४६ साली नौखालीत फार मोठ्या दंगली सुरू झाल्या. जात्यंध मुसलमानांनी तेथील हिंदूंच्यावर चालविलेल्या भयंकर अत्याचारांच्या कुवार्ता जगभर पसरल्या. मनोहरचे देशाभिमानी रक्त तापू लागले. त्या भागातील आपल्या बांधवांना मदत करण्याच्या उद्देशाने चारपाच सहकाऱ्यांसह, इतर कोणाला पत्ता लागू न देता त्याने कलकत्त्याची वाट धरली. योजना वगैरे काही केलेली नव्हती. तेथे अत्याचारांना बळी पडणाऱ्या असहाय्य देशबांधवांना जमेल ती जमेल त्या मार्गाने मदत करायची, त्यांच्या भीषण दुःखात त्यांच्याबरोबर राहायचे एवढीच कल्पना मनात होती. मनमाड स्टेशनवर कलकत्त्याला जाणाऱ्या हौरा एक्सप्रेसची वाट पाहत हे तरुण उभे होते. सारेच वयाने लहान असल्यामुळे भावनेच्या भरात जोरजोराने, तावा-

तावाने नौखालीच्या दंगलीविषयी बोलत होते. त्या स्टेशनवरच या मुलांच्यापैकी एकाला ओळखणारे एक सद्‌गृहस्थ हे सारे ऐकत होते. या मुलांच्या चर्चेवरून हे सर्वजण घरून न सांगता चालले असावेत अशी त्यांची खात्री झाल्याने त्यांनी या साऱ्यांना धरून सांगलीला परत आणले.

काही दिवस निघून गेले. १५ ऑगस्ट १९४७ या दिवशी आपल्या मातृभूमीचा काही भाग स्वतंत्र झाला. पाकिस्तान या नावाने देशाचा एक मोठा भाग नव्याने गुलामगिरीत गेला. गोवा, दीव, दमण, दादरा, नगरहवेली हे भाग पोर्तुगीजांच्या जोखडाखालीच राहिले.

आणखी काही दिवस गेले. हैद्राबाद संस्थानात रझाकारांचे भीषण अत्याचार सुरू झाले. नौखालीचीच पुनरावृत्ती स्वतंत्र भारताच्या एका भागात पुन्हा घडत होती. स्वातंत्र्य मिळाल्याच्या समाधानात बहुतांशी हिंदूसमाज स्वस्थ बसला असला तरी मनोहर संतापाने फुलत होता. रझाकारी अत्याचारांचा सूड घेण्यासाठी त्याचे मन संतापाने उसळ्या घेत होते. सुदैवाने त्याला सहकारीही तसेच लाभले होते. त्या सर्वांनी पुन्हा एकदा घर सोडले. निजामी राजवटीविरुद्ध उठावाचा प्रयत्न करण्याच्या उद्देशाने त्यांनी मराठवाड्यात प्रवेश केला. तेथील काही स्थानिक लोकांनी त्यांना साहाय्य करण्याचे मान्य केले होते. त्यांवर विसंबून मनोहरने आपल्या सहकाऱ्यांसह जवळजवळ दोन महिने विविध तऱ्हेने प्रयत्न केले. पण पैशांचे पाठबळ नाही तसेच स्थानिक लोकांचे हवे तसे सहकार्य नाही. त्यामुळे निराश होऊन मनोहर सांगलीला परत आला.

या प्रसंगाने तो एक महत्त्वाचा धडा शिकला की ज्या ठिकाणी काही कार्य करायचे किंवा काही घडवायचे आहे, तेथील थोड्यातरी माणसांच्या मनात त्या कार्याविषयी भक्ती निर्माण झाली पाहिजे. पराकोटीच्या त्यागाला जरी यांपैकी सर्वचजण तयार झाले नाहीत तरी, त्याग करणाऱ्यांच्या पाठीशी कर्तव्यबुद्धीने उभे राहण्याची वृत्ती तरी त्यांच्यांत निर्माण झाली पाहिजे. ज्यांच्यासाठी मरायचे त्यांना आपण का मेलो, कुणासाठी मेलो एवढे तरी कळले पाहिजे, अशा मृत्यूचा आदर करण्याइतका तरी स्वाभिमान, निदान अन्यायाची एवढी तरी चीड त्यांच्यांत उत्पन्न झाली पाहिजे, तरच स्वार्थत्यागाला, बलिदानाला अर्थ प्राप्त होईल.

ही धडपड चालू असतानाच मनोहर १९४८ साली मॅट्रिकच्या परीक्षेला बसला. परीक्षा संपली, सुट्टी सुरू झाली तरी मनोहरच्या मनातले वादळ काही शांत होईना. त्याच्या दृष्टीसमोर साऱ्या भारताचे चित्र उभे राही. ज्या अखंड हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठी १८५७ पासून १९४७ पर्यंत अनेक उठाव झाले, लहानमोठी युद्धे झाली, क्रांतीचे, प्रयत्न झाले, फासाचे खांब पुनित झाले, शांततामय सत्याग्रह झाले, परदेशी कापडाने भरलेल्या ट्रक गाड्यांची चाके कडव्या देशभक्तांच्या रक्ताने करपून गेली, त्या भारताचे खंडित स्वातंत्र्य पाहून तो जितका तळमळे त्यापेक्षाही

मरणप्राय दुःख या खंडित स्वातंत्र्याची किंचितही खंत नसणाऱ्या निर्लज्ज, मुर्दाड, अल्पसमाधानी व सुखासीन अशा आपल्याच देशबांधवांकडे पाहून त्याला होई.

या परिस्थितीत आपल्याला काय करता येईल याचा तो सतत विचार करी. फाळणी नष्ट करणे नजीकच्या भविष्यकाळात तरी कठीण आहे; कारण त्या फाळणीचे भारतमातेच्या पावित्र्य विडंबनाचे दुःखच कुणाला नाही हे त्याला दिसत होते. तरीपण त्याचा विचार थांबला नाही. साऱ्या देशाचे मानचित्र त्याने दृष्टी-समोर उभे केले आणि त्याला एक मोठे एक कार्यक्षेत्र दिसले. खंडित का होईना, पण स्वतंत्र झालेल्या भारताच्या मानचित्रावर अद्याप परकीय गुलामीचा एक काळा डाग आहे तो धुवून काढल्याशिवाय आपला हा उर्वरित भारत पूर्णांशाने स्वतंत्र होणार नाही, ही वस्तुस्थिती त्याला दिसली. त्याचा विचार ठरला. मागच्या दोन्ही अपयशांपासून धडा घेऊन, उतावळेपणा न करता योग्य व जरूर ती पार्श्वभूमी निर्माण करायची आणि त्या पार्श्वभूमीच्या आधारावर उठाव करायचा ही कार्य-पद्धती त्याने निश्चित केली. आजपर्यंतच्या सर्व प्रयत्नांत खांद्याला खांदा लावून उभा राहिलेला श्रीपाद साठेसारखा जिवलग व क्वचित प्रसंगी मार्गदर्शक मित्र याही वेळी त्याच्याबरोबर यायला तयार झाला. १९४८ च्या मे महिन्यात मनोहर आपटे व श्रीपाद साठे गोव्यात गेले.

गोव्यातील परिस्थितीत, गोव्याबाहेरील कुणालाही आपल्या खऱ्या नावाने वावरून जनजागृतीचे व संघटनेचे काम करणे कठीण आहे हे त्यांच्या ध्यानात आले. अडचण उभी राहिल्याबरोबर मार्ग सापडला. मनोहर आपटेचा मोहन रानडे झाला. या तेजस्वी तरुणाने संपूर्ण भारताचे स्वातंत्र्य प्रस्थापित झाल्याविना घरी परत जायचे नाही, स्वातंत्र्य यज्ञ चालू ठेवावयचा, आपल्या आयुष्याची समिधा त्या यज्ञात अर्पण करायची असा निश्चय केला.

ज्या क्षणी त्याने हा निश्चय केला त्याच क्षणी गोव्याच्या मुक्ती संग्रामाचे नवे तेजस्वी पर्व सुरू झाले.

गोव्यात मराठी शाळा चालविणे फार कठीण होते. राज्यकर्त्या पोर्तुगीजांच्या दृष्टीने ते अपायकारक होते. अशाही परिस्थितीत मोहनने गोमंतकाच्या मराठी मायबोलीत राष्ट्रीय धडे देणारी मराठी माध्यमाची शाळा पेडणे महालातील धार-गावाला सुरू केली. १९५० पर्यंत ही शाळा चालू होती. मोहनला लोक आता रानडे गुरुजी म्हणून ओळखू लागले. रानडयांना गोव्यातील परिस्थितीचा अंदाज येऊ लागला. दीर्घकालीन दास्यतेमुळे निर्माण झालेली असहाय्यता, पोर्तुगीजांच्या राक्षसी-शक्तीचे भय, यामुळे दबून गेलेल्या लोकांबरोबरच, चारसाडेचारशे वर्षांपूर्वी लावलेल्या विषवृक्षाची विषारी फळे वर्षानुवर्षे खाऊन, त्याच्या मादक छायेत सुखा-सीनतेने धुंद होऊन, सुख–सुख म्हणतात ते हेच, शांतता–शांतता हवी असते ती हीच,

असे म्हणत ही पोर्तुगीज सत्ता गोव्यात अशीच अनंत काळ राहावी अशी परमेश्वराची प्रार्थना करणारा स्वत्त्वहीन, आत्मविस्मृत असा, समाजाचा फार मोठा भाग त्यांना पाहायला मिळाला. याच्याच जोडीला, आम्ही पोर्तुगीजच, आमची मातृभूमी पोर्तुगाल, आमची संस्कृती पोर्तुगीज अशा भ्रामक, अराष्ट्रीय विचाराने भारावून जाऊन पोर्तुगीज साम्राज्याचा आधारस्तंभ बनलेला, भारतीय जनतेचाच अंगभूत असलेला एक स्वाभिमानशून्य लोकसमूह त्यांना तेथे दिसला. ही सर्व परिस्थिती पाहून मनातल्या मनात दुःखी होणारे पण आपण काय करू शकणार, राज्यकर्ते सर्वसत्ताधीश आहेत, त्यांना विरोध करून आपला कसा निभाव लागणार, त्यापेक्षा दैवात असेल त्याप्रमाणे होईल, असा विचार करून प्राप्त परिस्थितीत शक्यतो शांतपणे आयुष्य घालविण्याचा प्रयत्न करणारे लोकही त्यांना दिसले. मध्येच केव्हातरी देशभक्तीचा एखादा लहानसा स्फुल्लिग चकाकून जाई. तरीपण एकंदरीत चित्र निराशाजनकच होते.

मोहन रानडे विचार करीत की " हे असे नसते तर माझी येथे काय आवश्यकता होती ? या अवनत समाजाला आणि राष्ट्राला उज्ज्वल भविष्यकाळ लाभावा यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न माझ्या हातून व्हावेत म्हणूनच परमेश्वराने मला येथे येण्याची बुद्धी दिली नाही का ? आता हेच माझे कार्यक्षेत्र.

विद्यादानाबरोबर मोहन रानडे व श्रीपाद साठे यांच्या क्रांतिकारक हालचाली गुप्तपणे सुरू होत्या. याचसाठी ते मध्यंतरी काही दिवस सावईला जाऊन आले. अशाच एका प्रयत्नात १९५० साली श्रीपाद साठे पकडले गेले. रानडे थोडक्यात वाचले पण त्यांना भूमिगत व्हावे लागले. या काळात त्यांनी अप्पासाहेब पटवर्धन, बाळूभाई मेहता या भूदान कार्यकर्त्यांच्याबरोबर रत्नागिरी जिल्ह्याच्या दक्षिण भागात पदयात्रेत काही दिवस सक्रीय भाग घेतला आणि आपल्या वागण्याने सर्वांच्या मनात आदराचे स्थान निर्माण केले.

## सेवेचे व्रत

वास्तविक या वेळपर्यंत पोर्तुगीज सरकारला त्यांच्याविषयी काहीच संशय नव्हता. केवळ संशयाच्या कल्पनेनेच रानडे भूमिगत झाले होते. नोव्हेंबर १९५१ च्या सुमारास ते परत सावईला आले. सावईच्या आसपास एका देवळात त्यांनी रात्रीचा प्रौढवर्ग सुरू केला. ते आपल्या विद्यार्थ्यांच्याबरोबरच राहत, त्यांच्याबरोबरच जेवत, वर्गानंतर शाळेतच झोपत. शक्य तितका जास्त वेळ त्यांच्यामध्ये घालवण्याचा हेतू त्यांच्याबरोबर आपुलकीचे संबंध निर्माण व्हावेत हा होता.

ज्या समाजाला परदास्याच्या दुर्गंधीतून, स्वातंत्र्याच्या पवित्र वातावरणात नेण्यासाठी रानडे बद्धपरिकर झाले होते, त्या समाजात आपल्याविषयी ममत्वाचे स्थान निर्माण करायला हवे, आपल्याविषयीचा विश्वास त्यांच्या मनात निर्माण

व्हायला हवा याची त्यांना पूर्ण जाणीव होती. हा सर्व समाज माझा आहे, यांची उन्नती—यांचे स्वातंत्र्य हेही माझेच आहे. तो परतंत्र असताना आपण स्वतंत्र असूच शकत नाही, इतकी एकत्वाची भावना त्यांच्या मनात बिंबली होती. त्यांच्यासाठी कष्ट उपसणे, हाल सोसणे यात त्यांच्यावर उपकार नसून हे आपले कर्तव्य आहे हा विचार त्यांचा स्थायीभाव बनला होता. त्यांच्या वागण्यातून याचा प्रत्यय साऱ्यांना येऊ लागला. दर शुक्रवारी सावईचे शेतकरी डोक्यावर केळी, नारळी अशा बागायती जिनसांचे ओझे घेऊन डोंगर ओलांडून भाणसतरच्या बाजाराला जात. डोंगराचा कठीण चढ चढून जाणे पावसाळ्यात फारच कष्टाचे होई. अशा वेळी एखादा अवघडलेला शेतकरी दिसला तर रानडे त्याचे ओझे स्वतःच्या डोक्यावर घेऊन बाजारात पोचवून देत.

गोव्यात सरस्वती पूजनाचा उत्सव धूमधडाक्याने केला जातो. त्यात एक मोठी गमतीदार पण फार खर्चिक प्रथा असे. देवीसमोर जास्तीत जास्त पैशांचा कापूर जाळणे ही मोठेपणाची खूण समजली जाई. ही निष्कारण चालणारी पैशांची उधळपट्टी थांबावी यासाठी रानड्यांनी प्रयत्न सुरू केले. आपल्या शाळेत होणाऱ्या सरस्वती पूजनाच्या उत्सवात या प्रथेला त्यांनी बंदी केली. इतरही शाळांच्या उत्सवात जाऊन त्यांनी ही अनिष्ट प्रथा बंद करावी म्हणून रानड्यांनी खटपट सुरू केली. त्याबरोबरच या उत्सवाला लो. टिळकांनी सुरू केलेल्या गणेशोत्सव, शिवजयंती अशा उत्सवांसारखे शैक्षणिक व राष्ट्रीय स्वरूप यावे या हेतूने गोव्याबाहेरील कार्यकर्त्यांची व्याख्याने व अन्य राष्ट्रीय उपक्रम सुरू केले. नमस्कारांच्या व धावण्याच्या चढाओढी सुरू केल्या. अनेक प्रकारच्या अन्यायांविरुद्ध जागृती निर्माण करण्याकरताही त्यांनी या सरस्वती पूजनाचा उपयोग केला. गोव्यात त्या काळी साखरेचे रेशनिंग असे. साखर वाटपासाठी पोर्तुगीज सरकारने एक तऱ्हेवाईक व अन्याय्य पद्धत सुरू केली. त्यांनी समाजाचे चार वर्ग पाडून पहिल्या ते चौथ्या वर्गाला अनुक्रमे चार शेर, दोन शेर, एक शेर व अर्धा शेर साखर देण्याची व्यवस्था केली. या अन्यायाविरुद्ध रानड्यांनी आपल्या व्याख्यानांतून लोकमत संघटित करण्याचा प्रयत्न केला.

रानड्यांचे विचार कसे पुरोगामी होते हे दाखविणारी आणखी एक ठळक घटना त्याच सुमारास घडली. त्यांनी पाहिले की, गोव्यातील सगळे ख्रिश्चन मूळ हिंदूच आहेत. त्यांच्यांत बलात्काराने, जुलमाने, भयाने वा प्रलोभनाने धर्म बदललेले जसे आहेत तसेच हिंदूंच्या कोत्या, धर्मवेड्या, अडाणी, हट्टी, दुराग्रही अशा संकुचित वागण्याने नाइलाजाने आजपावेतो परधर्मात राहिलेलेही आहेत. त्या साऱ्यांना मायेने जवळ करून पुन्हा आपल्या मूळ समाजात सामावून घेतले पाहिजे. या दृष्टिकोनातून त्यांनी आपल्या शाळेतील सरस्वती पूजनाच्या उत्सवात आपल्या एका ख्रिश्चन

( पृष्ठ ६८ वर चालू )

## विचारधारे — समीर

### ☐ आफ्रिकेतील अंतःप्रवाह

आफ्रिका खंड आता अंधाराची दुनिया नसून बऱ्याचशा उदीयमान राष्ट्रांचा समुदाय झाला आहे. पण सध्या आफ्रिकेत काय घडत आहे याची अधिकृत माहिती भारतात फारच थोड्या लोकांना आहे. या दृष्टीने युगांडाच्या मकेरेरे युनिव्हर्सिटी कॉलेजातील राज्यशास्त्राचे प्राध्यापक डॉ. अली मजरुई यांनी दिल्लीत नुकतीच आफ्रिकेवर दिलेली भाषणमाला महत्त्वाची आहे. आफ्रिकेत चालू असणाऱ्या राजकारणाचे काही महत्त्वाचे पैलू मजरुई यांनी उजेडात आणले. त्यातला अत्यंत महत्त्वाचा पैलू म्हणजे सद्यःकालीन आफ्रिकेवरील लाल चीनचा प्रभाव. इ. स. १९६० मध्ये पंधरा-सोळा आफ्रिकन राष्ट्रे स्वतंत्र झाल्याबरोबर आफिका खंडात आपल्या पद्धतीच्या क्रांतीच्या ज्वाला पसरविण्यासाठी लाल चीनने फार मोठे राजकारण आरंभले. त्या राजकारणात आता बरीच पीछेहाट झाली असली तरी एकांतिक मताच्या तरुण आफ्रिकन पिढीला सामाजिक क्रांती घडवून आणण्याच्या चिनी तंत्राबद्दल आदर वाटू लागला आहे. साम्राज्यशाहीचं नातं बदलण्यासाठी अहिंसेचा मार्ग स्वीकारणे ही जर भारताची आफ्रिकेला देणगी असेल तर सामाजिक क्रांती घडवून आणण्यासाठी हिंसेचा अवलंब करणे, ही चीनची आफिकेला देणगी ठरू शकेल. या बाबतीत चीनबद्दल आफ्रिकन जनतेला वाटणारा आदर हा 'माउ माउ' बंडाच्या कालापासूनचा आहे.

'आफ्रिका आणि तिसरे जग' या विषयावर बोलतांना मजरुई म्हणाले, "हे तिसरे जग आफ्रिका, आशिया व दक्षिण अमेरिकेतल्या तटस्थ राष्ट्रांचे मिळून होईल. पण तिसऱ्या जगाची ही कल्पना म्हणजे मूलतः रंगभेदाची मर्यादा ओलांडण्याचा आणि समान दारिद्र्याच्या दुव्यावर भर देण्याचा प्रयत्न आहे. मात्र सगळ्यांना सारखेच जाचणारे दारिद्र्य हे एकीकरण्याचे प्रभावी साधन असले तरी ते अंतर्गत दुफळीचे निमित्त होऊ शकेल. उदाहरणार्थ, आर्थिक स्पर्धेच्या भरात आफ्रिकेत व दक्षिण अमेरिकेत जो एक नवीन बंधुभाव निर्माण झाला आहे तो पुढे स्वतःच्याच हातून विदीर्ण होण्याची शक्यता आहे."

आणखी एक नवीन विषय मजरुई यांनी मांडला. तो म्हणजे, 'कॉमनवेल्थ'मध्ये आफ्रिकेचे नवीन स्थान. 'कॉमनवेल्थवर आफ्रिकेचा कबजा' या विषयावर बोलताना

ते म्हणाले, की "आता कॉमनवेल्थमध्ये आफ्रिकन राष्ट्रांचा गट सर्वांत प्रबळ झाला आहे. आशियाई देशांना महत्त्व राहिलेले नाही. आता कॉमनवेल्थमध्ये चार आशियाई देश आहेत तर आठ आफ्रिकन देश आहेत. आशियाई देशांची लोकसंख्या जरी जास्त असली तरी गट या दृष्टीने आता आफ्रिकन देश एखाद्या गोष्टीसाठी अधिक दडपण आणू शकतात. आशियाई सदस्य राष्ट्रांना हल्ली ज्या समस्या व अडचणींना तोंड द्यावे लागत आहे त्यांच्यामुळे त्यांची शक्ती कमी झाली आहे. परिणामत: कॉमनवेल्थची आता दोन केंद्रे झाली आहेत—ब्रिटन व आफ्रिका. ब्रिटनने ऱ्होडेशियाविरुद्ध जी उपाययोजना केली ती आफ्रिकेच्या दडपणामुळेच. दक्षिण आफ्रिका कॉमनवेल्थमधून निघून गेल्यावर आता केवळ देशादेशांच्या सार्वभौमत्वावर आधारलेलेच नव्हे तर वंश व रंगाच्या समानत्वाचेही एक नवीन युग सुरू झाले आहे."

## □ अवमूल्यन आणि परदेशी भांडवल

नुकत्याच झालेल्या रुपयाच्या अवमूल्यनावर ज्याने आपले मत अजून प्रकट केले नाही, असा देशी तज्ज्ञ विरळा. अर्थात् बऱ्याचशा परदेशी अर्थशास्त्रज्ञांनी व उद्योगपतींनीही आपले मत मांडले आहे. त्यांत एक प्रमुख व्यक्ती म्हणजे आय्. बी. एम्. (इंटरनॅशनल बिझीनेस मशीन्स) या गणकयंत्रे करणाऱ्या जगद्‌विख्यात अमेरिकन कंपनीचे उपाध्यक्ष श्री. पॅटर्सन हे होत. परदेशी भांडवलदारांच्या दृष्टितून विचार करून त्यांनी सांगितले की, रुपयाच्या अवमूल्यनामुळे परदेशी भांडवलदारांना आपले भांडवल गुंतविण्याच्या दृष्टीने आता हिंदुस्थान अधिक आकर्षक झाला आहे. दिल्लीला एका पत्रकार-परिषदेत बोलताना त्यांनी म्हटले, "आता हिंदुस्थानात अधिक पैसा गुंतवावा अशी ते अमेरिकन उद्योगपतींना निश्चित शिफारस करतील. पण त्याचबरोबर ते आपल्या देशबांधवांना अशी सूचनाही देतील की, उद्योगधंदा चालविण्याच्या दृष्टीने हिंदुस्थान हा देश अत्यंत गुंतागुंतीचा आहे व म्हणून निर्णय घेण्याच्या आधी त्यांनी परिस्थितीचा नीट अभ्यास करून मगच काय ते करावे."

श्री. पॅटर्सन यांच्या मते अवमूल्यनाचा आणखी एक चांगला परिणाम म्हणजे युरोपात व इतर देशांत निर्यात होणाऱ्या भारतीय मालाचा भाव आता इतर देशांतल्या भावाच्या स्पर्धेत टिकू शकेल, असा होईल. आय्. बी. एम्. संस्थेचा व्यवसाय जगात १०३ देशांत चालतो. त्या सर्व देशांतल्या चलनाचा सतत अभ्यास करण्याचे काम न्यूयॉर्कमध्ये काही अर्थशास्त्रज्ञ करीत असतात; त्यांनी रुपयाचे अवमूल्यन होण्याची शक्यता काही दिवसांपूर्वीच प्रकट केली होती. भारताने आता आयातीवरील निर्बंध सैल केले आहेत, हे 'अधिक वास्तववादी' धोरण आहे. तरीदेखील भारतात उद्योगधंदा चालविणे फार किचकट काम आहे. कारण सरकार पावलोपावली हस्तक्षेप करीत असते.

●

# मुक्ताफळे...



## ☐ सरकारी नोकरांच्या मागण्या

> पोटापुरता पसा पाहिजे । नको पिकाया पोळी ।
> घेणारांचे हात हजारो । दुबळी अमुची झोळी ॥
>
> —महाराष्ट्र राज्य कर्मचारी

महाराष्ट्र राज्य सरकारी नोकर संघटनेच्या वतीने प्रसिद्ध झालेल्या परिपत्रकात, संघटना आता ' निर्धाराने, अखेरच्या, निकराच्या अन् निर्णायक लढ्याला उभी ठाकली असल्याचे घोषित झाले आहे. महात्मा गांधी, सरदार पटेल, शिवाजी महाराज, पंडितजी अशा महान् पुरुषांच्या छायाचित्रांच्या सहवासात आपल्या सेवेचा क्षण आणि क्षण घालवणारा कारकून वर्ग आता बराच धीट झाला आहे. उपवास, मोर्चे, निदर्शने, संप या आतापर्यंत केवळ कामगार संघटनांनी वापरलेल्या हत्यारांचा उपयोग या मंडळींनाही जमू लागला आहे. आतापर्यंत पडेल चेहऱ्याची म्हणून साहित्यात आणि समाजात बदनाम झालेली अव्वल कारकून मंडळी सरकारला हिसका दाखविण्याची भाषाही सहज बोलू लागली आहेत. असे झाले नसते तर, सरकारी कचेऱ्यांतून साहेबांच्या मागे लटकणाऱ्या महापुरुषांच्या तसबिरींचा यांच्यावर काहीच परिणाम होत नाही, असे झाले असते.

संघटनेच्या नेत्यांच्या मागण्या मुख्यत: दोन–(१) मध्यवर्ती सरकारी नोकरांना मात्र जास्त महागाईभत्ता – आम्हाला का नाही? (२) जिल्हा परिषदेकडे आम्हांला पाठवू नका.

वस्तुत: तुलना नेहमी माणसाला दु:खी करते हे लक्षात घेऊन मध्यवर्ती सरकारच्या महागाई भत्त्याशी तुलनाच करणे चूक. मध्यवर्ती सरकार म्हणजे मध्यवर्ती सरकार ! मध्यवर्ती सरकारचे मंत्री सारखे भारताबाहेर भटकत असतात. राज्य सरकारचे भटकतात का ? ना. वसंतराव नाईक एकदा खटाटोपाने युगोस्लाव्हियाला गेले तर केवढा गहजब झाला. राज्य सरकारने म्हणे दास कमिशनच्या शिफारशी स्वीकाराव्या ! ही काय मागणी झाली ? राज्य सरकार मध्यवर्ती सरकारचे कमिशन मानणार नाही. राज्य सरकार निराळे कमिशन नेमील. विद्यापीठे वाढत आहेत. कुलगुरू वाढत आहेत. या लोकांना काही काम नको का ?

आमची तर सूचना अशी आहे की सरकारी नोकरांनी महागाई भत्त्याची मागणीच करू नये. असे काही मागावे की, जे सरकार देऊ शकेल. उदाहरणार्थ—तृतीय श्रेणीतील कर्मचाऱ्यांनी चतुर्थ श्रेणीतील कर्मचाऱ्यांप्रमाणे वर्षाला तीन खादीचे गणवेष मागावे. ही मागणी आपले सरकार नाकारणार का आहे ? खादी भांडारे चांगली चालतील आणि शिवाय वर्षाकाठी कपड्यांच्या स्वरूपात कर्मचाऱ्यांना काहीतरी पदरात पडेल. स्त्री-कर्मचाऱ्यांनी पदरात...खादीची पातळे मागावीत.

दुसरी मान्य होण्यासारखी मागणी अशी करावी की, सरकारला कर्मचाऱ्यांची रजा विकत घेण्याची सोय असावी. सध्या वर्षाला तीस दिवस भरपगारी, वीस दिवस अर्धपगारी, पंधरा दिवस किरकोळ, सहा दिवस पर्यायी, बावन्न दिवस रविवारांपायी, सव्वीस दिवस अर्ध शनिवारांपायी व राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या मंत्रिगणांच्या निधनानिमित्त वर्षाकाठी किमान चार दिवस, सार्वजनिक सुट्ट्यांचे निदान १५ दिवस अशी एकूण सुमारे १६५ दिवस रजा आपल्या कर्मचाऱ्यांना सरकार देते. पुष्कळ सेवकांना ही रजा कमी पडते. परंतु तूर्त इतकीच पुरे म्हणावी ! आता या रजेपैकी प्रकृती स्वास्थ्याला आवश्यक अशी वर्षाकाठी शंभर दिवस रजा भोगूनही प्रत्येक कर्मचाऱ्याला सुमारे ६० दिवस रजा सरकारला विकता येईल.


*With the Compliments of*

CORN PRODUCTS CO.

(INDIA) PRIVATE LTD.

BOMBAY.

म्हणजे या रजेवरचा हक्क सोडून त्याबद्दल पगाराच्या हिशेबात कर्मचाऱ्यांना सरकार पैसे देईल व अशा रीतीने वर्षाकाठी ३०० ते ४०० रुपयांपर्यंत अधिक पैसे शरकारी नोकरांना मिळवता येतील. रजा अधिक प्रमाणात विकली तर वर्षाकाठी ६०० ते ७०० रुपये मिळायला हरकत नाही.

या योजनेला जनताजनार्दन उदंड सहानुभूती दाखवील. कारण या योजनेमुळे अनायासेच सरकारी दप्तरात खितपत पडलेली लोकांची प्रकरणे थोडी जलदगतीने पुढे सरकतील.



आपल्या मागण्या मागताना सेवकांनी महात्मा गांधींचा आदर्श सतत डोळ्यांपुढे ठेवावा. "जसा माझा देश तसा माझा वेश" या रोखठोक बाण्याने बकिंगहॅम राजवाड्यात अर्धनग्न अवस्थेत जाणारे गांधीजी कुणीकडे आणि टेरेलिन-टेरीकॉट घालून महागाई भत्त्यासाठी घोषणा देणारे आजचे तुमचे नेतृत्व कुणीकडे ! नाही. मंडळी असे जमणार नाही. खरोखरच झोळी रिकामी झाली आहे ना ! मग सरकारला ते नीट समजण्यासाठी कर्मचाऱ्यांपैकी पुरुष-वर्गाने खुश्शाल उघड्या अंगाने कचेरीत यावे !! लज्जारक्षणापुरते वस्त्र अंगावर ठेवून, उघड्या अंगाने, उडप्याप्रमाणे सरकारी कचेऱ्यांतून दोन दिवस वावरा. सरकारला सांगा, "जसा तुमचा भत्ता तसा आमचा कपडालत्ता." बघा काय चमत्कार होतो तो ! चळवळीला असा स्वदेशी रंग चढल्याखेरीज नुसते घसे बसवून काही होणार नाही. ब्रिटिश राज्य गेले ते गांधींच्या बावटयाने गेले– लाल बावटयाने नाही–– हे विसरू नका.

जिल्हा परिषदांकडे नोकरवर्गाला वर्ग करण्याचा सरकारला अधिकार नसला तरी बरीच कामे जिल्हा परिषदेकडे गेल्याने हंगामी नोकरवर्ग कमी करण्याचे धोरण सरकारला स्वीकारता येईल. यासंबंधी कर्मचारी संघटनेने आपली शास्त्रशुद्ध भूमिका मांडणे आवश्यक आहे. कमी केलेल्या सेवकांनी वाटल्यास मग जिल्हा परिषदेकडे जावे वा न जावे, अशी भूमिका सरकार घेऊ शकते.




**कोसिजीन– 'कापा ते शेपूट'**

## □ हिंदी–रूसी प्रेम !

सोव्हिएट युनियनमध्ये ५५ व इजिप्तमध्ये १ अशा छपन्न इंदिरा भारताबाहेर आहेत, अशी बातमी नुकतीच वाचली. रुपयाचे अवमूल्यन वाईट, पण इंदिराजींच्या नावाचे हे अवमूल्यन हे प्रेमाचे निदर्शक असल्याचेही जाहीर झाले. रशियन जनतेविषयी आमच्या मनात प्रेम आहे, परंतु कधी कधी अशा खुळचट गोष्टी रशियातून इकडे आयात होतात की विचारू नका. इतक्या हास्यास्पद गोष्टी तिथे कशाकरता प्रसिद्ध होतात काही कळत नाही. सगळे उद्योग सोडून रशियन सरकारने इंदिरा नावाची ही शिरगणती केली हे संभवत नाही. या मापाने ' हिंदी–रूसी ' प्रेम मोजायचे तर उद्या तिथे शंभर झेबुन्निसा किंवा दोनशे टँगटुंग चेनही निघण्याची शक्यता आहे. हे काय प्रेमाचे कोष्टक आहे ? तसे असेल तर फार सोपी गोष्ट आहे. ताश्कंद करारानुसार आपल्या देशात किती आयुब, आहेत, किती खान आहेत याची भारत सरकारने तावडतोब शिरगणती करावी व पाकिस्तानात एखादा हिंदू असल्यास त्याचे नाव इकडे जाहीर करावे. या शिरगणतीनुसार आपले पाकवर निरतिशय प्रेम असल्याचा दावा भारत सरकारला करता येईल.

**– ग्यानबा**

# शिवभक्तांसाठी

मालेगाव ता. १९-७-६६

मालेगाव पालिकेचे माजी अध्यक्ष श्री. रघुनंदन पाटील यांचा ९०० रु. किमतीचा बैल खळ्यातून चोरीला गेला. तो येथील कसाईवाड्यात अर्धवट कापलेल्या स्थितीत सापडला. पोलिसांनी या प्रकरणी मजीद नन्हू कसाई, नन्हू इब्राहीम कसाई, सइझाक हसन कसाई अशा तिघांना अटक केली आहे. कापलेल्या बैलाचे अवशेषही पुराव्यासाठी जप्त केले आहेत. संगमेश्वरातील श्री. तिसगे वकिलांची सवत्स गाय गोठ्यातून चोरीस गेली आहे. येथील सेवानिवृत्त फौजदार श्री. देशमुख यांचाही शेतावरील बैल असाच चोरीस गेला आहे.

— सकाळ

मालेगाव : दि. १८-७-६६

तीन वर्षांपूर्वी जळगावच्या गंगाराम प्लॉटमधून पळवलेली एक सोळा वर्षांची तरुणी येथील किल्ला वॉर्डातील अब्बास शेठ कांडीवाला कारखान्यात इन्स्पेक्टर श्री. चोरगे यांनी शोधून काढली.

शोभा बाप पंढरीनाथ काळे लेवा पाटील असे आपले नाव तिने सांगितले. तीन वर्षांपूर्वी जळगाव येथून सरदार शहा फकीर नामक इसमाने तिला फसवून सुरतेला नेले. तेथे तिला बाटवून मुसलमान केले. तिच्याशी निका लावला. दोन वर्षे तिला आपल्याजवळ ठेवून सहा महिन्यांपूर्वी तिला मालेगावी आणून वाऱ्यावर सोडून दिले व स्वत: फरारी झाला अशी तिची हकीकत आहे.

—नवशक्ती

गृहमंत्री बाळासाहेब देसाई यांच्या नेतृत्वाखाली शिवाजी महाराजांचे पुतळे ठिकठिकाणी उभारण्याची चळवळ आता फोफावते आहे.

ज्या गृहमंत्र्यांच्या राज्यात वरील गोष्टी प्रत्यही घडतात, त्यांनी महाराजांचे पुतळे कशाला उभारावेत ?

— ग्यानबा


SATHE
SATHE Maltex BISCUITS
Made specially for children and invalids
अभिरुचीचें संपूर्ण समाधान
साठे माल्टेक्स विस्किटें मुख्यत: ल्हान मुलें व अशक्त माणसें ह्यांसाठी खास तयार करण्यांत आलीं आहेत. मधुर स्वादयुक्त आणि पचनास हलकीं अशीं ही विस्किटें शक्ति आणि उत्साह वाढवितात. प्रत्येक घरीं 'आवश्यक' असणारीं ही 'माल्टेक्स' विस्किटें.
साठे विस्किट ॲण्ड चॉकोलेट कं. लि. पुणें-२.
साठे
बिस्किटें
SBC
बिस्किटाचा प्रत्येक पुडा समाधानाचा व सौख्याचा जणूं ठेवा !
'beroe' SBC-266 MAR

# श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

## निवडक निरूपणे



[श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या अनेक भक्तांनी निरनिराळ्या वेळी श्रीमहाराज सांगत असताना लिहून घेतलेली निरूपणे अहमदाबादचे श्रीमहाराजांचे एक भक्त श्री. गो. सी. गोखले, B. Sc. ( टेक् ), यांनी बऱ्याच परिश्रमांनी संग्रहित केली आहेत. हा संग्रह ' यशवंत प्रकाशन ' तर्फे प्रकाशित होणार आहे. या संग्रहापैकी काही निवडक निरूपणे यापुढे काही दिवस ' माणूस साप्ताहिका 'च्या दर अंकातून देण्याचे योजले आहे. —सं.]

### १ : परमात्मस्वरूपच असणारे नाव

नाम म्हणजे भगवंताचे नाव. देवाच्या कोणत्याही नावात फरक नाही. नाम हा जीव आणि शिव यांमधील दुवा आहे. नाम हे साध्य आहे व साधनही आहे. नाम हे सगुण आहे आणि निर्गुणही आहे. नामाचा आरंभ सगुणात आहे व शेवट निर्गुणात आहे. आरंभ सगुणात आहे असे म्हणण्याचे कारण हे की, भगवंत मुळात जो निराकार, निर्गुण आहे, तो जेव्हा सगुणात आला तेव्हाच त्याला नामरूप लागले व सगुणरूप नाहीसे झाले तरी नाम शिल्लकच राहिले; म्हणून ते निर्गुणही आहे. तेव्हा सगुण किंवा निर्गुण भक्तीला नामाचाच आधार आहे. नाम हा सत्संगाचा पाया आहे व कळसही आहे. नाम म्हणजे आपली वृत्ती व भगवंत यांना जोडणारी साखळीच आहे. लग्न झाल्यावर स्त्री जशी नवऱ्याशी एकरूप होऊन जाते, त्याप्रमाणे वृत्तीचे नामाशी लग्न होऊन ती नामरूप झाली पाहिजे. अन्नाला स्वतःची चव असते, त्यामध्ये आपण आपली गोडी व आवड घालून नंतर ते खातो. पण नामाला स्वतःची अशी चव नाही. त्याच्यामध्ये आपणच आपली गोडी घालून ते घेतले पाहिजे. आपण जितकी जास्त गोडी त्यामध्ये घालू तितके ते अधिक गोड लागेल. पंढरपूरला जाण्यास अनेक रस्ते आहेत पण सर्वांना शेवटी बारीतून जाऊनच देवदर्शन घ्यावे लागते. त्याप्रमाणे इतर साधने जरी केली तरी नामसाधन केल्यावरच आत्मस्वरूपाची प्राप्ती होते. आपण नाम घ्यावे, ते आपणच आपल्या कानांनी

ऐकावे आणि ते घेता घेता त्यात शेवटी स्वतःला विसरून जावे हाच नामसाधनेतील आनंदाचा मार्ग आहे. ताकात लोणी असते, ते वर दिसत नाही. पण ताक घुसळल्या-वर जसे ते वर येते, तसे भगवंताचे नाम आपण घेतले की त्याचे प्रेम आपोआप वर येते. अंतःकाळी अगदी शेवटी सुटणारी वस्तू म्हणजे भगवंताचे नाम पाहिजे. नामात शेवटचा श्वास गेला पाहिजे. नामात एका आनंदाशिवाय दुसरे काही नाही.

## २ : नाम–रूपाचा संबंध

नाम घेत असता रूपाचे ध्यान आवश्यक आहे का ? वास्तविक, नाम आणि रूप ही भिन्न नाहीतच. " नाम तेचि रूप, रूप तेचि नाम । नाम रूप भिन्न नाही नाही " (नामदेव). नाम हे रूपाच्या आधीही आहे व नंतरही उरते. नाम रूपाला व्यापून असते. वाल्मिकींनी राम जन्माला येण्यापूर्वी रामायण लिहिले व त्यात वर्णन केल्याप्रमाणे रामाने मागाहून जन्म घेऊन आचरण करून दाखविले. म्हणजे रूप अस्तित्वात येण्यापूर्वी नाम होते व रूप गेल्यानंतरही आज नाम शिल्लक आहे; तेव्हा नाम घेणे हे मुख्य आहे. ते घेत असताना रूपाचे ध्यान राहिले तर उत्तमच, पण ते तसे न राहिले तरी नाम घेत असताना रूपाचे स्मरण सूक्ष्मरूपाने असतेच असते. समजा, एका गृहस्थाच्या घरी ' राम ' नावाचा गडी आहे. तो गृहस्थ ' राम, राम ' असा जप करीत बसला आहे. पण त्याचे लक्ष रामरूपाकडे नाही, मनात काहीतरी दुसरेच विचार चालू आहेत, अशा वेळी त्याला जर एकदम विचा-रले की, " तुम्ही कोणाचे नाव घेत आहात ? " तर " अर्थात रामाचे ". असे तो उत्तर देईल. हे उत्तर देत असताना त्याचे मनात ' दाशरथी राम ' हीच व्यक्ती असणार, ' राम गडी ' ही व्यक्ती नसणार. याचाच अर्थ असा की नाम घेत असताना रूपाचे ध्यान सूक्ष्मरूपाने आत जागृत असते. म्हणूनच नामस्मरण करण्याचा अट्टा-हास ठेवावा; त्यात सर्व काही येते. रूप येत नाही म्हणून अडून बसू नये.

एखाद्या माणसाची व आपली ओळख असेल तर पहिल्याने त्याचे रूप पुढे येते व नंतर नाम येते. पण आपली त्याची ओळख नसेल व आपण त्याला बघितलेला नसेल, तर त्याचे नाव आधी येते व नंतर रूप येते. आज आपल्याला भगवंताची ओळख नाही म्हणून त्याचे रूप माहीत नाही, परंतु आज आपल्याला नाम घेता येईल. आणि त्याचे नाम घेताना त्याची आठवण आपल्याला होते हा आपला अनुभव आहेच. भगवंताचे रूप तरी निश्चित कोठे आहे ? एक राम ' काळा ', तर दुसरा ' गोरा ' असतो. एक राम ' लहान ' तर एक ' मोठा ' असतो, एक राम ' उग्र ' तर एक ' सौम्य ' असतो. पण सर्व रूपे एका रामाचीच असतात. भगवंत स्वतः अरूप आहे, म्हणून जे रूप त्याला द्यावे तेच रूप त्याचे असते. यासाठी आपण कोणत्याही रूपामध्ये त्याचे ध्यान केले तरी चालते.

## सोबत

केतकीच्या बनातुनी
उमलणाऱ्या सकाळी
सळाळणाऱ्या गंधाची
येते ऐकाया भूपाळी १

श्रावणात सायंकाळी
सोनमोहराच्या गेही
महिरप सोनपंखी
गाते मजला अंगाई २

घनातून चांदण्यांचा
उधळणारा आभास
निराकार निशेतळी
देई मला सहवास ३

अंधःकाराच्या मुखाची
प्रकाशाशी सायुज्यता
पहाटेच्या संथ वेळी
गोंजारिते स्थिरचित्ता. ४

— *उज्ज्वला आगासकर*

## लपंडाव

निळे, नितळ डोळे अधर्मी भोळे
आसवांचे तळे आडवती

पापणीच्या कडा दुःख जडावल्या
शरदाची माया सांडताती

मनी वाहतसे वेदनेचा पूर
ओठांवर सूर बागडती

उरामधे दाटे दुःखाचा उमाळा
गाली आनंदाचा सोनसळा

मुखी मोहरले तृप्तीचे चांदणे
अतृप्तीचे व्रण ठणकती

करू नये तुझ्या व्यथेची कणव
लपविशी रण अंतरात

अहंकार तुझा; ओठ दाताखाली
लपंडाव क्रूर आत्मघाती

— *गजानन देव*

## रंगधारा

लांबते खाली उन्हाची मान येथे कापलेली
वाळवंटाची समाधी पाऊलांनी शापिलेली
काळजी वाहून गेले काठ दोन्ही सावल्यांचे
पाहताना दूर झाले देहपक्षी कापराचे

बाहुल्यांचे लग्न होता मेंदिपरी त्या रंगल्या
पंगती बसणार केव्हा\मैत्रिणी झोपून गेल्या
अंतरी गोंगाट होता केसातुनी गळती फुले
अंगावरी धावून येती गॅस बत्त्यांची मुले

पायऱ्या चढताच कानी ये गीतांचा गोड वारा
पोपटी चोचीत आल्या संगीताच्या रंगधारा
पालखी खांद्यावरोनी चाललेली सासरी
आडरानातुन घुमते अर्धमेली बासरी

प्राण देताना जरासे बिंब डोळी पारखे
चित्र थोडे फाकताना श्वास काळासारखे
ही कहाणी रेशमाची रोमरोमी गोंदलेली
लोंबते खाली उन्हाची मान येथे कापलेली

— सुधाकर देशमुख

## आस्वाद

नव्या कवितेत चमत्कृती हाच आत्मा वाटतो. आमच्या या तीनही कविता वातावरणनिर्मितीच्या दृष्टीने सुंदर आहेत. सोबत या कवितेत उज्ज्वला आगासकर काहीशा गूढवादात शिरलेल्या दिसतात. सृष्टी आणि आंतरविश्व यांच्यांतले अद्वैत रंगविण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. त्यांच्या कवितेत गंध सकाळतो आणि आभास उधळतो ! निशेच्या तळी या कल्पनेत त्यांना श्लेष तर साधायचा नाही ना ? कविता धूसर आहे. काही आकृती अस्पष्ट वाटतात. पण ती दुर्बोध आहे असे म्हणता येणार नाही.

त्या मानाने गजानन देव यांना काय म्हणायचे आहे हे वाचकाला अधिक सुबोधपणे कळते. 'सितमगर' म्हणजे निष्ठुर प्रेयसी असा उर्दू काव्यातला एक लोकप्रिय संकेत आहे. 'लपंडाव' मध्ये तो रंगविलेला दिसतो. बाकीच्या सुबोध व स्पष्ट निवेदनात 'अधर्मी डोळे' जरा खटकतात. 'शरदाची माया' मध्येच येते. गोळावेरीज अर्थ कळतो. पण ती कल्पना मागल्या शब्दांतून साहजिकपणे आलेली आहे, असे भासत नाही. चमत्कृतिविसदृश कल्पना किंवा शब्द एकत्र आणून निर्माण होत असली तरी दोघांत आंतरिक दुवा पाहिजेच.

एखाद्या कवितेतला रस कोणता हे सांगता आले तरी त्यांतल्या प्रतिमा कळतातच असे नाही. नव-कविता ही अशी काहीशी आहे. 'रंगधारा' ही कविता त्या दृष्टीने प्रातिनिधिक ठरायला हरकत नाही. वृत्तांत थोडा अनियमित लय दोन-चार ठिकाणी आला आहे. 'बाहुलीचे लग्न', 'अंगावरी धावून...' इ. जागा इतर सर्व कविता शुद्ध रचनेच्या असल्याने कानाला खटकतात. उन्हाची कापलेली मान किंवा सावल्यांचे वाहून गेलेले काठ या प्रतिमा चांगल्या आहेत. ही कहाणी एकाद्या अपयशी प्रेमिकेची आहे का ? पालखी कुठे चालली होती ? निराश प्रेमिक रानात बसून आपल्या भग्न हृदयाची बासरी वाजवीत होता की काय ? असे आपण काही कपटे जुळविण्याचा प्रयत्न करतो. अर्थात् पूर्ण समाधान होत नाही. पण ते जुळविण्याच्या नादात आपण रंगून जातो हे मात्र खरे.

— गोपीनाथ तळवलकर.

एका खोलीत आम्ही बसलो आहोत, अॅटकिन्सनने आपल्या पत्नीला झोपायला पाठवून दिले आहे, त्याच्या तोंडात मी दिलेला सिगार आहे. हातात कसलं तरी हत्यार घेऊन त्याला दगडावर धार लावण्यात तो गुंग होऊन गेला आहे—

नारायण धारप

# काळरात्र

**फेनिस्टन रोड, क्लॅपहॅम.**

ऑगस्ट २०, १९०– आजचा दिवस माझ्या आजवरच्या आयुष्यात अगदी संस्मरणीय असा समजावा लागेल, याबद्दल मला शंका नाही. आणि घडलेले प्रसंग मनात अजून अगदी ताजे आहेत तोवरच ते, जसेच्या तसे, लिहून ठेवायचा माझा विचार आहे. अगदी काहीही न गाळता.


माझ्या नावापासूनच सुरवात करतो. नाव जेम्स क्लॅरेन्स विदेनक्रॉफ्ट. माझं वय चाळीस वर्षांचं आहे; माझी प्रकृती उत्तम आहे, निकोप आहे; आजवर मला एक दिवससुद्धा बरं नसल्याचं आठवत नाही.

माझा व्यवसाय चित्रकाराचा आहे. त्यात मी मोठंसं नाव कमावलंय् असं नाही. पण माझ्या वैयक्तिक व साध्यासुध्या गरजा भागविण्याइतके पैसे मी माझ्या ड्रॉइंग्स्, स्केचेस् आणि पेन्सिलवर्क यांवर सहज मिळवू शकतो.

मला सर्वांत जवळची नातेवाईक म्हणजे एकुलती एक बहीण होती. तीही पाच वर्षांपूर्वी वारली आणि तेव्हापासून मी अगदीच सडाफटिंग झालो.

आज सकाळी नऊच्या सुमारास माझी न्याहरी आटोपली. सकाळचं वर्तमानपत्र जरा चाळून पाहिलं आणि मग पाईप शिलगावून मी आरामात बसलो; मनात वाटेल ते विचार येत होते; मनात आशा एकच होती की, यातूनच आपल्याला रेखाटण्यास योग्य असा एखादा विषय सुचेल.

दारं आणि खिडक्या उघड्या होत्या पण तरीही खोलीत विलक्षण उकाडा होत होता. या उकाड्याला त्रासून मी मनाशी असं म्हणत होतो की, आता गारवा हवा असला तर त्यासाठी एखाद्या पोहोण्याच्या तलावावरच जायला हवं; आणि त्याच क्षणी माझ्या मनात ती कल्पना आली.



मी चित्रं रेखाटायला सुरुवात केली. कामात माझं मन इतकं एकाग्र झालं की दुपारच्या जेवणाचंही मला भान राहिलं नाही; शेजारच्या चर्चच्या घड्याळात जेव्हा चारचे ठोके पडले, तेव्हा कोठे मी काम थांबवलं. चित्र जवळजवळ पूर्ण झालं होतं. तसं पाहिलं तर रेषा घाईतच मारल्या होत्या. पण चित्राकडे पाहता पाहता माझी खात्री झाली की हे आपल्या सर्वोत्कृष्ट चित्रांपैकी एक आहे.

न्यायाधीशांनी शिक्षा दिल्यानंतरच्या क्षणात पिंजऱ्यातला आरोपी कसा दिसेल हा चित्रविषय होता. आरोपी लठ्ठ होता—अतिशय लठ्ठ होता. त्याच्या हनुवटीखाली, मानेभोवती चरबीच्या जाड जाड वळकट्या होत्या. चेहरा साफ होता (मला असं सुचवायचं होतं की, काही दिवसांपूर्वी चेहऱ्यावरची दाढी साफ केली होती); डोक्यावर जवळजवळ केस नव्हतेच—टक्कल होतं. तो पिंजऱ्यात उभा होता. त्याची

आखूड, बेढब बोटं पिंजऱ्याच्या कड्याभोवती घट्ट आवळली होती; त्याची नजर समोर खिळलेली होती. त्याच्या चेहऱ्यावरचे भाव भीती तर दाखवतही तेच—पण तो चेहरा असं दाखवत होता की त्या माणसाचं सर्व आयुष्यच एका क्षणात कोसळलं आहे, पार बरबाद झालं आहे; पायाखालचा आधारच क्षणार्धात नाहीसा झाला आहे.

असं वाटत होतं की मांस-चरबीचा हा प्रचंड ढीग केवळ उभा ठेवण्याइतकीही शक्ती आता त्याच्यात राहिली नव्हती. त्याचं त्राणच गळून गेलं होतं.

मी त्या चित्राची गुंडाळी केली आणि खिशात कोंबली. का विचाराल, तर मला सांगता येणार नाही. मनात एक अलौकिक समाधान होतं—आपण आज एक उत्तम गोष्ट उत्तम प्रकारे केली आहे. त्या समाधानातच मी घर सोडलं.

बाहेर पडताना मनात अशी कल्पना होती की, ट्रेंटनकडे जावं; असं काहीतरी ठरवलं असलं पाहिजे; कारण मला पक्कं आठवतं की मी लिटन् स्ट्रीटने गेलो. उजव्या हाताचं वळण घेऊन गिलक्रिस्ट रोडला लागलो. पुढे टेकडीचा पायथा होता आणि तेथे नव्या ट्रॅम रस्त्याचं काम करणारे मजूर पाहिल्याचं मला नक्की आठवतं.

तेथून पुढे मात्र मी कोठे नि कसा गेलो, याबद्दलच्या माझ्या आठवणी अगदी अंधुक आहेत. एक गोष्ट मात्र त्या वेळी सारखी जाणवत होती—विलक्षण उकाडा. धुळीने माखलेल्या डांबरी सडकेवरून या उष्णतेच्या गरम झळा मोठमोठ्या लाटांसारख्या उसळत होत्या. आकाशात पश्चिमेच्या बाजूला रक्तवर्णी ढगांची रासच्या रास रचली होती. अगदी खाली आल्यासारखी. त्यातून एकदाची वीज कडाडावी आणि मुसळधार पाऊस कोसळावा, अशी मनातल्या मनात प्रार्थना करीत मी चाललो होतो.

किती चाललो असेन्? पाच मैल? माझं लक्षच नव्हतं. मध्येच एका लहान पोराने मला वेळ विचारली आणि मी भानावर आलो.

सातला वीस मिनिटे कमी होती.

तो पोरगा निघून गेल्यावर मी आसपास जरा ध्यान देऊन पाहिलं. माझ्यासमोर एक फाटक होतं. आत कोरड्या मातीचं अंगण होतं. बाजूंनी फुलांची बॉर्डर होती. जांभळी फुलं, लाल जिरॅनियम. फाटकावरच एक पाटी होती.

चार्लस अॅट्किन्सन.
स्मारके इ. वरचे उत्तम शिल्पकार.
इंग्लिश आणि इटालियन संगमरवरात कामे करून मिळतील.

अंगणातून विविध आवाज येत होते. कोणीतरी खुशीत येऊन स्वतःशीच शीळ घालीत होतं; हातोड्यांच्या घावांचा आवाज; पोलादी छिन्नी फत्तरावर आपटल्याचा एक आवाज.

मला एकदम आत जाण्याची इच्छा झाली.

माझ्याकडे पाठ करून एक मनुष्य बसला होता. समोरच्या संगमरवरी पाषाणाच्या शिल्पकामात तो दंग झाला होता. संगमरवरावर जरा चमत्कारिक वाटणाऱ्या रेषांचे जाळे होते. माझ्या पावलांचा आवाज ऐकताच त्याने मान वळवून मागे पाहिलं आणि हातातलं काम थांबवलं.

मी सकाळी ज्या माणसाचं चित्रं काढलं होतं तोच हा माणूस ! आतासुद्धा त्याचं चित्र माझ्या खिशात होतं.

-तो एका ओबडधोबड दगडावर बसला होता. तेच ते अजस्र, अवाढव्य शरीर. कपाळावरून व मानेवरून ओघळणाऱ्या घामाच्या धारा. मधून मधून तो एका लाल-रंगाच्या रेशमी रुमालाने त्या पुसत होता. चेहरा जरा चित्रातलाच होता तरी त्या-वरचे आताचे भाव मात्र संपूर्णपणे वेगळे होते.

आम्ही जणू जुने मित्रच असावेत इतक्या मोकळेपणाने हसून त्याने माझे स्वागत केले, माझ्याशी हस्तांदोलन केले.

त्याच्या कामात व्यत्यय आणल्याबद्दल मी त्याची माफी मागितली.

"बाहेर जिकडे तिकडे रखरखीत आहे, उन्हाने जीव नकोसा झालाय," मी म्हणालो. "ही जागा वाळवंटातल्या एखाद्या ओऍसिस्सारखी वाटते–थंड."

"आता ओऍसिस् वगैरे मला समजत नाही" तो म्हणाला, "पण आज गरमी होतीय्–विलक्षण उकाडा आहे–हे मात्र कबूल. या, बसा तरी जरा वेळ ?"

ज्या समाधिशीळेवर त्याचं कोरीव काम चाललं होतं. त्याच्याच् एका टोकाकडची जागा त्याने दाखवली आणि मी तिथे बसलो.

"कामाला हा फार उत्तम फत्तर मिळालेला दिसतो तुम्हांला–" मी म्हणालो.

त्याने नकारार्थी मान हलवली. "म्हटलं तर आहे–" तो म्हणाला; "वरचा पृष्ठभाग तर इतका मुलायम आहे, की तसा शोधून सापडायचा नाही; पण मागच्या अंगाला एक खूप मोठा तडा आहे. सांगितल्याशिवाय कोणाच्या ध्याना-तही तो येणार नाही. पण असल्या संगमरवराचं खरंखुरं उत्तम काम तयार करताच यायचं नाही. आताच्यासारख्या उन्हाळ्यात त्याला काही व्हायचं नाही ? कितीही कडक उन पडलं तरी या फत्तरावर एवढासुद्धा परिणाम व्हायचा नाही. पण एकदा हिवाळा येऊ द्या ! एकदा का पाणी गोठायला लागले, की मग हे फत्तरातले दोष काही केल्या लपून राहायचे नाहीत."

"मग हे एवढं कोरीव काम कशासाठी ?" मी कुतूहलानं विचारलं.

तो माणूस खूप मोठमोठ्याने हसला.

"ते प्रदर्शनासाठी आहे म्हणून सांगितलं तर तुमचा विश्वास बसणार नाही, पण ते खरं आहे. चित्रकारांची प्रदर्शनं भरतात; वाण्यांची, कसायांचीसुद्धा भरतात. तशीच आमचीही असतात. थडगी, हेडस्टोन्स्, मेमोरियल टॅब्लेटस्–सर्वांतल्या नव्या नव्या फॅशन्स, काही नवे नमुने–इतर प्रदर्शनासारखीचं."

“आपण अजिबात विसरलांत,

होय ना?”



…स्वाभाविक आहे! निरनिराळ्या, नियमितपणें करावयाच्या खर्चाची व वसुलीची जंत्री ठेवणें हें नाहीं तरी फार मोठें जिकिरीचें काम आहेच! तुमच्या स्मरणशक्तीला एवढा ताण देण्याची आवश्यकता नाहीं. दी बँक ऑफ इंडिया लि. मध्यें खातें उघडून तुमचे विम्याचे हप्ते, घरभाडें, वर्गण्या भरणें, भेटी पाठविणें, तसेंच शेअर्स, कर्जरोख्यांवरील व्याज गोळा करणें इत्यादि कामांसाठीं त्यांना कायम स्वरूपाच्या सूचना देऊन ठेवा म्हणजे झालें!

# दी बँक ऑफ इंडिया लि.

टी. डी. कंसारा, जनरल मॅनेजर

RAAS/B/ 48 A MAR

तो संगमरवरासंबंधी माहिती सांगू लागला. कोणत्या प्रकारांवर वारा आणि पाऊस यांचा अगदी कमी परिणाम होतो, कोणत्या प्रकारच्या दगडांवर कोरीव काम सर्वांत सोपं असतं आणि इतरही. मग तो त्याच्या बागेबद्दल आणि त्याने नवीनच विकत आणलेल्या एका कार्नेशनची माहिती झाली. दर एकदोन मिनिटांत तो हत्यारं खाली ठेवायचा, त्या लालभडक रेशमी रुमालाने मान, गळा, चेहरा पुसायचा आणि उकाड्याला शिव्या द्यायचा.

मी फारसा बोलतच नव्हतो, कारण मला अस्वस्थपणा वाटायला लागला होता. या माणसाची ही भेटच जराशी अकल्पित, अनैसर्गिक, अशी वाटत होती.

मी मनाचं समाधान करायचा प्रयत्न केला. मी या माणसाला पूर्वी कोठेतरी पाहिलं असलं पाहिजे; त्याचा चेहरा माझ्या नकळत माझ्या स्मृतीच्या कोणत्या तरी सांदीकोपऱ्यात साठवून ठेवला गेला असला पाहिजे. पण माझी खात्री पटली की हे विचार म्हणजे दुसरं तिसरं काही नसून आत्मवंचनेचा एक दुबळा प्रयत्न आहे.

ॲट्‌किन्सनचं काम संपलं. एक मोठा सुस्कारा सोडून तो उभा राहिला.

"पाहा! कसं काय वाटतं काम?" अभिमानाने त्यानं मला विचारलं.

आणि मी आता प्रथमच शिळेवर कोरलेली अक्षरे वाचली—

जेम्स क्लॅरेन्स विदेनक्रॉफ्ट.
जन्म. १८ जानेवारी १८६०.
ऑगस्ट २०, १९०—
या दिवशी त्यांना अचानक मृत्यू आला.
त्यांच्या स्मृतीस आदर भावाने अर्पण.

चारी बाजूंनी जीवन उसळत असतं; त्यातच कोठेतरी मृत्यूही असतो.

काही वेळ मी या अक्षराकडं नुसता पाहतच बसलो. आणि मग माझ्या शरीरावर काटा उठणारी एक शहार माझ्या मानेवरून खाली सरसरत गेली.

"हे नाव तुम्ही कोठे पाहिलं आहे?" मी त्याला विचारलं.

"छे:, पाहिलं बिहिलं कोठेच नाही!" ॲट्‌किन्सन म्हणाला. "कोरायला काही तरी नाव हवं होतं. जे मनात प्रथम आलं ते घेतलन् काय! का बरं? त्या नावात तुम्हांला एवढी उत्सुकताशी वाटते?"

"मोठा चमत्कारिक योगायोग म्हटला पाहिजे—ते माझं नाव आहे."

त्याच्या तोंडून एक खूपशी शीळ निघाली.

"आणि त्या तारखा?"

"त्यांपैकी एकीचीच मी खात्री देऊ शकतो—ती बरोबर आहे."

"काय विलक्षण प्रकार आहे बुवा!" तो म्हणाला.

पण अजून त्याला सगळा प्रकार माहीत नव्हता. मी त्याला सकाळच्या माझ्या चित्राची हकीकत सांगितली. खिशातलं गुंडाळलेलं चित्र बाहेर काढून मी ते

त्याच्या समोर धरलं. त्या चित्राकडे पाहता पाहता त्याच्या चेहऱ्यांवरचे भाव इतके बदलायला लागले, की शेवटी त्याचा चेहरा खरोखरीच माझ्या चित्रातल्या चेहऱ्यासारखा दिसायला लागला.

"आणि दोन दिवसांपूर्वीच बोलता बोलता मी मारियाला सांगत होतो, की भुतंबितं सगळं काही झूट आहे!" तो म्हणाला.

आमच्या दोघांपैकी कोणालाच भूत दिसलं नव्हतं, पण त्याच्या बोलण्याचा आशय माझ्या लक्षात आला.

"तुम्ही कोठेतरी माझं नाव ऐकलं असेल." मी म्हणालो.

"आणि तुम्ही कोठेतरी मला पाहिलं आहे आणि ते विसरून गेला आहात! मागच्या जुलैत तुम्ही क्लॅक्टनला होतात का?"

मी क्लॅक्टनला माझ्या उभ्या जन्मात गेलेलो नाही. आम्ही दोघं काही वेळ गप्प बसलो. आम्ही दोघंही एकाच गोष्टीकडे पाहत होतो. समोरच्या फत्तरावर कोरलेल्या त्या दोन तारखा आणि त्यातली एक बरोबर होती.

"आत येता? काही जेवणखाण तरी करू या—" अॅट्किन्सन म्हणाला.

त्याची बायको लहानखोर पण हसतमुख आहे. खेडचापाडचांत वाढलेल्या माणसांचा रसरशीतपणा तिच्या गालांवर आहे. अॅट्किन्सनने माझा परिचय 'एक जुना चित्रकार मित्र,' असा करून दिला. त्याचा परिणाम मात्र भलताच झाला; कारण जेवणाचं टेबल साफ झाल्यावर त्याची बायको कपाटातलं एक सचित्र कोरं बायबल घेऊन आली आणि जवळजवळ अर्धा तासभर मला तिथे बसून त्या चित्रांची प्रशंसा करीत राहणे भाग पडले.

जरा वेळाने मी बाहेर आलो; अॅट्किन्सन त्या कोरलेल्या शीळेवर बसून पाईप ओढत होता. मघाशी जेथे आमचं संभाषण थांबलं तेथून ते आम्ही परत पुढे सुरू केलं.

"तुम्हांला एक विचारतो त्याचा राग मानू नका हं—" मी म्हणालो. "पण तुम्ही असं काही कधी केलं आहे का की ज्यासाठी तुमच्यावर खटला भरला जाईल?"

त्याने नकारार्थी मान हालवली.

"माझा धंदा व्यवस्थित चालला आहे तेव्हा दिवाळखोरीचा वगैरे प्रश्न नाही. तीन वर्षांपूर्वी एकदा नाताळच्या सुमारास तुरुंगाच्या वॉर्डनना काही टर्की बर्डस् दिले होते. तेवढंच काय ते आठवतं," तो म्हणाला. "आणि ते पक्षी अगदी लहान होते—" जरा वेळाने आठवून तो पुढे म्हणाला.

जराश्याने तो उठला, पोर्चमधली झारी आणून झाडांना पाणी द्यायला लागला. "उन्हाळ्यात अगदी नेमाने दिवसातून दोनदा पाणी देतो—" तो म्हणाला. "आणि तरीही काही काही वेळा त्यातली नाजूक झाडं उन्हात सुकतातच. फर्न्स! ती तर

अशा उन्हाळ्यात जीवच धरायची नाहीत."

"तुम्ही कोठे राहता?" मध्येच त्यानं विचारलं.

मी त्याला माझा पत्ता दिला. आता घरी जायचं म्हटलं तर अगदी चटपट पावलं उचलली तरी तासापेक्षा कमी वेळ लागणार नाही.

"हे पाहा–" तो म्हणाला, "आपण याचा सरळ विचार करू या. जर तुम्ही आता घरी निघालात तर अपघात वगैरे होण्याचा चान्स आहे. गाड्याघोडे आहेत, केळीची सालं आहेत, नारिंगाची सालं आहेत– काही सांगता येत नाही. शिवाय शिड्या भिंतीला लावलेल्या, पडलेल्या– हे सगळं आलंच–"

या अशक्य गोष्टींविषयी तो इतका गंभीरपणे बोलत होता की, सहा तासांपूर्वी मला त्याचं हसू आलं असतं पण आता मी हसत नव्हतो.

"सर्वांत उत्तम उपाय म्हणजे तुम्ही येथेच बारा वाजेपर्यंत थांबा." तो पुढे म्हणाला. "आपण वर माझ्या खोलीत जाऊ; एखादादुसरा पाईप, एखादं ड्रिंक घेऊ, तेथे उकाडा जरा कमी वाटेल; चला."

मी होकार दिला. माझं मलाच त्याचं आश्चर्य वाटतं.

छपराखालच्या एका बसक्या, लांबट खोलीत आम्ही बसलो आहोत. ॲट्किन्सनने आपल्या पत्नीला झोपायला पाठवून दिलं आहे. त्याच्या तोंडात मी दिलेला एक सिगार आहे. हातात कसलं तरी हत्यार घेऊन त्याला दगडावर धार लावण्यात गुंग झाला आहे.

हवेत वीज भरल्यासारखी भासत आहे. उघड्या खिडकीपाशी बसून एका डगमगत्या टेबलावर मी हा मजकूर लिहीत आहे. टेबलाचा एक पाय पिंजला आहे. ॲट्किन्सन हत्यारं वापरण्यात एकंदर वाकबगार दिसतो. पटाशीला धार लावून झाली की तो टेबलाचा हा पाय दुरुस्त करणार आहे.

आता अकरा वाजून गेले आहेत. एक तास पुरा व्हायच्या आत मी गेलेला असेन.

पण उकाडा वाढतो आहे– जीव अगदी गलबलतो आहे.

एखाद्याला या विलक्षण उकाड्याने वेडसुद्धा लागेल.

[ H. R. Wakefield यांच्या 'August Heat' चे भाषांतर ]

• • •



# आणि ड्रॅगन जागा झाला




अरुण साधू

हजारो वर्षे साऱ्या जगाकडे डोळेझाक करून स्वतःच्या संस्कृतीच्या पांघरुणाखाली सुस्तावत पडलेला ६० कोटी लोकसंख्येचा प्रचंड चीन १९४९ साली अत्यंत कर्मठ अशा चिनी कम्युनिस्ट चाबकाच्या फटकाऱ्यांनी एकदम खडबडून जागा झाला.

"चिनी ड्रॅगन सुस्त झोपला आहे तोवर ठीक आहे; जागा झाल्यास तो साऱ्या जगाला हादरून सोडील," असे अनेक मुत्सद्यांनी वारंवार दिलेले इशारे चीनच्या कम्युनिस्ट राजवटीने आंतरराष्ट्रीय राजकारणात एकामागून एक धक्के देत खरे करून दाखविले.

चिनी कम्युनिस्टांचा तत्त्वपालनाचा आत्यंतिक अतिरेक, रशियन कम्युनिस्ट पक्षाचे वर्चस्व झुगारून देऊन आपल्या पंथाचा वेगळा झेंडा उभारून अभेद्य अशा कम्युनिस्ट चळ-



वळीत माओ-त्से-तुंगने पाडलेली फूट, अल्पकाळात भौतिक क्षेत्रात चीनने केलेली विस्मयजनक प्रगती, पण त्याचबरोबर व्यक्तिस्वातंत्र्याची केलेली अमानुष दडपशाही, भारतावरील आक्रमण, अण्वस्त्रांची चाचणी, आफ्रो-आशिया व लॅटिन अमेरिका यांमधील त्यांचे चढाईचे धोरण या व अशा अनेक गोष्टींमुळे चीनने साऱ्या जगात स्वत:विषयी आत्यंतिक कुतूहल निर्माण केले आहे. आपल्या अतिरेकी धोरणांमुळे ते सध्या जगातील अत्यंत "धोकेबाज" राष्ट्र बनले आहे.

१९४८ साली "कम्युनिस्टांचा सहा महिन्यांच्या आत नि:पात करू" अशी चिनी कोमिन्टांग सरकारची घोषणा हवेत विरते न विरते तोच १९४९ च्या डिसेंबरपर्यंत कम्युनिस्टांच्या लाल फौजांनी साऱ्या चीनचा कबजा केला. आणि अमेरिका व इतर लोकशाही राष्ट्रांचे भरपूर आर्थिक आणि लष्करी पाठबळ असलेल्या चँग-कै-शेकच्या सरकारला मात्र चिनी मुख्य भूमीवरून चंबूगबाळे आवरून फॉर्मोसात पळ काढावा लागला.

ही किमया चिनी कम्युनिस्टांनी साध्य केली तरी कशी? प्रस्तुत लेखमालेवरून या किमयेची थोडी कल्पना येऊ शकेल.

माओ-त्से-तुंगचे चरित्र हे या लेखमालेचे सूत्र. या सूत्राच्या अनुषंगाने कम्युनिस्ट चळवळीची कथा सांगण्याचा व आधुनिक चीनची ओळख चटकदार भाषेत करून देण्याचा हा प्रयत्न...

—संपादक

पेकिंगमधील १ ऑक्टोबर १९४९ ची ती सकाळ अतिशय स्वच्छ आणि प्रसन्न होती. शहरातील ऐतिहासिक मुख्य चौक – तियेन आन मेन – तळपत्या सूर्याच्या प्रकाशात अक्षरश: लक्षावधी स्त्री–पुरुष, बालकांनी फुलून निघाला होता आणि त्या लक्षावधी कंठांतून एकरवाने घोषणा निघत होत्या "चिनी क्रांतीचा जयजयकार असो", "माओ – त्से – तुंग जिंदाबाद."

त्या प्रचंड लोकसमुदायाचे लक्ष – तियेन आन मेनच्या – 'स्वर्गीय शांतीच्या प्रवेश द्वारा' च्या उंच चौथऱ्यावर केंद्रित झाले होते. कम्युनिस्ट क्रांतीचा नेता आणि आता चिनी जनतेचा दैवत बनलेला माओ-त्से-तुंग, चुह तेह, चाऊ एन् लाय, लिऊ शाओ ची आदी इतर सहकारी आज आपले स्वप्न साकार झाल्याच्या समाधानात चौथऱ्यावर उभे होते. आपल्या माना लांब लांब करून हसऱ्या आनंदी चेहऱ्याने त्या समुदायातील प्रत्येक व्यक्ती चौथऱ्यावर लक्ष देऊन होती आणि एक-सुराने, एक तालाने माओला उद्देशून चिनी भाषेतील गाणी गात होती.

**" त्याच्या संगे बांधू आम्ही एक चीन नवा,**
**अय्यय्यो,**
**तो दाखविल अम्हा भक्तिव्याचा प्रकाश नवा."**

लक्षावधी मुक्त कंठांतून निघालेल्या त्या तुमुल ध्वनीने सारे आकाश भरून गेले होते आणि पुन: पुन्हा ते स्त्री-पुरुष गात होते,......

**" अहाहा**
**तूच आमुचा सूर्य प्रभावी तूच विजय पताका,**
**तुझिया संगे गाऊ आम्ही नव्या जगाच्या गाथा. ......"**

दूर विस्तारलेल्या त्या चौकातील प्रत्येकालाच माओचा चेहरा स्पष्ट दिसत होता असे नाही. परंतु ज्या प्रवेशद्वाराच्या उंच चौथऱ्यावर तो उभा होता, त्याच्या मागील मोठ्या ऐतिहासिक भिंतीवर लावलेले माओचे प्रचंड आकाराचे चित्र त्यांच्याकडे हसऱ्या चेहऱ्याने बघत होते.

तसे ते हसऱ्या चेहऱ्याचे, साधी कापडी गोल टोपी घातलेले माओचे चित्र आज हजारो चिनी शहरांतून व लक्षावधी खेड्यांतून सर्वत्र दिसत होते. आणि कोट्यवधी चिनी कंठांतून त्याच घोषणा, तीच सुप्रसिद्ध गाणी मोठ्या उत्साहाने निघत होती. उत्साहाचे तेच विद्युन्मय वारे आज साऱ्या चीनभर पसरले होते. कारण चीनच्या इतिहासात आज एक महान घटना घडणार होती. नव्या चीनचा आज औपचारिक जन्म होणार होता. चीनमधील अराजकाला, चीनच्या अप्रतिष्ठेला आज मूठमाती मिळणार होती. पंचवीस वर्षे हालअपेष्टांत काढल्यानंतर अखेर आज चिनी कम्युनिस्टांची क्रांती सफल होऊन तिचे फळ हाती येत होते. हजारो वर्षे जुलमी राजे-राजवाड्यांच्या राजवटीमध्ये घोरत पडलेला चीन आज अत्यंत कर्मठ अशा कम्युनिस्ट चाबकाच्या फटकाऱ्याने जागा होऊन एका नव्या जगात, नव्या युगात प्रवेश करीत होता. आणि या अभूतपूर्व घटनेचे स्वागत करण्यासाठीच पेकिंगमधील लोक वेड्या उत्साहाने लाखोंच्या संख्येने 'तियेन आन मेन' मध्ये जमले होते.

## ऐतिहासिक क्षण

त्या कोट्यवधी चिनी जनतेच्या आशा-आकांक्षांचे आणि क्रांतीच्या सफलतेचे



तियेन आन मेनच्या सज्जावरून ... माओ, लिउ शाओची इत्यादी

प्रतिक बनलेला माओ-त्से-तुंग मात्र अजून आपल्या गरीब शेतकऱ्याच्या वेशातच होता. अंगात तोच जीर्ण आतेळी कोट आणि डोक्यावर तीच सुरकुत्या पडलेली, कडेच्या दशा निघालेली जुनी गोल टोपी होती. येनानच्या गुहांमधून १२ वर्षांपूर्वी भूमिगत अवस्थेत हिंडत असताना जसे झिजलेल्या तळव्यांचे बूट त्याच्या पायांत असायचे तसेच बूट आजही होते आणि चित्रातले तेच हास्य चेहऱ्यावरही होते. तो येनान-मध्ये असताना त्या वेळच्या चँग-कै-शेकच्या कोमिन्टांग सरकारने त्याच्या डोक्यासाठीं सुमारे १३ लाख रुपयांचे बक्षीस लावले होते. पण आज साऱ्या चीनचे भविष्य त्याच्या हाती एकवटले होते. जगाची एक पंचमांश लोकसंख्या त्याचा शब्द न् शब्द शिरसावंद्य मानावयास तयार होती.

आणि तो ऐतिहासिक क्षण जवळ आला. अवध्या लोकसमुदायात एकदम शांतता पसरली. थोडे पुढे सरकून समोरच्या ध्वनिक्षेकावरून आपल्या धीरगंभीर आवाजात साऱ्या चिनी हृदयांतून विजेची लाट खेळविणारी घोषणा माओने केली, " चिनी जनतेचे एकमेव प्रतिनिधित्व करणारे मध्यवर्ती प्रजासरकार आज स्थापन होत आहे."

मग स्वर्गीय शांतीच्या त्या उंच ऐतिहासिक चौथऱ्यावरून माओ-त्से-तुंगने चिनी प्रजासत्ताक राज्याचा व चीनच्या मध्यवर्ती प्रजासरकारचा जन्म झाल्याचे उभ्या जगताला उद्देशून जाहीर केले. चिनी कम्युनिस्टांच्या झंझावाती विजयाने दिङ्मूढ झालेल्या जगातील साऱ्या राष्ट्रांना उद्देशून त्याने औपचारिक संदेश दिला—

"चीनचे मध्यवर्ती प्रजासरकार (Central People's Govornment) हेच चिनी प्रजासत्ताक राज्यांतील जनतेचे एकमेव घटनाधिष्ठित सरकार आहे. पृथ्वीवरील जी जी सरकारे, समानतेची, परस्पर हिताची आणि सार्वभौमत्वाची तत्त्वे मान्य करतील त्या सर्वांशी राजकीय संबंध प्रस्थापित करण्याची आमच्या सरकारची इच्छा आहे."

लगेच स्वतंत्र कम्युनिस्ट चीनच्या पहिल्या जन्मदिनाच्या विजयी संचलनाला सुरुवात झाली. कोमिन्टांग सेनेकडून जिंकलेल्या अमेरिकन रणगाड्यांसह चीनच्या सुप्रसिद्ध लाल सैन्याने विजयाची गाणी गात गात त्या चौकातून संचलन केले. जिंकलेल्या जपानी बंदुका खांद्यावर घेतलेले लाल शरीररक्षक, घरी बनविलेले गावठी हातबाँब हाती घेतलेले गनिमी शेतकरी सैनिक, घोडदळ, तोफखाना, लाल नाविक दल, चिलखती गाड्या, लाल सैन्याच्या नाटकमंडळयांतील वृद्ध, तरुण स्त्री–पुरुष व बालके हाती प्रचंड लाल रेशमी ध्वज घेऊन मोठ्या ऐटीत तालाने पावले टाकीत [illegible]ला अभिवादन करीत त्या चौकात जात होते. गेली दोन दशके कम्युनिस्ट क्रांतीसाठी लाल सैन्याने भोगलेल्या हालअपेष्टा, कर्तृत्व, कमावलेली कीर्ती आज प्रत्यक्ष तियेन आन मेन म्धून लक्षावधी जनतेच्या हर्षाच्या आरोळयांना साद देत संचलन करीत होती. एक प्रचंड अक्राळविक्राळ शक्ती खडबडून जागी होत असल्याची ती चिन्हे होती.

विजयाच्या तुमुल गर्जनांनी निनादून गेलेल्या त्या चौकासमोरील उंच चौथऱ्यावरही माओ आणि त्याच्या सहकाऱ्यांच्या रूपाने गेल्या दोन दशकांचा इतिहास खडा होता. त्यांची नावे घेताच प्रत्येक चिन्याच्या हृदयात प्रेमयुक्त आदर आणि त्याच्या कोमिन्टांग शत्रूच्या मनात भीतियुक्त दरारा निर्माण होत होता. त्या सर्वांनी एकत्र धोक्यात दिवस घालविले होते, एकत्र कष्ट व यातना सहन केल्या होत्या, एकत्र लढे दिले होते. केवळ दहा वर्षांपूर्वीच त्यांपैकी प्रत्येकाच्या डोक्यासाठी कोमिन्टांग सरकारने लाखांनी बक्षिसे जाहीर केली होती.

[illegible] ते होते. आजपर्यंत सुप्त असलेली चिनी जनतेची ती प्रचंड अक्राळविक्राळ शक्ती जागी होऊन आता त्यांच्या ताब्यात आली होती त्या शक्तीला आपल्या तत्त्वप्रणालीनुसार वळण देण्याच्या अफाट कल्पना त्यांच्या उराशी होत्या. जगातील सर्वांत जास्त लोकसंख्येच्या चीनला आंतरराष्ट्रीय राजकारणातील एक प्रचंड शक्ती म्हणून मान्यता मिळविण्याची, जगातील कम्युनिस्ट चळवळीतील प्रबळ निष्ठावान कम्युनिस्ट पक्ष म्हणून मान्यता मिळविण्याची उत्सुकता त्यांच्यांत होती. जगाने आजवर त्यांच्यावर केलेला अन्याय आणि अपमान निपटून टाकण्याची ईर्षा त्यांच्यांत होती. या मार्गांत जे आडवे येतील त्यांना दूर सारण्याची धमक त्यांच्यात होती. त्या नेत्यांसमोर आणि त्या जनसमुदायासमोर लोकविलक्षण असे भविष्याचे द्वार आता खुले झाले होते.

## हे लोक बंड का करीत नाहीत ?

केवळ चौदाच वर्षांपूर्वी चीनमधील निबिड जंगलांतून, दऱ्याखोऱ्यांतून आणि बर्फाळ शिखरांच्या रांगांमधून पाठलागावर चँक-कै-शेकचे सुसज्ज सैन्य असताना जीवाच्या आकांताने सहा हजार मैलांचा मार्ग तुडविताना या नेत्यांना आणि त्यांच्याबरोबरच्या कडव्या लाल सैनिकांना हा भाग्याचा दिवस इतक्या लवकर उगवेल याची कल्पनाही नव्हती. परंतु कधीतरी हा दिवस उगवेलच अशी निश्चित श्रद्धा मात्र जरूर होती. कारण हजारो वर्षे तेथील राज्यकर्ते आणि जमीनदार यांनी चिनी शेतकऱ्याला अक्षरशः पिळून काढून चीनची भूमी कम्युनिस्ट क्रांतीला अतिशय सुपीक करून ठेवली होती. चिनी शेतकरी हा कदाचित जगातील सर्वांत दुःखी प्राणी असेल. दिवसाचे अठरा तास जमिनीवर राबावे आणि उत्पन्नातला ६० टक्के कर आपल्या जमीनदाराला द्यावा, आणि उरलेल्या धान्यांत कसे तरी दिवस काढावेत' हे त्याचे जीवन. दर तीन-चार वर्षांनी जीवघेण्या दुष्काळाची अथवा महापुराची फेरी ठरलेली. दुष्काळ असो वा सुगी असो, धान्य पिको वा न पिको जमीनदाराचा ६० टक्के कर भरलाच पाहिजे. मग त्यासाठी सारे किडुक-मिडुक विकायचे, अंगावरचे कपडेलत्ते विकायचे, बायका-मुली विकायच्या आणि कसेतरी जीवनाच्या कडेला चिकटून राहावयाचे. हेही कित्येक शेतकऱ्यांना जमत नसे. जमीनदाराच्या वाड्यावर अन्नाची कोठारे भरून पडली असता सारी खेडीच्या खेडी अन्नान्न करून मरत. दर पाच-सहा वर्षांनी अशा दुष्काळात अक्षरशः लाखो स्त्री-पुरुष चीनमध्ये मरत असत.

चिनी शेतकऱ्याची ही स्थिती तर राजकारणात भ्रष्टाचाराने बजबजपुरी माजविलेली. हजारो वर्षे चिनी शेतकऱ्याच्या या स्थितीत बदल झाला नव्हता. अनेक राजघराणी आली आणि गेली; पण चिनी शेतकऱ्याच्या राहणीत, त्यांच्या हालअपेष्टांमध्ये काहीच फरक पडला नव्हता. राजधानीत बंड माजो वा देशावर जपानचे आक्रमण होवो, चिनी शेतकऱ्याच्या दिनचर्येतही फरक पडत नसे. त्याची स्थिती सुधारावयाला, त्याच्या हालअपेष्टा कमी करण्यासाठी साऱ्या चीनला तळापासून ढवळणारी क्रांतीच आवश्यक होती.

क्रांती...क्रांती...हे लोक क्रांती का करीत नाहीत ? बंड का करीत नाहीत ? जमीनदाराच्या घरी धान्याच्या राशीच्या राशी सडत असताना आजूबाजूचे शेतकरी, त्यांच्या बायका–मुली–बापडे अन्नाविना टाचा घासून मरताहेत–असे प्रत्यक्ष दृश्य पाहून येणारे परदेशी प्रवासी विचारीत... "हे लोक क्रांती का करीत नाहीत ? त्या जमीनदारांना का लुटत नाहीत ?..."

क्रांती...क्रांती...१९२९ साली सुर्युआन प्रांतात लाखांच्या संख्येने पडत असलेले भूकबळी स्वतः पाहून आलेला एडगर स्नो नावाचा एक तरुण अमेरिकन पत्रकार

स्वतःशीच म्हणत होता, " हे लोक बंड का करीत नाहीत ? जे नराधम त्यांच्याकडून क्रूरतेने कर वसूल करतात, पण त्यांना खाण्यासाठी काही देत नाहीत, जे जमिनी बळकावून घेतात, पण पाण्याचा कालवाही दुरुस्त करण्याकडे लक्ष देत नाहीत, त्यांच्यावर हे मोठ्या संख्येने चालून का जात नाहीत ? किंवा मोठमोठ्या शहरांमध्ये–जिथे संपत्ती आणि सुबत्ता अक्षरशः वाहते आहे, जिथे त्यांच्या बायका-मुली विकल्या जातात, प्रामाणिक शेतकरी अन्न अन्न म्हणत मरत असताना जिथे मेजवान्यावर मेजवान्या झोडल्या जातात अशा शहरांमध्ये मोठ्या संख्येने घुसून हे लोक क्रांती का करीत नाहीत ? का नाही, का नाही ?..."

क्रांती...क्रांती...याच वेळी चिनी तरुणांचा मायभूमीच्या दारिद्र्याला, शेतकऱ्यांच्या पिळवणुकीला, राजकारणातील भ्रष्टाचाराला आणि परकीयांच्या दास्याला विटलेला एक वर्ग दातओठ खात, मुठी वळवीत स्वतःशीच पुटपुटत होता...'क्रांती क्रांती...क्रांतीशिवाय तरणोपाय नाही......'

अशा या क्रांतीसाठी सुपीक झालेल्या भूमीवर आता या भावनेला, या असंतोषाला संघटित करून तोंड फोडण्याची फक्त गरज होती. आणि या असंतोषाच्या खतपाण्यावरच कम्युनिस्ट विचारसरणीचे बी चिनी भूमीवर पडले.

आज वीस वर्षांच्या जीवन-मरणाच्या अप्रतिहत झगड्यानंतर कम्युनिस्ट विजयी झाले होते. हजारो वर्षांच्या चिनी इतिहासात अभूतपूर्व क्रांती घडून आली होती. ही क्रांती आता केवळ चिनी शेतकऱ्याचेच जीवन बदलणार नव्हती तर साऱ्या आंतरराष्ट्रीय राजकारणाला कलाटणी देणारी राक्षसी शक्ती ठरणार होती, सभोवतालच्या लहान सहान देशांत चीनबद्दल भीतियुक्त दरारा निर्माण करणार होती आणि पुढे आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीची अभेद्य एकीची चौकट तोडून त्यामध्ये लाथाळी माजविणार होती.

अमेरिकन आधुनिक शस्त्रास्त्रे व पैसा यांचे भक्कम पाठबळ असलेले चँग-कै-शेकचे सैन्य कम्युनिस्टांची पाळेमुळे खणून काढण्यासाठी अप्रतिहत राबत असताना १९ व्या शतकातील मोडकी तोडकी शस्त्रे जवळ असलेली, तुटपुंज्या अन्नावर राहणारी आणि गुहा, दऱ्या, जंगलांतून आश्रय घेणारी कम्युनिस्ट लाल सेना विजय कशी संपादन करू शकली ? आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीचा पाठिंबा नसताना किंबहुना थोडाफार अनास्थापूर्ण विरोध असताना चिनी कम्युनिस्टांनी आपल्या स्वतःच्या अशा लढ्याच्या खास पद्धती कशा अमलात आणल्या ? मार्क्सचे कम्युनिस्ट तत्त्वज्ञान त्यांनी आपल्या देशातील परिस्थितिनुरूप कसे वळवून घेतले आणि त्याहीपलीकडे जाऊन कम्युनिस्ट चळवळीत स्वतःचाच असा वेगळा, अत्यंत कर्मठ पंथ कसा निर्माण केला ? हा सारा इतिहास जेवढा रोमहर्षक आणि चिनी कम्युनिस्टांच्या स्वतंत्र वृत्तीबद्दल आणि चिकाटीबद्दल आदर वाढविणारा आहे, तेवढाच अविश्वसनीय आणि धक्के देणारा इतिहास आहे. ते राज्यावर आल्यानंतर आपली ध्येये

साध्य करून घेण्यासाठी त्यांनी कोणकोणते उपाय अवलंबिले, आंतरराष्ट्रीय राजकारणात वजन वाढविण्यासाठी काय काय केले याचा हा इतिहास आहे.

## क्रांतीनंतरचे असुरी स्वप्न

१९४५ पूर्वीच्या चिनी कम्युनिस्ट चळवळी लाल सैन्यांच्या शौर्याची, त्यांच्या चिकाटीची व प्रखर ध्येयनिष्ठेची वर्णने वाचली की कोणत्याही वस्तुनिष्ठ वाचकाच्या तोंडून प्रशंसोद्‌गार निघाल्याशिवाय राहत नाहीत. अगदी कम्युनिस्टविरोधी अमेरिकन ग्रंथलेखकांनीही या कालावधीतील लाल सैन्याची तोंड भरभरून स्तुती केली आहे. परंतु कम्युनिस्ट राजवट आल्यानंतर जे जे प्रवासी चीनमध्ये जाऊन आलेले आहेत, त्यांनी तेथील भौतिक प्रगतीच्या रसभरित वर्णनाबरोबरच तेथे होणाऱ्या व्यक्तिस्वातंत्र्याच्या दडपशाहीची, विचारशक्तीच्या समाजीकरणाची अंगावर काटा आणणारी भयप्रद वर्णने करून ठेवलेली आहेत. १९६२ मध्ये भारतावर आक्रमण करून आणि गेल्या दोन वर्षांत प्रथम अणुबाँबचा आणि आता हैड्रोजन बाँबचा स्फोट करून चिनी साम्यवादाची एक नवीनच आक्रमक प्रतिमा जगासमोर चीनने उभी केलेली आहे. आणि नुकतेच चिनी संरक्षणमंत्री लिन पियाओ याने चिनी साम्यवादाच्या विश्व विजयाची महत्त्वाकांक्षी योजना जाहीर करून साऱ्या जगतात खळबळ उडवून दिली आहे. अविकासित अशा 'ग्रामीण' आफ्रो–आशियाई व लॅटिन अमेरिकन देशांनी युरोप–अमेरिकेच्या साम्राज्यवादी 'शहरी' देशांना वेढे देऊन ते जिंकून तेथे चिनी साम्यवाद प्रस्थापित करणे हे चीनचे स्वप्न आहे, असे जाहीर केले.

या योजनेमध्ये चीनने भारताला साम्राज्यवादी 'शहरी' राष्ट्रांच्या बाहुल्याचे स्थान दिले आहे ! या योजनेनुसार चीनची वक्रदृष्टी प्रथम भारताकडेच वळलेली दिसते. आणि त्याप्रमाणे भारताच्या विकासाच्या प्रत्येक कार्यक्रमात खीळ घालण्याचे त्याचे सतत प्रयत्न चालू असलेले दिसतात. आपल्यापेक्षा जवळ जवळ दुपटीची लोकसंख्या असलेले आणि आपल्यापेक्षा अत्यंत शिस्तबद्ध व कडक राजवटीखाली आपल्या ध्येयासाठी एकवटून काम करणारे हे शेजारी राष्ट्र आज जगातील सर्वांत आक्रमक राष्ट्र म्हणून पुढे येत आहे.

चिनी ड्रॅगन झोपला आहे तोवर ठीक आहे, त्याला हलवू नका. एकदा का तो जागा झाला तर साऱ्या जगाला हादरवून सोडील," असे गंभीर इशारे वारंवार अनेक पाश्चात्य मुत्सद्यांनी दिले होते. आणि ड्रॅगन जागा झाला तेव्हा त्याने खरेच साऱ्या जगाला हादरवून सोडले यात शंका नाही.

## पुरातन व उच्च संस्कृती

शतकानुशतके, हजारो वर्षे, आपल्या डोक्यावर आपल्या संस्कृतीचे पांघरूण ओढून, बदलत्या जगाकडे संपूर्ण दुर्लक्ष करून, चीन खरोखरच अक्षरशः झोपला



'शहरी' देशांना वेढण्यासाठी निघालेली
'आफ्रो-आशिया'तील लढाऊ जनता [एक चिनी पोस्टर]

होता. चीन म्हणजेच सारे जग, चिनी संस्कृती हीच सर्वोच्च संस्कृती, इतर सारे लोक रानटी, असंस्कृत अशा कल्पना एकोणिसाव्या शतकाच्या अगदी अंतापर्यंत चिनी बाळगून होते. चार हजार वर्षांपूर्वी हसिया राजघराणे चीनवर राज्य करीत होते त्या वेळी या कल्पना क्षम्य होत्या. कारण भारतीय, इजिप्शियन व सुमेरियन संस्कृतीप्रमाणेच चिनी संस्कृती अतिप्राचीन आहे. चार हजार वर्षांपूर्वीच चीनमध्ये लिहिण्याची व रेशीम विणण्याची कला प्रचारात आल्याचे इतिहासकार सांगतात. तेव्हापासूनच चीनचा इतिहास शतकानुशतके राज्य करीत राहणाऱ्या राजघराण्यांच्या नामावळीने नुसता भरलेला आहे. हसिया, शान, चाऊ, चीन, हान, तँग, सुंग, मिंग, मांचु आदी राजघराण्यांनी चीनच्या विविध प्रदेशांवर राज्य केले. कधी सध्याच्या चीनचा बराचसा भाग त्यांनी एकछत्री अंमलाखाली आणला तर कधी राजधान्यांच्या आवतीभोवतीच त्यांचा अंमल मर्यादित राहिला.

चीनची स्वतःच्या संस्कृतीच्या उच्चतमतेविषयीची घमेंड शेवटपर्यंत कशी टिकून राहिली, याचे एक मजेदार उदाहरण देण्यासारखे आहे. १८ व्या शतकात युरोपियन व्यापाऱ्यांना चीनमध्ये व्यापार करताना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागे. सागर किनाऱ्यावरील काही निवडक शहरांतील नेमून दिलेल्या वस्तीतच त्यांना आपला व्यापार मर्यादित ठेवावा लागे. या अडचणी दूर करण्यासाठी युरोपियन राष्ट्रांनी चीनशी राजकीय संबंध प्रस्थापित करून आपल्या वकिलाती पेकिंगमध्ये स्थापन करण्याची चिनी बादशाहाला परवानगी मागितली. पण बादशाहाने चक्क नकार दिला. युरोपियनांना आपल्या बरोबरीचा दर्जा देणे चिन्यांना मान्य नव्हते. चिनी बादशाहा हा साऱ्या सुसंस्कृत मानवजातीचा बादशाहा होता. इतर सारे रानटी

होते. त्यांना बरोबरीचा दर्जा देणे शक्यच नव्हते.

युरोपियनांवर मेहेरनजर म्हणूनच व्यापाराच्या सवलती देण्यात येत. बादशाहा चियेन लुंग याने इंग्लंडच्या किंग जॉर्ज तिसरा याला या संदर्भात १७९३ साली पत्र लिहिले : "तुमच्या राजदूताची प्रत्यक्ष पाहून आता खात्री झाली असेलच की आमच्याकडे सर्व वस्तू आहेत. तुमच्याकडे तयार होणाऱ्या विचित्र वस्तूंना आमच्या देशात काही किंमत नाही. परंतु चहा, रेशीम, चिनीमाती आदी आमच्या स्वर्गीय राज्यात तयार होणाऱ्या वस्तूंची तुम्हा युरोपियनांना बरीच गरज आहे असे दिसते. म्हणून, मेहेरनजर म्हणून परकीय व्यापाऱ्यांना आम्ही त्यांची केंद्रे कॅन्टानला उभी करण्यास परवानगी दिली आहे. या आमच्या कृपालोभात तुम्हीही सहभागी होऊ शकता"

परंतु एक काळ खरोखरच असा होता की, त्या वेळी जगातील उच्चतम संस्कृतीं-मध्ये चीनचा अनुक्रम लागत होता. चीनमध्ये तयार झालेली नाजूक मुलायम वस्त्रे जगातील कानाकोपऱ्यातल्या श्रीमंतांच्या अंगावर दिसत होती. इसवी सनाच्या पहिल्या आणि दुसऱ्या शतकात रोममध्ये चिनी रेशमी वस्त्रे इतकी लोकप्रिय झाली होती की त्यामुळे रोमच्या अर्थव्यवस्थेला मोठा धोका निर्माण होऊन त्यांच्या आयातीवर बंदी घालावी लागली.

सारे युरोप अज्ञानाच्या अंधःकारात बुडाले होते, तेव्हाच ९ व्या शतकात चीन-मध्ये पहिले पुस्तक छापले गेले आणि १० व्या शतकात स्फोटक दारूचा लष्करी कामासाठी वापर करण्यात आला होता. भारताच्या समृद्ध संस्कृतीप्रमाणेच चिनी संस्कृतीही अत्यंत समृद्ध होती.

भारताच्या चारपट क्षेत्रफळ असलेल्या या विशाल देशात फार प्राचीन काळा-पासून मानवी संस्कृतीचा उगम झाल्याचे पुरावे आहेत. वास्तविक पाहता खऱ्या चीनचे क्षेत्रफळ (चायना प्रॉपर) भारत आणि पाकिस्तान मिळून जो उपखंड तयार होतो तेवढेच असेल. पण जुन्या काळापासून चीनने आपल्या सीमा तिबेट, सिकियांग, आंतरमंगोलिया आणि मांचूरिया यांच्याही पलीकडे नेल्या असल्याने आशियाच्या नकाशात चीनचे मोठे क्षेत्रफळ चटकन लक्षात भरते. उंच आणि बर्फाळ पर्वतशिखरांच्या रांगांनी आणि हवांग हो, यांगत्से, कियांग व सि–कियांग या नद्यांनी आधीच देशाचे नैसर्गिक भाग केले आहेत. नद्यांना वारंवार येणारे महापूर आणि पुनः पुन्हा येणारी आवर्षणे यांचे चक्र चिनी शेतकऱ्यांच्या पाठीशी सतत असते. कम्युनिस्टांनाही या चक्रापासून त्यांची अद्याप मुक्तता करता आली नाही. सुपीक जमीन फक्त मुख्य चीनमध्ये. तीही आता प्राचीन काळापासूनच्या कालव्याच्या उपयोगाने जीर्ण झालेली आणि तेथेच बेफाट लोकसंख्येचे एकत्रीकरण यांमुळे दर वर्षी चीनमधील कोणत्या ना कोणत्या प्रांतात दुष्काळ असतोच. त्या-मुळेच चिनी शेतकरी अतिशय कष्टाळू आणि काटकसरीने राहणारा आहे.

असे हे प्राचीन काळापासून परिस्थितीशी झगडणारे चिनी खऱ्या अर्थाने धार्मिक आणि भावुक कधीच नव्हते. चिनी जिथे जिथे व्यापारी म्हणून जातात तिथे तिथे ते यशस्वी होतात. त्यांचे धर्मकारणही व्यापारासारखेच आहे. त्यांचा जुना परंपरागत धर्म म्हणजे पूर्वजांची व भुताखेतांची पूजा करण्याचा. चिनी व भुते यांच्यांतील संबंध व्यापारी तत्त्वावर समानतेचे होते. जगामध्ये माणसांनी व भुतांनीही राहावे पण कुणी एकमेकाला त्रास देऊ नये यासाठीच ही पूजा होती. परमेश्वराविषयी निस्सीम भक्तीची व भक्तीमधील ब्रह्मानंदाची भावना हिंदू, ख्रिचन वा मुस्लीम यांप्रमाणे त्यांच्यात कधीच नव्हती.

## चीनमधील धर्मविचार

या वस्तुनिष्ठ धार्मिक भावनेलाच थोर चिनी तत्त्ववेत्ता कॉन्फ्युशस याने खतपाणी घातले. गौतम बुद्ध आणि कॉन्फ्युशस (ख्रि. पू. ५५१ ते ४७९) यांचा काळ एकच होता. पण बुद्धाप्रमाणे मरणोत्तर निर्वाणाचा विचार न करता कॉन्फ्युशसने व्यक्तीची वैयक्तिक शिस्त, व्यक्ती-व्यक्तींतील संबंध, समाज व व्यक्ती यांमधील संबंध यांवरच जादा भर दिला. बाप आणि मुलगा, राज्यकर्ते आणि प्रजा, नवरा व बायको, मोठा भाऊ व धाकटा भाऊ, मित्र-मित्र यांच्या

## आक्रमक वारसा !

कम्युनिस्ट चीन आपल्या सीमेवरील देशांच्या ज्या ज्या प्रदेशांवर हक्क सांगतो ते प्रदेश चिन्यांच्या ताब्यात कधीच नव्हते. चीनच्या काही बलवान राजघराण्यांनी स्वाऱ्या करून ते प्रदेश अत्यंत अल्प काळ आपल्या ताब्यात ठेवले होते एवढेच. इ. स. पूर्व २०७ ते इ. स. २२० पर्यंत राज्य करणाऱ्या हान या घराण्याने आपल्या लष्करी बळाच्या जोरावर चीनच्या सीमा प्रथमच दूरवर वाढविल्या. हान वू ति या बादशाहाने चीनच्या सीमा ईशान्य दिशेला कोरिया जिंकून पुढे सरकविल्या. दक्षिणेकडे त्याच्या सैन्याने इंडोनेशियापर्यंतचा मुलूख मिळविला तर पश्चिमेकडे मध्य आशियापर्यंत आणि सीकियांगच्या पलीकडे त्याचे सैन्य गेले.

हे सर्व भूप्रदेश सतत चिन्यांच्या ताब्यात कधीच राहिले नाहीत. ते पुन: पुन्हा स्वतंत्र झाले आणि अधून मधून चिन्यांनी पुन्हा जिंकले. जे जे भूप्रदेश शक्तिशाली चिनी राजांनी कधी काळी जिंकून बळकावले असतील ते सर्व चीनचा भाग आहेत असे सर्व चिनी मानतात. जे भूभाग पुन्हा जिंकून चीनमध्ये समाविष्ट झाले नाहीत ते ' हरलेले ' भाग मानून ते परत मिळविणे हे देशकर्तव्य आहे असे सर्व मानतात. त्याला आजचे साम्यवादी राज्यकर्ते आणि चँग कै शेकचा कोमिन्टांग पक्षही अपवाद नाही. हान घराण्याच्या या पराक्रमामुळेच चिनी लोक स्वत:ला " हानचे सुपुत्र " असे अभिमानाने म्हणवून घेतात.

नात्यांविषयी त्याने जे नियम बसवून दिले ते शेवटपर्यंत चीनमध्ये घोकले गेले. चांगल्या राज्यव्यवस्थेचेही नियम त्याने घालून दिले. परंतु त्या त्या परिस्थितिनुरूप योग्यायोग्यतेबद्दल निर्णय घेण्याचे अधिकार मात्र कॉन्फ्युशसने मोकळे सोडले. कॉन्फ्युशसचे तत्त्वज्ञान, त्यामुळे समाजाच्या प्रश्नांकडे बुद्धिवादी व मानवी मूल्यांच्या दृष्टिकोनातून पाहण्याचे साधन ठरले आहे.

याच्या उलट कॉन्फ्युशस काळीच निर्माण झालेली ताओ विचारसरणी स्वच्छंद, बंधनहीन, काळजीविहीन जीवनाची भोक्ती. या दोन्ही विचारसरणीत अगदी जमीन अस्मानचा फरक असला तरी चिन्यांना मात्र तसे वाटत नाही. कारण प्रत्येक चिनी समाजात कॉन्फ्युशन असतो तर खाजगी जीवनात ताओइस्ट असतो ! चीनमध्ये धार्मिक भेदाभेद विशेष तीव्र नव्हतेच. एकच माणूस एकाच वेळी, कॉन्फ्युशस बौद्ध आणि मुस्लिमही असू शकतो. चर्चमधून प्रार्थना करावी म्हणून गेलेला चिनी ख्रिचन आपल्या घरी जाऊन मुताखेतांची आणि पूर्वजांची पुनः पूजा करताना पाहताच ख्रिश्चन पाद्री कपाळावर हात मारीत ते यामुळेच.

कॉन्फ्युशसचे तत्त्वज्ञान त्याच्या मृत्यूनंतर २०० वर्षांनी हान राजांनी राजमान्य केले. मध्यंतरी बौद्ध धर्माच्या आगमनाने त्याला उतरती कळा आली होती. पण दहाव्या शतकात त्याचे प्रयत्नपूर्वक पुनरुज्जीवन होऊन पुन्हा या विचारसरणीने उचल खाल्ली. आजतागायत कॉन्फ्युशसने चिनी समाजावर आपली पकड घट्ट ठेवली आहे.

चीनमधील एकूण धार्मिक भावना उदारमतवादी होती. आपल्या विचारसरणीचा प्रचार करण्यासाठी दुसऱ्या विचारसरणीच्या नेत्याचे नाव गुंफून त्याच्याच तोंडून ते आपले विचार गमतीदारपणे वदवीत. पण त्यावर कोणी आक्षेप घेत नसे. शुआंग त्झु या सुप्रसिद्ध ताओईस्ट तत्त्ववेत्त्याने पुढील मजेदार संवाद लिहिला आहे.

एकदा येन हुई कॉन्फ्युशसकडे गेला आणि म्हणाला, " मी थोडी प्रगती केली आहे. "

" म्हणजे काय ? " कॉन्फ्युशसने विचारले.

" दयाळूपणा व न्यायीपणा मी विसरून गेलो आहे. " येन हुई म्हणाला.

" फारच छान, पण ते पुरेसे नाही, " कॉन्फ्युशस.

दुसरे दिवशी पुन्हा येन हुई त्याच्याकडे जाऊन म्हणाला,

" मी थोडी प्रगती केली आहे. "

" म्हणजे काय ? "

" संगीत व पूजा मी पूर्ण विसरलो, " येन हुई.

" फारच छान, पण ते पुरेसे नाही, " कॉन्फ्युशस.

पुन्हा दुसरे दिवशी येन हुई म्हणाला,

" मी थोडी प्रगती केली आहे. "

## लेखमालेसाठी संदर्भ म्हणून या पुस्तकांचा उपयोग झाला

- ☐ माओ-त्से-तुंग : रॉबर्ट पेने
- ☐ एंपरर ऑफ ब्ल्यू अँट्स् : जॉर्ज होरवाथ
- ☐ माओ-त्से-तुंग : जेरोम शेन
- ☐ रेड स्टार ओव्हर चायना : एडगर स्नो
- ☐ द ब्ल्यू अॅन्ट्स् : रॉबर्ट गुलेन
- ☐ रेड आर्मी ऑफ चायना : एडगर ओ बॅलन्स्
- ☐ इनसाईड आशिया : जॉन गुंथर
- ☐ कल्चरल हिस्टरी ऑफ चायना : सी. पी. फिट्झ्जेरल्ड
- ☐ स्टालिन्स् फेल्युअर इन चायना : कोनराड ब्रँट
- ☐ रिपोर्ट फ्रॉम रेड् चायना : हॅरिसन फोरमन
- ☐ द अदर साईड ऑफ द रिव्हर : एडगर स्नो
- ☐ सोव्हियेत रशिया इन चायना : चँग कै शेक

शिवाय

- ☐ डॉक्युमेंटरी हिस्टरी ऑफ चायनीज् कम्युनिझम
- ● देशी–विदेशी नियतकालिके

" म्हणजे काय ? "

" मी सर्व काही विसरू शकतो. "

यावर कॉन्फ्युशसने आपला पवित्रा बदलला आणि विचारले, " सर्व काही विसरू शकतो म्हणजे तरी काय ? "

यावर येन हुई म्हणाला, " मी माझे शरीर विसरलो आणि ज्ञानालाही फाटा दिला. अशा तऱ्हेने शरीर आणि मन यांचा अडथळा दूर केल्यावर मी अनंतशी ( ताओ शी ) एकरूप झालो. याचाच अर्थ सर्व काही विसरणे. "

परंतु या तात्त्विक मनोविनोदात सामान्य चिन्यांना काहीच रस नव्हता. कॉन्फ्यु-शसने घालून दिलेल्या नियमांप्रमाणे " थोरांच्या आज्ञा पाळीत " समाजाचा गाडा चालू होता. चिनी समाजाचे एक वैशिष्ट्य म्हणजे कुठलाही गरिबातला गरीब शेतकरी श्रीमंत होण्याची स्वप्ने पाहू शकत होता. बादशाही परीक्षा देऊन गरीब

शेतकऱ्याचे फाटके पोरही पंतप्रधानाच्या पदापर्यंत जाऊ शकत होते. तसेच वंश-परंपरागत वारसा हक्कांची चीनमध्ये प्रथा नसल्याने कुठलेही एक घराणे फार काळपर्यंत श्रीमंत राहू शकत नसे. भारतातल्याप्रमाणे जाती संस्थेचा अथवा इतर देशांतल्याप्रमाणे वर्णभेदाचा पगडा चीनवर कधीच नव्हता. अशा तऱ्हेने एका विशिष्ट चौकटीत बसल्यामुळे साऱ्या चिनी समाजाला एक प्रकारची जडता आली होती तरी त्यातील अंतर्गत गतिमानता कायमच होती. पण त्यामुळे समाजाची प्रगती होणे शक्य नव्हते.

दोन हजार वर्षे टिकलेली ही जडता, दोन हजार वर्षांपासूनची चिनी समाजाची ही झोप १६ व्या शतकात युरोपियनांनी तेथे शिरकाव केला नसता तर तशीच आणखी काही शतके पुढे चालू राहिली असती. पण युरोपियन व्यापाऱ्यांनी आपल्याबरोबर नव्या विचारांचे वारे आणले आणि चिनी प्रतिष्ठा धुळीला मिळविली. विशेषतः, अफूच्या बेकायदेशीर व्यापाराला चीनने बंदी घालताच युरोपियन व्यापाऱ्यांनी आपल्या सैन्याच्या बळावर मांचू बादशहाला नाक मुठीत धरून शरण आणले आणि आपल्याला हव्या त्या सवलती मागून घेतल्या. त्यामुळे तर चिनी अहंगंडाला मोठाच धक्का बसला. चिनी साम्राज्य शक्तीचा फोलपणा उघडा पडला.

चिनी जनतेला आता नव्या विचारांची चटक लागली होती. मांचु राजांच्या जुलुमाला आणि भ्रष्टाचाराला जनता कंटाळली होती. आणि भौतिक दृष्टीने आधीच क्रांतीसाठी सुपीक असलेल्या या पिवळ्या जमिनीत नवविचारांचे खतपाणी पडू लागले होते. (अपूर्ण) ●


माणसातील माणुसकीचा सुप्त अंश सुसंस्कारांनी विकसित होतो सुसंस्कार चांगल्या पुस्तकांच्या वाचनाने होतात, अशी काही पुस्तके.

| | | |
|---|---|---|
| सदाचार–चिंतनी | डॉ. ग. श्री. खैर | २·०० |
| गीतेतील मुख्य विचार | डॉ. ग. श्री. खैर | १·५० |
| सांस्कृतिक सुविचार शतक | वा. श्री. पुरोहित | २·०० |
| सांस्कृतिक सुभाषित शतक | अकोलकर, पुरोहित, पुराणिक | १·५० |
| दैनिक स्वाध्याय | ह. भ. प. दांडेकर व जोशी | १·५० |
| जगात वागावे कसे ? | वि. रा. वेलणकर | ३·०० |
| श्रीसमर्थ–प्रबोध | धेनुदास डोळे | २·५० |

अ. वि. गृह प्रकाशन, पुणे २.

दादर बुक डेपो, दादर, मुंबई २८

## आमचें स्वयंस्फूर्त आश्वासन...

या स्वातंत्र्यदिनी आम्हीं प्रतिज्ञा करतों कीं रेल्वेवर आणखी अधिक उत्तम सेवा देऊं व रेल्वे प्रवास आणखी अधिक सुरक्षित करूं हें आश्वासन पुरें करण्यास आम्ही कटाक्षानें प्रयत्न करूं. हें आमचें कर्तव्यच आहे.



## हें आश्वासन पुरें करण्यास तुमच्या साहाय्याची गरज आहे !

रेल्वे ही राष्ट्राची मालमत्ता आहे– तुमची संपत्ती आहे. रेल्वेसंबंधीच्या सर्व गोष्टींशीं तुमचाही संबंध आहे. रेल्वे चालू ठेवण्यांत तुम्हालाही सहभागी व्हावयाचें आहे. गाड्या वेळापत्रकाप्रमाणें चालू ठेवण्यात आम्ही तुमच्या सहकार्याची– आणि अर्थात् सदिच्छेची– अपेक्षा बाळगतों. तसेंच, रेल्वे प्रवास अधिक सुरक्षित, अधिक सुखद व्हावा यासाठीही तुमच्या सहकार्याची, सदिच्छेची गरज आहे. तुम्हांला साहाय्य करण्यासाठीं आम्हाला मदत करा.

**मध्य व पश्चिम रेल्वेद्वारा प्रसारित**

# तेंडुलकरांच्या नाटिका

रंगभूमीवर नित्य नवीन विषय मांडणाऱ्या व आशयाची अभिव्यक्ती नवनवीन प्रकारांनी करणाऱ्या नाटककारांत विजय तेंडुलकर हे प्रमुख आहेत आणि त्यामुळेच या नाटिकांचे वाचन काही विशिष्ट अपेक्षा मनात बाळगूनच सुरू केले. रंगभूमीवर नवनवीन प्रयोग सादर करण्याची जिद्द तेंडुलकरांजवळ आहे. त्यामुळेच त्यांच्या या नाट्यकृतींचा विचार ठोकळेबाज व्याख्यांच्या साहाय्याने करून चालणार नाही. कोणत्याही लेखकाची नावीन्याची हौस आणि तंत्राबद्दलची आसक्ती ही स्वागतार्ह असली तरी खूप वेळा लेखक निव्वळ तंत्राच्या आहारी जाण्याची दाट शक्यता असते किंवा एखाद्या वेळी 'नाट्या' ऐवजी युक्त्या (Grimmicks) वापरण्याचा मोह त्याला होतो. तेंडुलकरांचा प्रस्तुत संग्रह वाचीत असताना त्यांच्याही बाबतीत असेच होऊ लागले आहे की, काय अशी भीती मनाला चाटून जाते.

या संग्रहात एकूण सहा नाटिका आहेत. यांत प्रमुख वैशिष्टच असे की, 'बिचारे अप्पा बंड करतात' ही एकांकिका सोडल्यास बाकी सर्व द्विपात्री आहेत. ('समोरचा नाडकर्णी' मध्ये जरी अनेक पात्रे रंगभूमीवर गर्दी करीत असली तरी प्रेक्षकांचे अथवा वाचकांचे लक्ष दोन प्रमुख पात्रांवरच केंद्रित होते.) महत्त्वाची गोष्ट ही की 'नाट्यवस्तू' या दृष्टीने पाहिले असता या नाटिका वाचकांची बऱ्याच अंशी निराशा करतात. कारण 'नाट्या'च्या प्रकृतीची गळचेपीच यांतील बऱ्याचशा एकांकिकांमध्ये झालेली आढळते.

नाटक किंवा नाटिका ही एक संयुक्त (Composite) कला आहे आणि म्हणूनच त्याचे अंतिम मूल्य ठरविताना ते नाटक रंगभूमीवर किती प्रमाणात यशस्वी होईल याचाही विचार करावयास हवा. एखादा लेखक आपल्या अनुभवांच्या आविष्कारासाठी एखाद्या विशिष्ट माध्यमाची निवड करतो ते त्याला दुसऱ्या कोणत्याही माध्यमात तो आविष्कार करता येणे शक्य नसते म्हणून. परंतु खेदाची गोष्ट अशी की या संग्रहातल्या बऱ्याचशा एकांकिकांच्या बाबतीत हे झालेले नाही. 'अजगर आणि गंधर्व' चा मात्र अपवाद.

## 'मादी' आणि 'बेबी'

एकांकिका ही काही पूर्णाकृती नाटकाची (Full Length play) छोटी केलेली आवृत्ती नव्हे. तिचे स्वतःचे असे स्वयंपूर्ण स्वरूप असते. पूर्णाकृती नाटकांत जसे जीवनाचे संपूर्ण दर्शन (Vision of Life) घडू शकते तसे नाटिकेत अर्थातच शक्य नसते. कादंबरी आणि लघुकथेच्या बाबतीतही तसेच म्हणता येईल. तथापि लघुकथेमध्ये

एकाच मनोवस्थेचे चित्रण किंवा वातावरणनिर्मिती किंवा एका क्षणामध्ये मनात उद्भवलेल्या अनन्त भावनांचे चित्रण करणे शक्य असते. परंतु नाटक किंवा नाटिकेत नाट्यकृती ही कालांत उलगडत जाणारी कलाकृती असल्यामुळे – ते शक्य नसते म्हणूनच ज्या अनुभवांचा आविष्कार लघुकथेमध्ये अत्यंत उत्कृष्ट रीतींनी होऊ शकेल तोच नाटिकेत नीरस आणि कंटाळवाणा वाटतो. त्या दृष्टीने 'मादी' आणि त्याहीपेक्षा 'बेबी' या नाटिका तपासून पाहण्यासारख्या आहेत. 'मादी' मधील मधू आणि मंदा ही दोघेही स्वतःची फसवणूक करून घेत असतात. प्रेमभंगाच्या दुःखात त्यांना एक प्रकारचे सुख मिळत असते. मंदाला तर सुखवस्तु आयुष्य हवे असते. दारिद्र्याकडे पाठ फिरविण्याचा निर्णय तिने घेतलेला असतो, आणि तरीही मधूशी विवाहबद्ध होण्यात जे दुःख असते ते आपल्याला मिळाले नाही याची ती खंत बाळगीत असते. मंदाची अशी व्यक्तिरेखा उभे करण्यात तेंडुलकर यशस्वी झालेले आहेत. संवादही आकर्षक आहेत. ( मंदाचे संवाद पुस्तकी वाटतील. परंतु ती तिच्या व्यक्तिरेखेचा एक भाग आहे.) त्यामुळे नीरसपणा कमी होण्यास बरीच मदत झाली आहे परंतु 'बेबी' मध्ये मात्र हा दोष प्रकर्षाने जाणवतो. 'बेबी' मधल्या 'तो' ची भाषा त्याचे व्यक्तिवैशिष्ट्ये दाखविते हे खरे आहे. पहिल्या काही वाक्यांतच तेंडुलकर 'तो' बद्दल वाचकाच्या मनात घृणेची भावना निश्चित उत्पन्न करतात. त्यामुळे पुढेपुढे मात्र तोचतोपणा जाणवतो. (तेंडुलकरांच्या 'मी जिंकलो मी हरलो' या नाटकातील दिग्दर्शकाच्या पात्राची येथे आठवण होणे स्वाभाविक आहे.) दुसरे म्हणजे त्यात वापरलेली प्रतीके ( Symbols ) फारच सामान्य वाटतात. 'ती' चे 'त्या'जवळ बसलेल्या प्रेमळ जोडप्याकडे तिरपे कटाक्ष टाकणे व त्यातून तिला 'जे' हवे आहे ते 'हे' आहे असे सूचित करणे यात विशेष असे काय आहे? 'समोरचा नाडकर्णी' मध्ये पुढे काय होणार ही उत्सुकता टिकते व आकर्षक संवादरचनेमुळे कंटाळवाणेपणा जाणवत नाही.

## मूर्ताकडून अमूर्ताकडे

उत्कृष्ट कलाकृतीच्या अभ्यासातून असे दिसून येते, की त्यात यथार्थपणे जीवनदर्शन घडविलेले असते. हे सर्व कार्य म्हणजे अमूर्त ( adstract ) कल्पना प्रेक्षकांपर्यंत पोहोचविणे हे रक्तामांसाच्या जिवन्त पात्रांकडून केले जाते. उदा० मॅक्बेथ ही एका उदात्त माणसाच्या महत्त्वाकांक्षेपायी झालेल्या विनाशाची कथा आहे. परंतु हे तत्त्व सांगितले आहे. मात्र अत्यंत जिवंत पात्रांच्या आणि घटनांच्या द्वारे. थोडक्यात म्हणजे नाट्याची प्रकृती मूर्त (व्यक्ती व स्थळ) यांच्याकडून अमूर्ताकडे जाण्याची आहे. ही प्रकृती बदलण्याचे प्रयत्न जेव्हा नाटकावर करतो तेव्हा ते व्यर्थ तर जातातच; परंतु क्लिष्टता मात्र वाढवीत राहतात.

'खलित्यांची लढाई' ही अशा अमूर्ताकडून मूर्ताकडे जाण्याच्या अट्टाहासापायी

लिहिलेली नाटिका वाटते. यातील दोन खोल्यांना विभागणारी काल्पनिक रेषा, दोन्ही पात्रांनी केलेली आपापल्या बायकांची नक्कल या सर्व युक्त्या Grimmicks नव्हेत काय ? एक गंमत म्हणून जरी पाहिले तरीही ही नाटिका कंटाळवाणी वाटते.

'बिचारे अप्पा बंड करतात' ही नाटिका इतर सर्व नाटिकांपेक्षा प्रकृतीनेच वेगळी आहे. 'विनोद' हा या नाटिकेचा गाभा आहे. अनेक वर्षे ठराविक चाकोरीतून संसार केल्यानंतर अप्पा एका बालविधवेला आश्रय देतात आणि ही त्यांच्या मते सनसनाटी असणारी बातमी घरी सांगताच सगळे लोक कडाडून विरोध करतील अशी अपेक्षा असणारे अप्पा ज्या वेळी घरातले लोक ती गोष्ट शांतपणे स्वीकारतात तेव्हा चिडून आदळआपट करतात, त्याचे चित्रण या नाटिकेत आहे. अप्पांच्या बंडाप्रमाणेच इतरही काही बंडे ('नलूचे चिठी प्रकरण,' 'गोपाळचे खिडकीतून पाहणे') या घरात शिजत आहेत. आणि ती अप्पांच्या बंडाला पूरकच आहेत. परंतु त्यांचे परस्परसंबंध तेंडुलकरांना जोडता आलेले नाहीत. पूर्णाकृती नाटकात, त्यांनी परस्परांना दिलेले छेद आणि त्यातून निर्माण झालेली गोंधळाची परिस्थिती चित्रित करणे शक्य झाले असते. परंतु येथे 'नाटिका' या माध्यमास असणाऱ्या काही विशिष्ट मर्यादांमुळे हे सर्व अर्धवट राहिले असल्यासारखे दिसते व त्यामुळे विनोदही फारसा उरलेला दिसत नाही.

'अजगर आणि गंधर्व' या एकांकिकेत 'प्रत्येकाने अजगर झाले पाहिजे' अशी मतप्रणाली असणारा एक अत्यंत व्यवहारी मनुष्य त्याच्या वर्गातील लोकांचे प्रतिनिधित्व करतो व ते शक्य नसणारी नायकीण तिच्या वर्गातील स्त्रियांचे प्रतिनिधित्व करते. या दोन्हीही काही 'व्यक्तिरेखा' या सदरात मोडणार नाहीत. हे types आहेत; म्हणूनच त्यांना नावेसुद्धा नाहीत. नायकिणीच्या पातिव्रत्याच्या कल्पनेप्रमाणे वागणारी नायिका आणि अत्यंत हिशेबी नायक. नायकिणीच्या तोंडची भाषा तिने पाळलेल्या पोपटासारखीच यांत्रिक आणि नाटकी—आपल्या चरितार्थाचा प्रश्न आल्यावर तिला येणारा संताप—इत्यादींचे चित्रण तेंडुलकरांनी अगदी यथायोग्य केले आहे. तरीसुद्धा 'आपण दोघंही एकाच होडक्यात आहोत' अशी इंग्रजी छापाची भाषा मध्येच खटकते. प्रत्येकाने अजगर व्हायला पाहिजे, हे सांगणाऱ्या व्यवहारी (!) नायकाबद्दल वाटणारा राग आणि तसं वागणं शक्य नाही हे माहीत असलेल्या नाटकी (?) नायकिणीबद्दल वाटणारी कणव, या दोन भावनांच्या संमिश्र वातावरणातच वाचक ही नाटिका वाचताना राहतो, हे या नाटिकेचे वैशिष्ट्य वाटते

**— प्रा. शुभांगी रायकर**

**अजगर आणि गंधर्व : सहा नाटिका :**
**लेखक— विजय तेंडुलकर : प्रकाशक : मौज प्रकाशन गृह.**

# कौटुंबिक
# अंदाज पत्रक !



चालू महिन्याची प्राप्ती आज हाताशी आहे. महिन्याचा खर्च वजा जाता राहिलेली शिल्लक बँकेत जाऊं दे.

अर्थात्

**बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड**

मध्यें, जिथे तुमची मिळकत सुरक्षित तर राहिलच शिवाय तुम्हाला हवा तो सल्लाहि मिळेल.

रजिस्टर्ड ऑफिसः ११७७ बुधवार पेठ, पुणे २.

लेखन–वाचन

# जे नव्हते ध्यानी मनी

We never meant to go so far

या माविस रॉन्सनकृत

पुस्तकाचा परिचय

लेखांक सातवा



माविस

[ टांग्यान हे ब्रह्मदेशातील अफूचे महत्त्वाचे केंद्र आहे असे पास्कलकडून समजल्यावर माविस–बार्बारांनी तिकडे जाण्याची तयारी केली व ओं–काऊंगला 'टाटा' केला. ]

मँगनाथ राज्याला लागून असलेल्या हसेनवी प्रांतात तांग्यान गाव होते. तिथला पाटील सुशिक्षित होता व पाश्चिमात्य पद्धतीने राहत होता. एक बायको होती व तिला आठ मुलीच होत्या. सर्वांत थोरली ही पाटलानंतर पाटिलकीवर येणार होती.

या पाटलाकडेच माविसने बार्बारासह मुक्काम केला. पाटील म्हणाला, " ब्रिटिश राज्य फार चांगले होते. या नालायक ब्रह्मी सरकारपेक्षा खूपच चांगले. खरे पाहता शान प्रांत हा स्वतंत्र राष्ट्रच समजले गेले पाहिजे. "

या भागाला पूर्वी ब्रिटिश अमदानीत " राज्यकारभार नसलेला प्रदेश " ( Unadministered teritory ) म्हणत असत. आतासुद्धा जवळजवळ तीच परिस्थिती होती. पन्नास मैलांपलीकडे चीनची सरहद्द होती. पूर्वी चँग–कै–शेकच्या सैन्यात असलेले व आता माओच्या राज्यात थारा नसलेले सैनिक या भागात लुटालूट, अफूचा काळा बाजार करीत दिवस कंठीत होते. यांची संख्या जवळजवळ ३००० होती. थायलंडच्या सरहद्दीवरून चोरलेला माल पुढे बँगकॉकच्या किंवा इजिप्तच्या बाजारापर्यंत पोचत असे.

या सैनिकांना ब्रह्मदेशात परवाने देण्यासाठी ब्रह्मी सरकारचे अधिकारी लाच घेत असत. नको असलेल्या चिन्यांना कोमिंटांगचे लोक म्हणून माओ सरहद्दीपलीकडे पिटाळीत असे व ही लाचखाऊ ब्रह्मी भुतावळ या माकडांना आत घेत असे.

तांग्यानच्या बाजारात इवल्या इवल्या पायांच्या चिनी तरुण मुली इतस्ततः भटकत असत व मुख्यतः अफूच्या व्यापारात यांचाच महत्त्वाचा भाग असे.

लाल चीनने अफूच्या व्यापारावर सक्त बंदी घालून या चोरट्या व्यापाऱ्यांची ससेहोलपट केली की, हे सर्व पळून सरहद्दीपलीकडे ब्रह्मदेशात घुसले. काळ्या बाजारात तीन पौंड अफूला जवळजवळ साडेतीनशे रुपये पडत होते.

अफूच्या काळचा बाजारात दोन गोऱ्या मुली फिरत आहेत, ही गोष्ट हळूहळू अधिकाऱ्यांच्या कानांपर्यंत पोचली. माविसने मोठ्या शहाणपणाने अफूची प्रत्यक्ष खरेदी केलेली नव्हती. लाशियोच्या स्पेशल कमिशनरकडून दोघींना लवकरच वॉरंट आले. शान भागातला हा सर्वांत मोठा सरकारी अधिकारी होता.

पूर्वी ब्रिटिश रेसिडेन्सी असलेल्या आलिशान बंगल्यात हा अधिकारी राहत होता. दोघी बंगल्याच्या आवारात शिरल्या. कमिशनर कोर्टवर खेळेत होते. त्याने खेळता खेळता दोघींना बसण्याची खूण केली. थोड्या वेळाने खेळ संपवून तो बार्बाराकडे वळला.

" तुम्ही दोघी कुठून आलेल्या आहात ? " त्याच्या आवाजात पोलिसी उर्मट-पणा होता.

" तांग्यानहून आलो. " माविस.

" तुम्हांला ही गोष्ट माहीत आहे का की तांग्यान भागात वावरायचे परवाने मी देऊ शकतो. पर कियांना त्या भागात जाताच येत नाही. "

आता आवाजात अधिकच चढेलपणा शिरला होता. बार्बारा चिडली. जोरात उत्तरली,

" आम्हांला डझनभर पोलिस आणि सैनिक चेक नाक्यावर भेटले. आम्हांला कुणीच कसे अडवले नाही ? उलट जो तो आम्हांला मदतच करीत होता. आमचे स्वागत करीत होता. "

कमिशनर चाट पडला. मग असे अधिकारी जसे करतात तसे त्याने केले. जवळच उभ्या असलेल्या दुय्यम अधिकाऱ्याला त्याने सुरुवातीला काही प्रश्न विचारले आणि मग त्याची यथासांग भोसडणही केली.

पुढचे चार दिवस दोघींना फार छळण्यात आले. सामान दाखवा, कॅमेरे दाखवा. फिल्म किती घेतली ? फोटो कुठे आहेत ? एखाद्या गुन्हेगाराशी वागावे तसे हे अधिकारी दोघींशी वागू लागले. कारण त्यांचा बापच त्यांच्यावर रागावलेला त्यांनी प्रत्यक्ष पाहिला होता.

अखेर माविसचे डोके ठिकाणावर राहिले नाही. एके दिवशी सकाळीच ती कमिशनरच्या बंगल्यावर गेली.

खेळात व्यत्यय आल्यामुळे आधीच त्रासिक चेहरा केलेल्या त्या कमिशनरला माविसने चापले,

" हे काय चालले आहे ? आमच्यावर सारखी पाळत ठेवली जात आहे. नाना प्रश्न विचारतात. हा छळवाद कशाकरिता ? "

" या भागात धोका असतो. तुम्हांला कुणी लुटू नये, तुम्ही सुरक्षित राहावे यासाठी ही योजना आहे. " कमिशनर खुलासा करू लागला. माविसने मध्येच त्याला तोडले,

" ब्रह्मदेशाच्या हमरस्त्यावर तिकडे लुटालूट चालू आहे, दरोडे पडताहेत तिकडे का लक्ष देत नाही ? अफूचा काळा बाजार चालू आहे हे काय तुम्हांला माहीत नाही ? इमिग्रेशन अधिकारी लाच खातात व परमिटे देतात. कस्टम अधिकारी अफू जप्त करतात व तिचा लिलाव करून पैसे हडप करतात, कोमिंटांग सैनिक अफूची ने-आण करतात, खेड्यापाड्यांत उघड्या बाजारात अफू विकली जाते, अफूची लागवड सर्रास चालू आहे. या गोष्टी तुम्हांला दिसत नाहीत आणि आमच्यासारख्या कुणाला तरी पकडून त्यांना दम देता ! "

कमिशनर मनातून उखडला होता. परंतु आपली अब्रू झाकण्यासाठी मृदुपणे म्हणाला— " नुकत्याच या गोष्टी माझ्या कानांवर आल्या आहेत. मी युनायटेड नेशन्सकडे याचा रिपोर्ट करणार आहे. "

माविसने या अधिकाऱ्याला आता उलटसुलट घेण्याचेच ठरवले होते—

" हजारो पौंड अफू देशाबाहेर जाते. वर्षानुवर्षे हे चालू आहे. कुणी त्याविरुद्ध काहीही करीत नाही. जागतिक संघटना अफूचा प्रसार थांबवावा म्हणून प्रयत्न करते आणि तुमचे सरकार डोळे मिटून निर्लज्जपणे या गोष्टी चालू देते. तुम्ही स्वत: अफू पिकवता आणि शिवाय जगात ती वाटता. "

कमिशनरसाहेब जरा वरमले. सांगू लागले, " आम्ही प्रयत्न करतो. परंतु पोलीस कमी पडतात. कस्टमच्या वखारीत जप्त केलेल्या अफूचे प्रचंड साठे पडून आहेत. त्याचे करायचे काय हेच समजत नाही. अफू तयार करायलाच बंदी केली तर इथली माणसे जगणार कशावर ? इकडे दुसरे काहीच पिकत नाही. "

माविसजवळही या प्रश्नांची उत्तरे नव्हती. त्या दोघींना कमिशनरने त्रास दिला म्हणून ती चिडली होती आणि म्हणून तिने राज्यकारभाराचा बुरखा फाडला होता. कमिशनरने दोघींना शान प्रांतातून निघून जाण्यास सांगितले.

**रंगूनला प्रयाण**

दोघी रंगूनला आल्या. रंगून ते ब्रह्मदेशाच्या टोकांवरील व्हिक्टोरिया पॉइंट-पर्यंत बोटीने जाऊन थायलंडमध्ये बँकॉकला जाण्याचे दोघींनी ठरवले.

मॉन्सूनचा पाऊस सुरू झाला होता. समुद्र खवळलेला होता. दोघींनी एका माल-वाहू बोटीची तिकिटे काढली. हे मालवाहू जहाज फक्त निम्म्या अंतरापर्यंतच जाणार होते. तिथून पुढे तराफे मिळतात, असे त्यांना समजले होते.

बोट निघाली व लवकरच बेफाम हलू लागली. माविसला वाटत होते, की बोट लागणार नाही. परंतु पोटांत कळमळू लागताच दोघी ज्या आडव्या झाल्या त्या मधून मधून बोटीच्या कठड्याजवळ धावत येऊन ओकण्यासाठीच फक्त मध्ये उठत होत्या. त्यांच्या आसपास लोळणारी मंडळी ओकण्यासाठी बोटीच्या कट्ट्यापर्यंत येण्याच्याही भानगडीत पडत नव्हती. खाल्ले तर पोटात ठरत नव्हते. तीन दिवस अशा गलितगात्र अवस्थेत प्रवास केल्यावर बोटीचा प्रवास संपला व दोघी

किनाऱ्यावर उतरल्या. पाय जमिनीवर लागले परंतु जमीन फिरत आहे असाच भास त्यांना होत होता.

व्हिक्टोरिया पॉइंटकडे जाणारे पडाव गिऱ्हाईक शोधीत तिथच होते. ओंग नावाच्या एका उतार वयाच्या टक्कल पडलेल्या कोरपाच्या पडावात दोघी बसल्या. या पडावात त्या दोघीच मुली होत्या. बोटीवर आणखी सात–आठ स्त्रिया होत्या त्यांना पुढे जायचे नव्हते.

पडावात जी मधोमध छपरी खोली तयार केलेली होती. त्यात दोघी शिरल्या. आत रेडिओ होता. बाकड्यावर पातळ गाद्या होत्या.

पडाव सुटला आणि पाऊस सुरू झाला. खवळलेला समुद्र आणि वरून पाऊस. पडावात/शिरणारे व संपणारे पाणी बाहेर फेकण्याचे काम पडाववाला व त्याचे नोकर करू लागले. दोघी ज्या बाकड्यावर आडव्या झाल्या होत्या ती बाकं केव्हा कलंडतील याचा नेम नव्हता. बाक कलंडणारसे वाटले की दोघी पाय टेकत. बाक जागेवर आल्यावर त्या पाय उचलून परत स्थिर होत. डोके टेकले की पुन: कलंडे.

इतक्यात पडाववाल्याचा एक दाढी वाढलेला नोकर त्या छपरी केबिनमध्ये शिरला व " हे काय चालवले आहे ? " असा/ चेहरा करून बार्बाराला खाणाखुणा करू लागला. तो काय म्हणतो हे दोघींना कळेना. केबिनच्या ज्या टोकाला एक बुद्धाची मूर्ती होती त्या बाजूला बार्बाराचे पाय झाले होते. कारण गप्पा मारण्यासाठी माविस व बार्बारा परस्परविरुद्ध दिशांकडे पाय करून बाकड्यावर आडव्या झाल्या होत्या.

तो नोकर मोडक्यातोडक्या इंग्रजीत सांगत होता, " वादळ झाले आहे. सुकाणू मोडले आहे. आणि याला कारण बुद्धाकडे तुम्ही पाय करून निजलात. "

बार्बाराने आपली चूक कबूल केली. बुद्धाला नमस्कार केला व ती पुन: उलट दिशेने पाय करून निजली. परंतु पाप घडले होतेच. रात्रभर सारेच गरागरा फिरत होते. वादळ सोसाट्याचे होते. ओंग जवळपास दुसरा एकादा पडाव दिसतो का या आशेने नजर लावून होता. माविसच्या हातापायांना ओलाव्याने मुंग्या आल्या होत्या. पोटात मळमळत होते. या त्रासापेक्षा समुद्रात उडी मारावी असे सारखे तिला वाटत होते.

सकाळ झाली. ओंगच्या नशिवाने दूरवर दिसणारा एक तराफा जवळ आला व त्या तराफ्यावर बसून माविस बार्बारा व पडावातले इतर सात-आठजण किनाऱ्याला आले. किनाऱ्यावर पाऊल टाकताच माविस वाळूत कोसळली. तिची शुद्ध गेली.

माविस शुद्धीवर आली तेव्हा ती एका पानांनी ··· शाकारलेल्या झोपडीत होती. पायाशी बसून बार्बारा पत्र लिहीत होती. एका कोपऱ्यात पडावातले सहा-सात सहप्रवासी पत्ते खेळत होते. एका कोळ्याचे ते घर होते. त्याच्या बायकोने माविसला पेज–लापशी पाजली.

एका लहानशा बेटावर सर्वजण आसऱ्याला आले होते. ओंग हा सुकाणू तुटलेली

बोट खेचण्यासाठी एखादा तराफा आणण्यासाठी एका होडीतून दूरवर समुद्रात निघून गेला होता. पाच दिवसांनंतर त्याने बोट पुन: किनाऱ्याला आणली.

हेदेखील एक बेट होतं. बेटावर मोठमोठे खडक होते. त्यात गुहा तयार करून सेलॉन जमातीची काही माणसे राहत होती. बाकी सर्व बेट रेताड आणि ओसाड होते.

या जमातीचा मुख्य धंदा मोठमोठी कासवे पकडून ती विकण्याचा होता. गेल्या ८।१० दिवसांत माविसला फक्त भात आणि म्हावरीच खावी लागत होती. सर्वांनी मिळून कासवं विकत घेण्यासाठी वर्गणी काढली. माविस बार्बाराला वाटले, बऱ्याच दिवसांनी चांगले जेवण मिळणार, कासवाचे सूप, कासवाचे मटण, माशांचे कालवण—! दोघींच्या तोंडांना पाणी सुटले. वर्गणी जरा सढळ सुटली.

कासव ताब्यात घेऊन त्या बुद्ध कोळयांनी त्यांच्या अंगावर रंगाचे पट्टे फासण्यास सुरुवात केली. तेव्हा दोघींना संशय आला. त्यांनी विचारलं, " हे काय चालले ?"

एका बुद्धाने खुलासा केला—

" आता या कासवाची पूजा करून त्याला पुन: समुद्रात सोडावयाचे आहे. कासवांना प्राणदान केले की प्रवास सुखरूप होतो. ओंग एक तराफा घेऊन आला. सर्वजण पुन: बोटीत बसले. तराफा ते होडके ओढू लागला.

किनाऱ्यावर बॉप्कीन नावाच्या खेड्यात पुन: एक मुक्काम झाला. ओंग आता सुकाणू दुरुस्तीच्या खटपटीला लागला. माविसने विचारले,

" सुकाणू दुरुस्त करायला किती दिवस लागतील ? "

तो पुराणपुरुष म्हणाला, " महिनाभरात दुरुस्त होईल. "

माविसच्या पोटात गोळा आला. या खेड्यात दोघींनीच महिनाभर राहायचे... सातआठ लोकांबरोबर ? " हे शक्य नव्हते. बाकीच्या उतारूंनी दोघींना चिथावले ज्या तराफ्याने आपली होडी ओढून आणली तिच्यातून आपण पुढचा प्रवास करू. ओंगला पैसे देऊन मोकळा करू. "

हा विचार सुरू होताच ओंगने सांगितले, " उद्या सकाळी एक मोटरबोट इथे येणार आहे. तिच्यातून तुम्ही पुढे जा. "

दुसऱ्या दिवशी मोटरबोटीतून पुढला प्रवास सुरू झाला. मधले काही दिवस फुकट गेले. तेवढ्यापुरतीच पावसाने विश्रांती घेतली होती व सर्वांनी मोटरबोटीत पाऊल टाकताच पाऊस सुरू झाला. सोसाट्याने वादळ सुटले. " समुद्र खवळत नाही. वादळ होत नाही. " मोठ्याने प्रार्थना म्हणत सर्वांनी ते कासव समुद्रात सोडले. समुद्राच्या लाटांत ते अदृश्य झाले.

दैवी शक्तीवर माविस बार्बाराचा विश्वास नव्हता. परंतु आश्चर्यजनक गोष्ट खरोखरच घडली. तासाभरात आकाश निवळले. वादळ शमले. आकाशातून ढगांनी पोबारा केला. मोटरबोट पुन: निघाली. तास-दीड तासात व्हिक्टोरिया पॉइंटवर दोघींचे पाय लागले.

रंगून सोडल्यापासून पंधरा दिवसांनी दोघींच्या मनावरचे दडपण संपले. दोघी मनात म्हणाल्या " Thanks to the " प्रवासाची कूर्मगती संपवणारा तो कूर्मावतार पुन: विसरणे आता शक्य नव्हते.

(अपूर्ण)

रा. म. शास्त्री


# "डायमंड"

## टॅक्सी व रिक्षा मीटर्स

भारतात सर्वप्रथम

**डायमंड क्लॉक मॅन्यु. कं. प्रा. लि.,**

११८० बुधवार पेठ, पुणे २.

## डायमंड वॉच कंपनी

**११७९ बुधवार पेठ, पुणे २.**

महाराष्ट्रातील ख्यातनाम घड्याळजी. सर्व प्रकारची घड्याळे व इन्स्ट्रूमेंटस् चोख दुरुस्त केली जातात.

# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## □ पावशेर डान्स !

विश्वास ठेवा अगर ठेवू नका, एका जर्मन व्यापाऱ्याने तुर्कस्थानात जाऊन नऊशे किलो तुर्की नर्तिका जर्मनीला निर्यात केल्या ! जर्मन जनतेच्या मनोरंजनासाठी तुर्की नर्तिका आणायचे ठरवून त्याच्या कंपनीने त्याला पाठवले, तेव्हा नऊशे किलोचा ' कोटा ' ठरवून दिला. पण तुर्की नर्तिका जरा लठ्ठ असल्याने त्याला फक्त सडपातळ तेवढ्याच निवडून पाठवाव्या लागल्या असे तो म्हणतो. म्हणजे ढोबरी वांगी शेरात कमी बसतात, त्यातलाच हा प्रकार. खरे म्हणजे एकदम नऊशे किलो नर्तिका घाऊक घेणाऱ्याला एखाद-दुसरी पातळशी नर्तिका तर मिळायला काय हरकत होती ? पूर्वी नाशिकला रायवळ आंब्यांचा शेकडा एकशे-छत्तिसाचा होता म्हणे. अन् दिल्लीत तर शेरभर भाजी घेणाऱ्याला भाजीवाला कोथिंबिरीच्या दोन काड्या चक्क फुकट देतो. मग शेरभर भाजीच्या बाबतीत जे शक्य आहे ते क्षणभर नर्तिकेच्या बाबतीत का नाही ? नऊशे किलो नर्तिकांचा हिशेब करताना पाचपंचवीस किलो नर्तिकांवर पिशवीत टाकली तर काहीच बिघडू नये.

मला वाटतं हा जर्मन माणूस तुर्कस्तानात जायच्या ऐवजी हिंदुस्थानात आला असता तर त्याची अशी गैरसोय झाली नसती. भारतीय कलेच्या होलसेलर्सनी त्याला अगदी आनंदाने पावशेर-पावशेर भरतनाटयम्, कथ्थक, कथकली अन् मणिपुरी असे शेरभर मिक्स्चर देऊन वर अदपाव फिल्मी डान्सदेखील टाकला असता. ते काही असले तरी कलेचे मोजमाप कसे करावे हा गहन प्रश्न या पद्धतशीर जर्मन मंडळींनी इतक्या सोप्या रीतीने सोडविल्याचे पाहून कुठल्याही रसिकाला हायसे वाटावे. कारण आता संध्याकाळच्या मोकळ्या वेळी अर्धा फूट चित्रकलेचा रसास्वाद घ्यावा की पाव लिटर गाण्याचा आनंद लुटावा हे त्याला चट्कन ठरविता येईल. चोखंदळ रसिकाच्या दृष्टीने एकच लहानशी अडचण आहे. ती म्हणजे मिया मूठभर दाढी हातभर याच्या उलट धर्तीवर नर्तिका शेरभर, नृत्य छटाकभर (बाकीच्या मापांत फक्त आळोखे पिळोखे) असे होण्याची शक्यता आहे. पण त्याला इलाज नाही. फार तर वीतभर निराशा होईल इतकेच.

## □ ऐतिहासिक जुलाब

हिंदुस्थानातल्या लोकांना नाही तरी इतिहासाचे प्रेमच कमी. तेच विलायतेत वघा. परवा बातमी वाचली की उत्तर आयर्लंडच्या वेलफास्ट शहरातला एक संडास "ऐतिहासिक इमारत" म्हणून जतन करण्यात यावा असे ठरले आहे. एकोणिसाव्या शतकातल्या लोखंड कामाचे उत्कृष्ट उदाहरण म्हणून त्याचे वर्णन करण्यात आले आहे. हिंदुस्थानात अशा प्रकारे इतिहास गाजविणारा एक तरी संडास आहे का सांगा. आपण लोक जपून जपून काय जपतो, तर मुसलमानांची थडगी अन् हिंदूंची देवळे. नाही म्हणायला मराठी संदर्भात असताना एका इतिहास-संशोधक पोराकडून मी एका मराठेकालीन संडासाबद्दल उडत उडत ऐकले होते. निजामाने म्हणे बाजीरावाची टर उडविण्यासाठी त्याला निरोप पाठवला की मी तुझे चित्र संडासात लावले आहे. पण वस्ताद बाजीरावाने उलट उत्तर पाठवले—ठीक आहे, ते पाहून तरी तुला भीतीने शौचाला साफ होईल. म्हणजे राक्षसभुवनच्या या वाक्युद्धात पेशव्याने निजामाला चारी मुंड्या चीत केला म्हणायचा. पण या अशा ऐतिहासिक महत्त्वाच्या संडासाचा आज मागमूस तरी आहे का ? मर्द मराठ्यांची वहादुरी कुठे कुठे दिसली याचा तपशील तोंडपाठ असणाऱ्या बाबासाहेब पुरंदऱ्यांनादेखील प्रस्तुत संडासात साहेबाने खास नजराणा म्हणून पाठवलेला कमोड होता की काय याचा पत्ता नसणार हे आपण पैजेवर सांगतो.

आता कारागिरीबद्दल म्हणाल तर एकच आशा आहे. आणि ती म्हणजे आणखी चार-पाचशे वर्षांनी आपले इतिहासप्रेमी वंशज भारत सरकारच्या बांधकाम-खात्याने दिल्लीत बांधलेले संडासच काय पण सर्व इमारतीचे उत्खनन करून काढतील व निकृष्ट कारागिरीचे उत्कृष्ट उदाहरण म्हणून त्या जतन करतील. शिवाय प्राचीन आर्यांची मातीची घरे अन् विसाव्या शतकातली ही मातीइतक्याच ठिसूळ सिमेंटची घरे यांत काहीच फरक नसल्याने आर्यांची उज्ज्वल परंपरा विसाव्या शतकातले आपले पूर्वज अगदी कसोसीने पुढेच चालवीत होते हे त्यांना पटून त्यांची छाती आपल्यावद्दलच्या अभिमानाने फुगेल ती वेगळीच.

स्वादिष्ट मिठाईसाठी
आम जनतेची निवड

शर्मा स्वीट मार्ट

दत्तमंदिराशेजारी,
मंडई रस्ता, पुणे २.



# गाढवाला भेटला गुरू

## करमणूक...पण काहीशी कंटाळवाणी

मराठी रंगभूमीचा विकास व विकास–पद्धती यांबाबत मतभेद असले तरी रंगभूमीचा व्यावसायिक दृष्टिकोनातून लाभ उठविण्यासाठी 'जन्तेच्या' मागणीप्रमाणे नाटयकला नवीन रूपे व नवीन नावे घेऊन लोकरंजन करण्यास पुढे येत आहे, ही वस्तुस्थिती आहे. याच दृष्टिकोनामुळे नाटकाचा 'फार्स' झाला. फार्सने लोकनाटयाकडे धाव घेतली आणि आता असा सुदिन उगवला आहे की 'लोकनाटय' उघडपणे 'तमाशा' म्हणून रंगभूमीवर उभे राहत आहे. या लोकनाटयाला 'तमाशा' म्हणून संबोधण्याचा मान मिळवला आहे. ग. दि. माडगूळकरांच्या नुकत्याच बाहेर आलेल्या 'गाढवाला भेटला गुरू'ने.

लोकरंजनाच्या हेतूने लिहिलेला हा तमाशा ज्या प्रेक्षकांसमोर सादर करण्यात आला, त्यांचे मनोरंजन करण्यास तो समर्थ नाही. तमाशातील काही संवाद इतके किळसवाणे आहेत की, लेखणीला 'लूप' लावून लिखाण करण्याची जी अभिनव पद्धत अलीकडच्या काही नाटककारांनीं अवलंबिली आहे, त्याच्या जवळपास गीतरामायणकार गेले आहेत की काय, असा संदेह प्रेक्षकांच्या मनात निर्माण होतो.

अण्णांच्या वगाची कथा अगदी साधी आहे. संभू धोबी व पारू ही हौशी मौजी जोडगोळी, पण परिस्थितीने गांजलेली. या संभूजवळ 'गंगाराम' नावाचे गाढव असते. कोणी एक शहाणा फकीर गाढवाचा माणूस बनवतो असे समजल्यावरून भोळा भाबडा (?) संभू फकिराकडे जातो. दोन महिन्यांत फकीर गाढवाचा माणूस बनवतो व माणूस झालेला गंगाराम हैद्राबादला 'जज्ज' झाला आहे, अशी संभूला थाप मारतो. तंगडतोड करीत संभू हैद्राबादला जातो. गाढवाचा झालेला माणूस म्हणजेच जज्ज गंगाराम असे समजून संभू जज्जाशी हुज्जत घालतो. गंगारामची फसवणूक जज्जाच्या लक्षात येते. फकिराला बोलावून घेऊन योग्य सजा दिली जाते. 'गाढव' बनून संभू घरी येतो आणि गाढवाचा गुरू फकिरबाबा तुरुंगात जातो.

वगाचा पूर्वार्ध समाधानकारक, दुसरा अंक कंटाळवाणा व तिसरा अंक मनोरंजन करणारा आहे. दुसऱ्या अंकामध्ये संभू व पारू आपल्याला पोर का होत नाही याची चर्चा करतात. या चर्चेचे संवाद व कलाकार ज्या पद्धतीने हा भाग सादर करतात ती पद्धत किळसवाणी व रसभंग करणारी आहे. लग्नानंतर पारूच्या माहेरी पहिली रात्र कशी साजरी झाली हे सांगताना संभू म्हणतो, "तवा मी नवा

होतो, भ्या वाटलं मला, काय करायचं हेच कळेनासं झालं." गीतरामायणकार माडगूळकरांच्या लेखणीतून असे संवाद उतरावेत याचे सखेद आश्चर्य वाटले.

## रंगलेल्या लावण्या आणि नृत्ये

वगाच्या कहाणीमध्ये गरजेप्रमाणे पद्यमय निवेदन, लावण्या, नृत्ये यांची पेरणी केली आहे. वग सुरू होण्यापूर्वी शाहीर व सोंगाड्या यांच्यामधील संवादातून लोकनाट्य व तमाशांत फरक नसल्याचे स्पष्ट केले आहे. याच भागात "चौसष्टाचे झाले शंभर, भाव वाढला रुपयाचा, तोच रुपया बाजारामध्ये ठरतो पांढऱ्या पायाचा." या कवनामध्ये रूद्य: परिस्थितीचे भेदक चित्रण माडगूळकरांनी केले आहे. वास्तवतेच्या या जिवन्त दर्शनास प्रेक्षक मन:पूर्वक दाद देतात. "गुलाबदाणी घेऊनी हाती हळुच चढावा जिना, आवरित पदरासंग मना" या शब्दात पारूचे मनोगत समजते, आणि तीच पारू पुढे म्हणते,

"जाता जाता मधे गळावी वेणीमधली फुले, त्या नादाने मी दचकावे वळून पाहावे पुन्हा" विनयशील, प्रणयोत्सुक प्रणयिनीची मन:स्थिती माडगूळकरांनी फार मार्मिकतेने रंगवली आहे.

'पाऊल उचला सपासपा ग बाई उन लागतंय झपांझपा' ही लावणी नृत्य व आकर्षक चाल यांमुळे फार श्रवणीय झाली आहे.

तमाशासाठी निवडलेले कलावंत तुलनेने नवखे व तमाशाच्या बोर्डापेक्षा रंगभूमीशी परिचित असणारे आहेत. त्यामुळे अभिनय 'नाटकी' झाला आहे. सोंगाड्या (विष्णु वाघमारे), गंगाराम (जज्ज) व पारू (जयमाला काळे) यांचा अपवाद म्हणून उल्लेख करावा लागेल. जयमाला काळेची नृत्ये तर उत्कृष्ट आहेतच, परंतु चेहराही बोलका आहे. भावी काळात तिच्याकडून भरीव कामगिरीची अपेक्षा आहे.

या तमाशाचे दिग्दर्शन राजा परांजपे यांनी केले आहे, हे मात्र सांगावेच लागते, कारण प्रयोग पाहताना दिग्दर्शनाची जाणीव कोठेही झाली नाही. आपल्या नावाला मराठी रसिकांच्या मनात काही विशिष्ट स्थान आहे याची निश्चित जाणीव असूनही राजाभाऊंनी इतक्या निष्काळजीपणे तमाशाची हाताळणी करावी ही आश्चर्याची बाब आहे.

संगीताची बाजू 'राम कदम' यांनी उत्कृष्टपणे सांभाळली आहे. लावण्यांना दिलेल्या चाली लावण्यांची रंगत वाढवतात. पण तमाशातील सर्वोत्कृष्ट भाग म्हणजे जयमालेची नृत्ये. तिची सर्व नृत्ये मोहन वैद्य यांनी परिश्रमपूर्वक बसवली आहेत. 'गुरू' प्रेक्षणीय करण्यात मोहन वैद्य यांचा मोठा वाटा आहे.

तमाशास येताना प्रेक्षक ' कास्ट 'पेक्षा ' क्रेडीट'वर (परांजपे–माडगूळकर–कदम) लक्ष ठेवून येतो. आणि जाताना ' गाढवांना ' गुरू भेटल्याचे मान्य करून येतो.

**शरद गोखले**

## ग. दि. मा. व गोखले

' गाढवाला भेटला गुरू ' वरील अभिप्राय लिहून झाल्यानंतर श्री. गोखले यांनी शंकासमाधानासाठी श्री. माडगूळकर यांची भेट घेतली. उभयतांचा संवाद—

गोखले : प्रयोगाच्या दुसऱ्या अंकातील भाग चांगलाच खटकला आणि आपल्यासारखा लेखक असे लिहितो याचे सखेद आश्चर्य वाटले. निराशा झाली.

ग. दि. मा. : कलावंतांनी अतिरंजितपणे काही भाग सादर केल्याने त्याला अश्लीलतेचा रंग आला. आकाशवाणीवर याच संवादासह सादर झालेल्या प्रयोगाची स्तुतिपर पत्रे आली आहेत.

गोखले : हा तमाशा लिहिण्यामागे आपला काही व्यवसायिक हेतू आहे काय ?

ग. दि. मा. : नाही. माझ्या एका कथेचे आकाशवाणीवर नभोनाटय झाले. तेच एका परिचिताने रंगभूमीवर सादर केले व असा या नाटयाचा जन्म झाला.

गोखले : तमाशाची मांडणी केवळ करमणुकीसाठी केली की काही दुसरा हेतू होता ?

ग. दि. मा. : सैनिकांच्या करमणुकीसाठी या कलेचा जन्म झाल्याने तमाशामध्ये परंपरागतपणे 'हलका विनोद' कायम असतोच. पण जाता जाता सहज सामाजिक वगुण्यांवर बोट ठेवता येते. या प्रयोगातदेखील ' चौसष्टाचे झाले शंभर ' या कवनातून वास्तवतेचे जिवंत दर्शन घडवले आहे. शिक्षकी-पेशाच्या दयनीय अवस्थेवर बोट ठेवले आहे.

गोखले : तमाशाचा प्रयोग रंगभूमीवर आणण्याआगोदर, चांगल्या तालमीची आवश्यकता होती असे प्रयोगातील अपरिपक्व कलावंतांचे काम पाहून वाटले नाही काय ?

ग. दि. मा. : खरे आहे. तालीम न झाल्याने प्रयोगात अनेक दोष राहिले. प्रयोगांच्या वाढत्या संख्येबरोबर दोष कमी होतील व ग्रामीण भागात तमाशा यशस्वी होईल असा अंदाज आहे.

## घरसंसार आणि ऑफिस



## या दोन्ही जबाबदाऱ्या सांभाळणाऱ्या भगिनींना

स्त्री जीवनांत अत्यंत जरूरीच्या वेळीं विश्रांती घेता येत नाहीं. परिणामीं त्यांच्या नेहमींच्या तक्रारी वाढतात. बाळंतपणानंतर तर जीव नकोसा करणारी अशक्तता, ओटीपोटदुखी,, बेचैनी आणणारी पाठ व कंबरदुखी वगैरे तक्रारी विशेष त्रास देतात. मिसेस आनंदीबाई देसाई यांच्या अबलामृत गोळ्या असल्या तक्रारींवर चांगल्या उपयोगी पडतात. मध्यम वयानंतर एकंदर आंतर स्त्री इंद्रियांची शक्तीच कमी झाल्यामुळें उद्भवणाऱ्या बऱ्याच तक्रारींवर अबलामृत गोळ्या चांगल्या गुणकारी ठरल्या आहेत. वर्षांतून १/२ वेळां अबलामृताच्या सहा बाटल्या घेतल्यास फार श्रमामुळें येणारा शारीरिक व मानसिक थकवा लवकर दूर होतो. **कुमारीजीवनापासून कौटुंबिक जीवनाच्या सर्व महत्वाच्या काळांत**




मिसेस आनंदीबाई देसाई यांच्या

# अबलामृत गोळ्या

आपणांला निरोगी, आनंदी, सुखी व सफल स्त्रीजीवनाचा लाभ करून देतात.

**पर्ल आणि कंपनी मुंबई २७.**

STUSA 8/65

# पं. विद्याशंकर शास्त्री? छे!– शंकरराव पवार! एक 'अफलातून' संगीत दिग्दर्शक

लेखक सुधाकर अनवलीकर


परवा अचानक शंकरराव पवार भेटले. तसे मध्यंतरी ते एकदा उभाउभी भेटले होते. पण शंकरराव पवार म्हणून नव्हे–पंडित विद्याशंकर शास्त्री म्हणून!

ख्यातनाम संगीत दिग्दर्शक वसंत पवार निधन पावल्यानंतर काही दिवसांनीच शंकरराव पुण्यात आले होते. त्या वेळेस त्यांची ओझरती गाठभेटही झाली होती. संगीताच्या क्षेत्रात गाजविलेल्या असामान्य कर्तृत्वाने आपल्या मुलाने प्रत्येक मराठी माणसाच्या हृदयात घर निर्माण केले, याची प्रचिती "यांचि देही यांचि डोळां" शंकररावांना पाहावयास मिळत होती; आणि ते सद्गदित होत होते. लावणी, ओवी, भूपाळी, पोवाडा, भावगीत अशा विविध क्षेत्रांत सव्यसाचित्वाने कौशल्य पणास लावून वसंत पवारांनी स्वत:चे वैशिष्टयपूर्ण स्थान मराठी चित्रपट संगीताच्या क्षेत्रात निर्माण केले. वसंतरावांना उभ्या हयातीत जी अवहेलना, मानहानी, तिरस्कार यांचा जाच सोसावा लागला होता, ती शंकररावांनी दूरून का होईना, पण पाहिला होता.– काही अंशी अनुभविलासुद्धा होता. 'जिवंत असता लत्ता देती, मेल्यावरती खांदा देती' अशी ही जगरहाटी वसंतरावांच्या बाबतीत वास्तव ठरली होती, वंचनेत उभी हयात घालविलेल्या वसंतरावांचा त्यांच्या मरणानंतर केवढा मोठा गौरव झाला. वसंतरावांना रौरवात नेणारेसुद्धा या गौरवात सामील झाले होते.

जवळ जवळ बारा वर्षापूर्वी शंकररावांनी महाराष्ट्रातून 'निर्याण' केले होते. आणि परतले तेही अशा चमत्कारिक परिस्थितीत! आपल्या मुलाच्या–वसंत पवारांच्या–अखेरच्या क्रिया–कर्मांना हजर राहण्यासाठी!

वसंत पवार यांच्या निधनाची वार्ता शंकररावांनी वृत्तपत्रांत वाचली आणि त्यांची 'परिक्रमणा' थांबली. सत्याच्या शाश्वत तत्त्वाच्या आणि चिरंतन शांतीच्या शोधात असलेल्या या जीवनाच्या यात्रेकरूला आपली 'परिकम्मा' थांबवावी लागली.

शंकरराव महाराष्ट्रात आले. मिरजेला गेले. वसंतरावांच्या देहाचे अंतिम संस्कार पार पाडले. वसंतरावांच्या संसाराची घडी विस्कटलेली होती. तिची काही



'सुरंगा म्हनत्यात मला' चित्रपटाच्या गाण्याचे ध्वनिमुद्रण 'राजकमल'मध्ये चालू असताना — डावीकडून दुसरे संगीत दिग्दर्शक शंकरराव पवार, आशा भोसले, सुलोचना चव्हाण, दिग्दर्शक दिनकर द. पाटील, व्ही. शांताराम, निर्माते राम कर्वे.

तरी तात्पुरती व्यवस्था करून शंकरराव परत राजस्थानात गेले.

त्यानंतर अवघ्या काही महिन्यांतच शंकरराव पुण्यास परतले. राजस्थानातील कलावंतांचे एक सांस्कृतिक कलामंडळ घेऊन ते पुण्यात आले होते. वसंत पवारांनी संगीत दिलेल्या 'मल्हारी मार्तंड' या चित्रपटाची 'रुजुवात' होणार होती. वसंत पवार यांचा हा अखेरचा चित्रपट. आजारी असतानाही एका दिवसात आठ गाण्यांचे ध्वनिमुद्रण करून त्यांनी या चित्रपटाच्या निमित्ताने एक नवाच विक्रम प्रस्थापित केला होता. निर्माते राम देवताळे यांनी वसंत पवार यांनाच हा चित्रपट अर्पण केला होता. कुणी तरी सुचविले— "शंकरराव, प्रीमियरला तुम्ही यायला पाहिजे."

वसंतरावांच्या निधनाचा त्यांना अगोदरच मोठा धक्का बसलेला होता. दुःखाची जखम अजून ओलीच होती. "नाही. ते माझ्याच्याने सहन होणार नाही. जन्म देण्यापलीकडे वसंतासाठी मी काय केले?"

शंकरराव त्या दिवशी प्रीमियरलासुद्धा गेले नाहीत!

शंकरराव धर्माने ख्रिश्चन. 'बायबल'चा त्यांचा व्यासंग फारच मोठा आहे. ख्रिश्चन धर्माचा सांगोपांग अभ्यास मुळात केल्यावर त्यांना वाटले, आपण हिंदुधर्माचा अभ्यास करावा. आणि मग ते त्या तयारीला लागले. मन संस्कारी होते. मताचा आग्रह नव्हता. स्वत:चे शिक्षणही फारसे नव्हते. पण मनाची जिद्द जबरदस्त. मराठी, हिंदी, इंग्लिश व संस्कृत या भाषांवर त्यांनी कष्टाने प्रभुत्व संपादन केले.

## पंडित विद्याशंकर शास्त्री

विलक्षण बुद्धिमत्ता, असामान्य प्रतिभा आणि अचाट स्मरणशक्ती या बाबतीत वसंत पवार काय आणि शंकरराव पवार काय, दोघेही सारखेच.

संगीताचे दर्दी असल्याने अभंग, ओवी शंकररावांच्या तोंडावरच होती. उत्तमपैकी अभंग म्हणणारे अशी त्यांची जशी ख्याती होती; तशीच ढंगदार लावणी म्हणणारे अशीही ख्याती होती.

हिंदुधर्माचा अभ्यास करावयाचा म्हणजे संस्कृतचा अडसर दूर झाला पाहिजे, ही त्यांची भावना झाली. आणि त्यांनी संस्कृतच्या अध्ययनास प्रारंभ केला. भगवत्गीता त्यांनी 'सटीक' वाचली. रामायण, महाभारत ही महाकाव्ये वाचली. एवढेच नव्हे तर त्यांनी त्यांची पारायणे केली. वेदांचा अभ्यास केला. नुसता अभ्यास करूनच ते थांबले नाहीत; तर खरा धर्म कोणता?—यमनियम म्हणजे काय? धर्माधर्मात मूलत: फरक कोणता या संबंधात त्यांनी शास्त्री-पंडितांशी चर्चा केली; विचारविनिमय केला, विचारमंथन केले.

या विचारमंथनातूनच 'जिज्ञासा' निर्माण झाली—सर्व धर्मांचा आपण तौलनिक अभ्यास केला तर? आणि त्यांच्या मनाने पुन्हा उचल खाल्ली. मनात एखादी कल्पना आल्यानंतर ती अमलात, प्रत्यक्षात आणायची नाही, मग ती 'पवार' मंडळी कसली? शंकररावांनी हिंदू धर्म पुरा करून कुराणास हात घातला. त्यासाठी अरेबिक, फारसी, भाषांचे प्रारंभिक-प्रास्ताविक ज्ञान प्राप्त करून घेतले. ते मशिदीत गेले. मुल्ला, मौलवींना भेटले. आणि 'इस्लाम'चा समग्र अभ्यास केला.

सर्व धर्मांचा सशास्त्र, तौलनिक अभ्यास केल्यानंतर शंकररावांनी डोळसपणाने हिंदू तत्त्वज्ञानाचा स्वीकार केला व आर्य समाजाचे काम करण्यास सुरुवात केली. अनेक प्रवचने केली. सभा भरवल्या.

शंकरराव पवार 'पंडित विद्याशंकर शास्त्री' झाले!

उत्तरेत आजही ते याच नावाने परिचित आहेत. या सर्व खटाटोपात शंकरराव पवारांना एक तपापेक्षा अधिक काळ घालवावा लागला. त्यासाठी त्यांनी महाराष्ट्र सोडला; घरदार-आप्त सोडले, संगीत सृष्टीपासून ते दूरही झाले. "शंकर पवार" हे एक काळी संगीताच्या दुनियेत अतिशय गाजलेले नाव काळाच्या पाटीवरून पुसूनही गेले होते!

शंकरराव पवार हे स्वत: संगीतातले दर्दी व्यासंगी. उत्तम गायक, वादक म्हणून त्यांनी ऐन तारुण्यात कीर्ती मिळवली. चित्रपटाच्या आरंभीच्या काळात उत्तम संगीत दिग्दर्शक म्हणूनही त्यांनी नावलौकिक कमावला. 'पन्ना' या गाजलेल्या चित्रपटाला शंकरराव पवार यांचेच संगीत होते 'बलिदान' हा आणखी एक चित्रपट विशेष गाजला– 'नीरा और नंदा बेबी' या चित्रपटांना दिलेले संगीत वैशिष्टचपूर्ण होते.

शंकरराव पवारांना तीन मुलगे. वसंत पवार सर्वांत थोरले, दुसरा बाबू पवार हा उत्तम तबलजी असून तो सध्या बडोदा म्यूझिक कॉलेजात तबलावादक आहे. सर्वांत धाकटा उत्तम पवार ही वसंत पवारची धाकटी प्रतिकृती होय. गिटार, मेंडोलीन सारखी 'स्ट्रिंग इन्स्ट्रूमेंट' वाजवण्यात तो विशेष कुशल आहे. शिवाय पेटीवर हात अतिशय सफाईने चालवतो. भावपूर्ण चाली उत्तम चांगल्याच बांधतो.

असे हे 'संगीता'चे वारे भरलेले घराणे. घरी नेहमीच मोठमोठ्या गायक–वादकांची वर्दळ. लहरी हैदरापासून खाँसाहेब रहिमतखाँपर्यंत सर्वांची ये–जा असायची. 'वसंत पवार' हा एक मोठा 'सतारिया' व्हावा, अशी शंकररावांची कमालीची धडपड. वसंतरावांचा पेटीवर सफाईदारपणाने फिरणारा हात सतारीवर फिरल्यास काय वहार होईल? या कल्पनेने उचल खाऊन शंकररावांनी 'वसंता'च्या मागे सतारीवावत सारखा लकडा लावला. आणि एके दिवशी सुप्रसिद्ध घरंदाज सतारिये खाँसाहेब रहिमतखाँ यांचा वसंतरावांनी गंडा बांधला. त्यासाठी खाँसाहेबांना एक हजार रुपये दक्षिणा दिली.—आणि वसंतरावांचे "दिड दा दिड दा" सुरू झाले.

शंकरराव सांगतात, "वसंता अतिशय हूड. सतार शिकविण्यासाठी त्याने माझा खूप मार खाल्ला. नामांकित सितारवादक' म्हणून तो नाव काढील अशी माझी खात्री होती. लोकांच्या लौकिक दृष्टीत तो सतार वादक म्हणून पुढे आला नाही. पण त्याची 'चमक' थोडयांनाच माहिती होती.

## एक तपानंतर...

जवळ जवळ बारा वर्षांनी पंडित विद्याशंकर शास्त्री ऊर्फ शंकरराव पवार भेटले. —आणि काळाच्या पाटीवरची पुसट अक्षरे पुन्हा स्पष्ट होऊ लागली. आठवणींची कबुतरे पुन्हा जागी झाली.

तीच भव्य शरीरयष्टी, भव्य भालप्रदेश तेच वेधक डोळे—सर्व काही तेच होते. नव्हते ते जरीकाठी धोतर आणि फिकट भगव्या रंगाची शाल. बदामी रंगाचा अर्धा बुशशर्ट आणि वुलनची पँट; तोंडात सिगारेट!—हा पहिला धक्का!

बाबांनी—शंकररावांना आम्ही बाबा म्हणतो–आणखी एक जबरदस्त धक्का दिला—

"चित्रपट सृष्टीत पुन्हा पदार्पण करतोय. एक नवं पिक्चर मिळालं आहे. त्याचं संगीत दिग्दर्शन करतोय."

—जवळ जवळ दोन तपांपेक्षा अधिक काळ उलटून गेलेला. बदल कितीतरी झालेला. आणि आता शंकरराव नव्याने चित्रपट सृष्टीत प्रवेश करणार ? एखाद्या तिऱ्हाईताला आश्चर्य वाटणे स्वाभाविक आहे.

परंतु ' पवार ' मंडळींची झेप ज्यांना माहिती; त्यांना यात नवीन काहीच नाही. ' संगीत दिग्दर्शन करणारे आहे ' असे बाबा म्हणाले. पण त्यांच्या लेखी ' भविष्य-काळ ' हा लगेच ' वर्तमानकाळ ' होऊन जातो.

त्यानंतर काही थोड्याच दिवसांनी बाबा पुन्हा भेटले.

' काय बाबा—नव्या पिक्चरचं कधी ? ' ' कधी ?—अहो १४ गाणी त्यात आहेत. ती बसविलीसुद्धा—माडगूळकरांची गाणी—एक अभंग—सवाल जवाब, लावणी—झगडा—भावगीत—अनेक प्रकार आहेत. आज ' रिहर्सल ' आहे. आणि पुढच्या सोमवारी मुंबईत रेकॉर्डिंग "

' रिटेक ' न घेता एका दमात बाबा बोलत होते आणि मी ' अवाक् ' होऊन ऐकत होतो. एका वाक्यात बाबांनी ' भूताला ' वर्तमान केले होते.

कामाचा झपाट्याने उरक हा वसंत पवारांचाही विशेष होता. माडगूळकरांचे गीत असो वा बहिणाबाईचा अभंग—वसंतराव नजर टाकायचे. चाल गुणगुणायचे. लगेच पेटी हाताशी धरून स्वरलेखन करून ते मोकळेही होत. बाबांचीही तीच गत !

' पूना गेस्ट ' हाऊस मागे पडत होते.

" तुमचा झपाटा पाहून बाबा वसंतरावांची आठवण येते—" मी म्हणालो.

शंकरराव थोडे थांबले.

" अरे तो कुठे, मी कुठे ? वसंता तो वसंता. तो. त्याचे गाणे, बजावणे—छंद—फंद सगळेच वेगळे. त्याची बरोबरी मी कशी करणार ? छे ? जमणारच नाही— " शंकरराव उत्तरले.

" चल—गाण्याच्या तालमी चालल्या आहेत. ऐक "

बोलता बोलता आम्ही एका मंगलकार्यालयाशी आलो. कानावर ' रिहर्सल 'चे स्वर येत होते.

निर्माते राम कर्वे, राम देवताळे यांच्या ' सुरंगा म्हनत्यात मला ' या नवीन चित्रपटातील गाणी बाबांनी बहारदारपणे बसविली होती. जुन्या जमान्यातील संगीतकाराने काळाशी स्पर्धा केली होती. दिनकर पाटील यांची कथा व दिग्दर्शन, अण्णासाहेब माडगूळकरांची गाणी व पवारांचे संगीत. कथानकही संगीतप्रधानच आहे.

बाबा पेटीवर बसले. ' अरे सोयऱ्यांची अशी एकेक गाणी आहेत. व्वा ! ऐक '— माडगूळकर व शंकरराव जानी दोस्त ' दोघे एकमेकांना ' काय सोयरे ' असेच संबोधतात. स्वर लागले. बाबा गाऊ लागले—अभंग माडगूळकरांचा होता.

"वर द्यावा कमलापति
दारिद्र्य मागते कुंती—"

अभंग संपला—मग लावणी—मग भावगीत आणि नंतर असेच काहीतरी. तीन तास कधी संपले कळले नाही. लावणीत अस्सल ढंग होता—भावगीतात भाव होता—अभंगात आळवणी होती—

सत्तरीच्या घरातील शंकरराव पवार अशी 'मनाला थक्क' करणारी व्यक्ती आहे. वसंत पवारांची आठवण जागी ठेवत चित्रपट संगीताच्या क्षेत्रात ते 'पुनश्च हरि ॐ' करीत आहेत.—त्यांना आणखी तीन चित्रपट मिळाले आहेत.


॥ श्री ॥

**दी बृहन्महाराष्ट्र**

**शुगर सिंडिकेट लिमिटेड**

रजिस्टर्ड ऑफिस : ९८० सदाशिव पेठ, लक्ष्मी रोड, पुणे २

*स्वातंत्र्य दिनाच्या मंगल प्रसंगी आमच्या सर्व भागीदार, ठेवीदार व हितचिंतकांना अभिवादन व हार्दिक शुभेच्छा !*

**शुभ्र दाणेदार साखरेचे आणि रेक्टिफाईड व डीनेचर्ड स्पिरिटचे उत्पादक**

*बृहन्महाराष्ट्रातील मध्यम वर्गाने गुंतविलेल्या भांडवलावर यशस्वी रीतीने चालू असलेला हा साखर व स्पिरिटचा कारखाना मध्यमवर्गीयांचे भूषण होय !*

**स्वतंत्र भारत चिरायू होवो**

गो. श्री. वाळिंबे
*बी. कॉम्.*
**मॅनेजर**

शं. ल. लिमये
*बी. एस्सी., एल्एल्. बी., वकील*
**अध्यक्ष**

[ मोहन रानडे .... पृष्ठ ९ वरून चालू ]
विद्यार्थ्यांकडून सरस्वतीची पूजा करविली. हा प्रकार गावातील सनातनी लोकांना कळताच ते खवळले. त्यांनी रानड्यांना समज दिली की शाळा बंद करा. त्यांच्या-वर बहिष्कार घालण्याचाही त्यांनी विचार केला. पण रानडे गुरुजींच्या तालमीत तयार झालेल्या काही विद्यार्थ्यांनी जाऊन त्या दुढ्ढाचार्यांना दम भरला की रानडे गुरुजींच्या कार्याचे महत्त्व तुम्हांला समजत नसेल तर गप्प बसा. त्यांच्याविरोधी कोणतीही कारवाई आम्ही सहन करणार नाही. या सर्व भानगडीत रानड्यांना देवळातील शाळा बंद करावी लागली. त्यांनी आपल्या वागण्याने जी अनेक माणसे जोडली होती त्यांपैकीच श्री. मामा सावईकर या वेळी खंबीरपणे त्यांच्या पाठिशी उभे राहिले. त्यांनी आपल्या जागेपैकी एक मोकळा भाग रानड्यांच्या स्वाधीन केला. इतकेच नव्हे तर आग्रह करून राहायलाही आपल्या घरी ठेवून घेतले. आपल्या विद्यार्थ्यांच्या साहाय्याने स्वकष्टाने शाळेसाठी एक मोठी झोपडीवजा इमारत रानड्यांनी बांधून काढली. त्या वेळची एक गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे. एका श्रीमंत गृहस्थाने रानडे गुरुजींचे श्रम पाहून शाळेच्या इमारतीसाठी तीन साडेतीन सहस्र रुपये मदत देण्याची तयारी दर्शविली. परंतु रानड्यांनी त्यांना नम्रपणे सांगितले की, मला तुमचा पैसा नको, तुमचे श्रम हवेत. ते देण्याची तयारी असेल तर माझ्या आणि माझ्या विद्यार्थ्यांच्या बरोबर दगड–माती उंचलायला या. त्याचाच आनंद मला जास्त होईल.

### शैक्षणिक चळवळी

शाळेची झोपडीवजा इमारत तयार झाली. शाळा नियमित सुरू झाली. रानडे स्वत: प्रतिदिनी पहाटे पावणेचारला उठत. प्रात:कर्मे आटोपल्यावर, घामाने शरीराची आकृती दिसावी इतका व्यायाम करीत. स्नानानंतर सकाळची प्राथमिक शाळा सुरू होई. प्रथम मुलांचे शारीरिक कार्यक्रम होत. नंतर प्रार्थना होई. आपल्या विद्यार्थ्यांची घडण त्यांना कशी घडवायची होती हे त्या प्रार्थनेवरूनच सिद्ध होते. प्रार्थना अशी असे––

नमो मातृभूमी जिथे जन्मलो मी, नमो मायभूमी जिथे वाढलो मी।
नमो पुण्यभूमी जियेच्याच कामी, पडो देह माझा सदा ती नमी मी।
आले शिरावर जरी घनघोर घाले, दारिद्र्य दु:ख अपमानहि प्राप्त झाले।
कारागृही सतत वास जरी मरे मी, पूजीत ही सतत निर्भय मातृभूमी॥
की घेतले व्रत न हे अम्हि अंधतेने, लब्धप्रकाश इतिहास निसर्ग माने।
जे दिव्य दाहक म्हणोनि असावयाचे, बुद्ध्याची वाण धरिले करि हे सतीचे॥

प्रार्थनेनंतर सकाळी साडेदहापर्यंत प्राथमिक शाळा चाले. नंतर लगेच इंग्लिश व हिंदी शाळा सुरू होई. ती दुपारी दोनपर्यंत चाले. पुन्हा दोन ते पाच दुपारची

प्राथमिक शाळा भरे. शाळा संपल्यावर आसनादी व्यायाम होत.

रानडे साधारणपणे रात्री आठला घरी जेवायला येत. ते एक वेळ–रात्रीच– जेवत. जेवणानंतर रात्री साडेदहा अकरापर्यंत स्वतःचे वाचन व अभ्यास करीत. अती श्रमामुळे नकळतच झोप लाग, अशा वेळी मामा सावईकर हळूच येऊन त्यांना पांघरूण घालीत.

शाळेसाठी हळूहळू एक वाचनालय तयार झाले. तेही अगदी वैशिष्टचपूर्ण पद्धतीने. रानडे निरनिराळ्या घरी जाऊन काही पुस्तके असल्यास मागत. वाचायला त्या काळी गोव्यातील अनेक घरांत स्वा. सावरकरांची जप्त पुस्तके, तसेच जप्त असलेले शिवराम महादेव परांजप्यांचे काळातील निवडक निबंध, लो. टिळकांचे गीतारहस्य, त्याचप्रमाणे रामायण महाभारत अशांसारखी धार्मिक पुस्तके, फाटलेल्या, पाने लोंबकळत असलेल्या अवस्थेत असत. ती कधी काळी वाचली गेली असतील पण आता त्यांचा उपयोग कोणीच करीत नसे. अशी पुस्तके आणावी. वाचून झाल्यावर ती बाइंड करून ज्याची त्याला परत द्यावी आणि हे पाहून पुस्तक मालकांनी प्रसन्न होऊन ती रानड्यांना कायमची देऊन टाकावी. अशा पद्धतीने त्यांच्या प्रामाणिक कळकळीमुळे जवळ जवळ तीन सहस्र रुपयांची पुस्तके एका वर्षात वाचनालया-साठी जमा झाली.

ज्या हेतूसाठी रानडे गोव्यात आले आणि राहिले तो साध्य करण्यासाठी अवश्य ते वातावरण व तयारी या सर्वांतून व्हावी यासाठीच त्यांचा हा सारा खटाटोप होता.

कार्य फार मोठे, अनुकूल परिस्थिती फारशी नाही अशा स्थितीत, हिमालया-तील प्रचंड खडक फोडून पवित्र गंगा भारतात आणणाऱ्या भगीरथाच्या महान प्रयत्नाचीच ही छोटी आवृत्ती होती.

मोहन रानड्यांनी आपल्या विद्यार्थ्यांच्या आणि सहवासात येणाऱ्यांच्या बैठकी घ्यायला सुरुवात केली. अशा बैठकींना साधारणपणे पंधरावीस तरुण असत. त्यांच्यापुढे निरनिराळ्या योजना मांडल्या जाऊन त्या कार्यवाहीत आणल्या जात. वाचनालय, हस्तलिखित मासिक, प्रतिदिन एक पैसा बचत अशा प्रकारच्या योजना त्यात असत. बैठकीतील तरुणांपैकी आपल्या कार्याला योग्य तरुण हेरून त्यांना ते मधून मधून डोंगरावर निर्जन ठिकाणी घेऊन जात. त्यांना पारतंत्र्याची, विषमतेची, परकीय जुलमाची कल्पना देऊन स्वातंत्र्य लढ्यासाठी तयार करीत. या हेतूनेच ‘लोकमान्य’ या नावाचे एक हस्तलिखित मासिकही त्यांनी सुरू केले.

ते दर रविवारी शेतकऱ्यांच्याबरोबर शेतीची सर्व कामे करायला जात. त्यांच्या-बरोबर खपत. त्यांच्याबरोबर पेज पीत. अशा सर्व उद्योगांतून, स्वातंत्र्य लढ्याचे काळात आश्रय देणारी असंख्य ठिकाणे त्यांनी निर्माण केली.

[ पूर्वार्ध समाप्त : उत्तरार्ध पुढील अंकी ]

# राशी भविष्य : श्री. बी. डी. घाणेकर : भृगुसंहितातज्ज्ञ

## दिनांक १५ ऑगस्ट ते २२ ऑगस्ट १९६६

**मेष :** आपल्या राशीस मंगळ चौथा येत आहे. त्यामुळे प्रकृतीस उष्ण विकारांपासून त्रास होईल व प्रवासास जपावे. घरात अस्थिर वातावरण निर्माण होईल. सुखस्थानात गुरू उच्च येत आहे. म्हणून शुभकार्याबद्दल वाटाघाटी होतील. वरिष्ठांची मर्जी नोकरी कामधंद्यात राहील. आरोग्य व आर्थिकदृष्टचा मात्र हा सप्ताह आपणांस त्रासदायक होईल. पोटातील विकारांपासून त्रास. तथापि, रवी अनुकूल असल्याने दि. १७,१८ शुभघटना घडतील. दि. १६ व १९ प्रतिकूल दिवस.

**वृषभ :** आपला राशिस्वामी पराक्रम–स्थानात आहे. त्यामुळे आरोग्य चांगले राहील. दि. १५ पासून मंगळ प्रतिकूल असल्यानें बंधुभगिनींस आरोग्याचे दृष्टीने त्रास होईल. राहूच्या प्रतिकूलतेमुळे नोकरीत त्रास व बदलीचा योग. १६,१७ प्रवासाचा योग. व्ययस्थानात पापग्रह असल्याने नोकरीत कनिष्ठ लोकांपासून त्रास. पत्नीच्या प्रकृतीस त्रास. दि. १९, २० तारखा शुभ. स्त्रियांना हा सप्ताह पतिसौख्याच्या दृष्टीने त्रासदायक आहे. मित्रांशी आर्थिक व्यवहार जपून करावा.

**मिथुन :** आपल्या राशीस गुरू अनुकूल येत आहे. १५ ऑगस्टपासून रवी पण पराक्रमात येत आहे.त्यामुळे हा आठवडा आपणांस अनुकूल जाईल. नवीन कार्यात यशप्राप्ती होईल. धनस्थानातून गुरुचे उच्च परिभ्रमण होत आहे म्हणून आर्थिक परिस्थितीत सुधारणा व आकस्मिक धनप्राप्ती होईल. दिनांक १७ व २१ ह्या शुभ तारखा. १८,१९ प्रतिकूल घटना घडतील. महिलांस पतीपासून चांगले सौख्य प्राप्त. मनाजोगत्या गोष्टी घडतील.

**कर्क :** आपल्या राशीस गुरूची कृपा होत आहे. बरेच दिवस चालू असलेला त्रास दूर होऊन मानसिक त्रासही नष्ट होईल. कोणत्याही कार्यांत यश आहे. आता आपणांस काळजीचे कारण नाही. घरात आनंदी वातावरण राहून नोकरी नसणारांस नोकरी लागेल. महिलांना पुत्रप्राप्ती होईल. ता. १९ व २० मनाजोगत्या गोष्टी घडतील. याच आठवड्यात मंगळही आपल्या राशीत येत आहे. त्यामुळे उष्ण विकारांपासून तब्येतीस त्रास होईल.

**सिंह :** आपल्या राशीस गुरू १२ वा येत आहे. त्यामुळे नोकरीत वरिष्ठांपासून त्रास. शुभकार्यात द्रव्यखर्च होईल. विद्यार्थ्यांस विद्येत अडथळे निर्माण होतील. नोकरी करणारांस बदलीचा योग आहे. प्रतिकूल घटना घडून मनाची अस्वस्थता वाढेल. उष्ण विकारांपासून तब्येतीस त्रास. दि. १५, १६ अशुभ. दिनांक १७, १८ शुभ दिवस आहेत. एकंदरीत २१ तारखेपासून विरुद्ध घटना घडू लागतील.

**कन्या :** आपल्या राशीस गुरू ११ वा येत आहे. आज आपणांस बरेच दिवस त्रासात व अडचणीत काढावे लागत आहेत, ते नष्ट होतील. आर्थिक सुधारणा होऊन इच्छित कार्ये सिद्धीस जातील. आता काळजीचे कारण नाही. कुठल्याही कार्यात निश्चित यश येईल. अविवाहितांचे विवाह होतील. विद्यार्थ्यांना विद्येत यश मिळेल. स्त्रियांचे पती मनाप्रमाणे वागतील. प्रेमिकांचे प्रेमविवाह होतील. दि. १९, २० शुभ दिवस व १७ व १८ प्रवास, मानसिक त्रास व अशुभ दिवस.

**तुला :** आपल्या राशीस दशमात गुरू व लाभात रवी येत आहे. नोकरीत बढती, आर्थिक फायदा, उद्योग–व्यवसायात उत्तम अर्थप्राप्ती. बेकारांस नोकरी मिळेल. नोकरी करणारांस बढती मिळेल. कोणत्याही कार्यात धडाडीने यश मिळेल. पुष्कळसे ग्रह दशमात येत असल्याकारणाने मनाजोगत्या गोष्टी घडतील. मामाचे घरी शुभ कर्मे घडतील. तूल रास व चित्रा नक्षत्र असेल तर हा महिना शुभ.

**वृश्चिक :** बरेच दिवस आपण हालअपेष्टांत काढले असल्याने हा काळ आता संपला आहे. आता आपल्या अडचणी दूर होतील. मनाजोगत्या गोष्टी घडतील. आकस्मिक शुभ घटना घडतील. विद्यार्थ्यांस विशेष यशप्राप्ती. अविवाहितांचे विवाह होतील. बरेच दिवस मनात असलेले मनोरथ पूर्ण होतील. संततीसौख्य चांगले लाभेल. गुरुकृपा असल्याने आपणांस काळजीचे काहीच कारण नाही.

**धनू :** आपल्या राशीत अष्टमात गुरू येत आहे. तथापि तो उच्च येत असल्याने भिण्याचे कारण नाही. व्यापारात चांगली अर्थप्राप्ती होईल. स्थावराबद्दल कटकटी निर्माण होतील. तथापि या महिन्यात रवी अनुकूल असल्याने दि. १७, २० शुभ आहेत. धार्मिक कार्यांत पैसे खर्च होतील. प्रवास करू नये. अपघाताचा संभव, अग्नीपासून जपावे. ज्यांना जुन्या कातडीचा रोग आहे तो पुन्हा उद्‌भवेल. महिलांना हा आठवडा शुभ आहे. त्यांच्या मनातील इच्छा पूर्ण होतील.

**मकर :** आपण आता साडेसातीतून मुक्त झाला आहात. दि. २१ पासून सप्तमातून गुरूचे परिभ्रमण होत आहे त्यामुळे नोकरीत फायदा, बेकारांस नोकरी मिळेल. धार्मिक कार्यांत पैसा खर्च होईल. दूरचा प्रवास घडेल. रवी अष्टमात येत असल्याने तब्येतीस अधूनमधून त्रास. १८ व १९ तारखा शुभ. दि. २१ प्रतिकूल. महिलांस पतीपासून फायदा. नोकरीत बदलीचा योग येईल.

**कुंभ :** आपणांस साडेसाती चालू असून गुरू-मंगळ हे दोन्ही ग्रह प्रतिकूल येत आहेत. त्यामुळे अडीअडचणी निर्माण होतील. कुटुंबातील स्वास्थ्य नाहीसे होऊन मन:स्थिती बिघडेल. कनिष्ट वर्गाच्या लोकांपासून त्रास, कोर्टाची कामे लांबणीवर टाकावीत. कोणतेही कार्य स्थगित ठेवावे. तसे न केल्यास त्यात अपयश.

**मीन :** आपणांस दि. २१ पासून पंचमात गुरू उच्च येत आहे. दि. २१ पासून आपल्या सर्वच गोष्टी अनुकूल घडतील. विद्यार्थ्यांना विद्येत यश. पूर्वा-भाद्रपदा प्रथमचरण असलेल्यांना हा आठवडा फार शुभ आहे. दि. १८, १९ अनुकूल दिवस. ●





Industrial

B E C

विशेष माहितीसाठी भेटा अगर लिहा :

**भारती इंजिनिअरिंग कंपनी**

३५-बी, ग्रीन बिल्डिंग, मौलाना आझाद रोड.
जेकब सर्कल, मुंबई-११.



साखर कारखान्याची यंत्र-सामग्री, बॉयलर्सची जोडणी, उभारणी व विद्युतीकरणाची कामे स्वीकारतो, उत्तम प्रकारे पार पाडतो.

लोखंडी खिडक्या, दारे, सरकती दारे व 'विश्वास' रोल अप् शटर्स व रोल अप् ग्रील्स यांचे उत्पादक.

# नायक्रोम मेटल वर्क्स

४६ वेल्स्ली रोड, संगम, पुणे १.


फोन : २४२८७ ]    [ तार : नायक्रोम, पुणे

MANOOS (Weekly) : 15 Aug. 66 : 40 Paise : Regd. No. M H-649

प्रगतिपथावरील पुढचे पाऊल...

स्वस्तिक

चप्पल्स



Parkerson/srp/12

स्वस्तिक रबर प्रॉडक्टस लिमिटेड, खडकी, पुणें ३.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर.**